





# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

अमरावती, सोमवार २ मार्च २०२६ मूल्य ४.०० पृष्ठे १०





# 'एसबीएल' मधील स्फोटात १७ जणांचा मृत्यू

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले सखोल चौकशीचे आदेश

**नागपूर/प्रतिनिधी :** जिल्ह्यातील राऊळगाव (बाजारगाव नजीक) येथील एक्सप्लोसिव्ह फॅक्टरीमध्ये झालेला स्फोट अत्यंत भीषण असून, या दुर्घटनेत आतापर्यंत १७ जणांचा मृत्यू झाल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे.

नागपूर जिल्ह्यातील राऊळगाव (बाजारगाव नजीक) येथील एक्सप्लोसिव्ह फॅक्टरीमध्ये झालेला स्फोट अत्यंत भीषण असून, या दुर्घटनेत आतापर्यंत १७ जणांचा मृत्यू झाल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या घटनेबद्दल तीव्र दुःख व्यक्त केले असून, या प्रकरणाच्या सखोल चौकशीचे आदेश दिले आहेत. तसेच दुर्घटनेत मृत्यू झालेल्यांच्या वारसांना ५ लाख रुपये आर्थिक मदत राज्य सरकार करेल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केले आहे. मुख्यमंत्र्यांनी ट्विट द्वारे माहिती दिली की, ते स्थानिक प्रशासनाच्या सतत संपर्कात आहेत. जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षक घटनास्थळी तळ ठोकून आहेत. NDRF आणि SDRF ची पथके तातडीने मदतकार्यासाठी पोहोचली आहेत.

'पेसो'आणि 'डिश'या तांत्रिक



तपासणी करणाऱ्या विभागांची पथकेही घटनास्थळी दाखल झाली असून स्फोटाचे नेमके कारण शोधण्याचे काम सुरू झाले आहे. या भीषण दुर्घटनेत १८ जण जखमी झाले असून, त्यांना तातडीने उपचारासाठी नागपूर येथील रुग्णालयात हलवण्यात आले आहे. जखमींच्या प्रकृतीत लवकरात लवकर सुधारणा व्हावी, अशी प्रार्थना मुख्यमंत्र्यांनी केली आहे.

**मुख्यमंत्र्यांकडून चौकशीचे आदेश**

'राऊळगाव येथील स्फोटाची घटना अतिशय दुर्दैवी आणि दुःखद आहे. मृतांना मी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो आणि त्यांच्या कुटुंबियांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत,' अशा भावना मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केल्या. तसेच, ही दुर्घटना नेमकी कशामुळे घडली आणि यात कोणाचा निष्काळजीपणा आहे का, याची सखोल चौकशी करण्याचे निर्देश त्यांनी प्रशासनाला दिले आहेत.

# टीम इंडियाची सेमीफायनलमध्ये मुसंडी

## संजू सॅमसनची नाबाद ९७ धावांची मॅच विनींग खेळी

**कोलकाता /वृत्तसंस्था- :** कोलकाता येथील ऐतिहासिक ईडन गार्डन्सवर रविवारी (दि. १) क्रिकेटचा असा महासंग्राम रंगला, ज्याने चाहत्यांच्या काळजाचा ठोका चुकावला. टी-२० विश्वचषक २०२६ च्या 'सुपर ८' फेरीतील या अटीतटीच्या लढतीत भारताने वेस्ट इंडिजचा ५ गडी राखून पराभव केला. वेस्ट इंडिजने उभारलेला १९५ धावांचा डोंगर भारताने संजू सॅमसनच्या अविस्मरणीय 'रुद्रावतारा'च्या जोरावर अवघ्या १९.२ षटकांत सर केला.



**विंडीजचे आक्रमण-** नाणेफेक हारल्यानंतर प्रथम फलंदाजीला उतरलेल्या वेस्ट इंडिजने सुरुवातीपासूनच भारतीय गोलंदाजांवर प्रहार करण्यास सुरुवात केली. शाई होप (३२) आणि रोस्टन चेस (४०) यांनी पाया रचला, तर शिमरॉन हेटमायरने १२ चेंडूत २७ धावांची आतिशबाजी केली. पण खरा धमाका झाला तो अखेरच्या षटकांत! जेसन होल्डर (नाबाद ३७) आणि रोवमन पॉवेल (नाबाद ३४) ☞(पान २ वर)

# मध्यपूर्वेत युद्धाचा भडका! पेट्रोल-डिझेलच्या किमती वाढणार?

**मुंबई /प्रतिनिधी : -** गेल्या काही दिवसांपासून अमेरिका, इस्त्रायल आणि इराण यांच्यात सुरू असलेल्या संघर्षाने आता थेट युद्धाचे रूप धारण केले आहे. इस्त्रायल आणि अमेरिकेने इराणवर केलेल्या भीषण हल्ल्यानंतर इराणनेही आक्रमक प्रत्युत्तर देण्यास सुरुवात केली आहे. या जागतिक तणावामुळे संपूर्ण जगाची चिंता वाढली असून, याचा सर्वात मोठा आणि थेट फटका भारतासारख्या विकसनशील अर्थव्यवस्थेला बसण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे.




मध्य पूर्वेत युद्धाचा भडका उडाल्याने भारतात पेट्रोल आणि डिझेलच्या किमती वाढू शकतात, असा जाणकार तज्ज्ञांचा अंदाज आहे. भारताला लागणाऱ्या एकूण कच्च्या तेलापैकी (क्रूड ऑईल) जवळपास ८५३ तेल आपण आयात करतो. यातील बहुतांश तेल मध्यपूर्वेतील देशांमधून येते. युद्धामुळे आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमतीत मोठी वाढ झाली आहे. सध्या कच्च्या तेलाचे दर प्रति बॅरल ७५ ते ८० डॉलर्सच्या आसपास गेले आहेत. जर हे युद्ध लांबले ☞(पान २ वर)

# इराणचा कणा मोडला; 'ऑपरेशन लायन्स रोअर' मध्ये ४८ बडे नेते ठार; ट्रम्प यांची मोठी माहिती

**नवी दिल्ली/ वृत्तसंस्था-** डोनाल्ड ट्रम्प यांनी दिलेल्या मुलाखतीत स्पष्ट केले की, इराणमधील अमेरिकन लष्करी मोहीम अपेक्षेपेक्षा कितीतरी वेगाने पुढे सरकत आहे. शनिवारी सकाळी झालेल्या या भीषण हल्ल्यात केवळ खामेनीच नव्हे, तर इराणच्या लष्करी आणि राजकीय वर्तुळातील ४८ प्रभावशाली नेते मारले गेले आहेत. यामध्ये रिव्होल्यूशनरी गाड्र्सचे काही वरिष्ठ कमांडर आणि संरक्षण मंत्र्यांचाही समावेश असल्याचे समजते.

**ऑपरेशन लायन्स रोअर काय आहे?** हे अमेरिका आणि इस्त्रायलचे संयुक्त ऑपरेशन आहे, ज्याचे मुख्य उद्दिष्ट इराणची आण्विक क्षमता नष्ट करणे आणि तिथली सत्तापालट करणे हे आहे. ट्रम्प यांनी या मोहिमेला ऐतिहासिक यश म्हटले असून, इराणचा प्रभाव मध्य आशियातून कायमचा संपवण्याचे संकेत दिले आहेत.

**इराणचा लाल निशाण फडकवून पलटवार-** आपल्या नेत्यांच्या मृत्यूने संतप्त झालेल्या इराणने आता थेट युद्धाचे पाऊल उचलले आहे. कोम येथील पवित्र जामकरन मशिदीवर सूडाचा लाल




झेंडाफडकवण्यात आला आहे. प्रत्युत्तर म्हणून इराणने आखाती देशांमधील अमेरिकेच्या लष्करी तळांवर डझनभर मिसाईल डागली आहेत. या क्षेपणास्त्र हल्ल्यांमुळे सौदी अरेबिया, कतार आणि ओमानमधील अमेरिकन तळांवर तणाव वाढला आहे.

**इराणमध्ये आणीबाणी-** खामेनी आणि ४८ नेत्यांच्या मृत्यूमुळे इराणमध्ये सध्या पूर्णपणे गोंधळाची स्थिती असून तेथे ४० दिवसांचा राष्ट्रीय दुखवटा जाहीर करण्यात आला आहे. या युद्धाचा भडका उडाल्यामुळे जागतिक बाजारपेठेत कच्च्या तेलाच्या किमतीत मोठी वाढ होण्याची शक्यता तज्ज्ञांनी वर्तवली आहे. दुसरीकडे, बेंजामिन नेतन्याहू यांनी, जोपर्यंत इराणचे संपूर्ण लष्करी जाळे उखडले जात नाही, तोपर्यंत हे हल्ले थांबणार नाहीत, असा इशारा दिला.

# इराणचा अमेरिकेच्या विमानवाहू जहाजावर मोठा हल्ला; तीन अमेरिकन सैनिक ठार, पाच जखमी

**नवी दिल्ली/ वृत्तसंस्था-** शनिवारीपासून मध्य पूर्वेत मोठा तणाव सुरू झाला आहे. अमेरिका आणि इस्त्रायलने इराणवर हल्ले सुरू केले. दरम्यान, काल ट्रम्प यांनी इराणच्या खामेनेई यांचा मृत्यू झाल्याचा दावा केला होता. आज इराणच्या सरकारी माध्यमांनी याची पुष्टी केली आहे. दरम्यान, आता या युद्धात इराकनेही उडी घेतली असून अमेरिकेच्या लष्करी तळांवर हल्ले सुरू केले आहे. इराणने पुन्हा एकदा इस्त्रायल आणि



अमेरिकेला धमकी दिली. या धमकीनंतर ट्रम्प यांनी 'आम्ही कधीही न पाहिलेला शक्तिशाली हल्ला करू', असे इराणनला सांगितले आहे. यामुळे आता मध्य पूर्वेत आणखी तणाव वाढण्याची शक्यता आहे. अमेरिका, इस्त्राईल आणि इराण यांच्यातील संघर्ष आता टोकाला पोहोचला असून त्याचे गंभीर पडसाद भारतीय कमोडिटी बाजारात उमटणार आहेत. उद्या, सोमवारी बाजार उघडताच सोने आणि कच्च्या तेलाच्या किमतीत तेजीसह सुरुवात पाहायला मिळू शकते.

# अयातुल्ला अली खामेंनीचा इराणमध्ये मृत्यू

**नवी दिल्ली/ वृत्तसंस्था-** अणवस्त्रानिर्मिती रोखण्यासाठी करार करण्याकरिता चर्चेच्या तीन फेऱ्या अपयशी ठरल्यानंतर अमेरिका आणि इस्त्रायलने शनिवारी इराणवर जोरदार हल्ले चढविले. या हल्ल्यात इराणमध्ये २०० पेक्षा अधिक जण ठार झाले. या हल्ल्यांना प्रत्युत्तर देत इराणने इस्त्रायलसह आठ देशांवर प्रतिहल्ले केले. अद्यापही अनेक ठिकाणी हल्ले सुरूच आहेत. मध्य पूर्वेतील देशांमधील तणाव वाढताना पाहायला मिळत आहे.



इराण अमेरिकेचे तळ असणाऱ्या अन्य देशातील ठिकाणी मोठे हल्ले चढवत आहे, तर इस्त्रायल तेहरानमधील अनेक ठिकाणी क्षेपणास्त्रे डागत आहे. इस्त्रायलच्या हल्ल्यात इराणचे सर्वोच्च नेते आणि धर्मगुरू अयातुल्ला अली खामेनी यांचा मृत्यू झाल्याचे वृत्त आहे. भारतातील उत्तर प्रदेशमध्ये असलेल्या एका गावावर या बातमीने शोककळा पसरल्याचे सांगितले जात आहे.

मीडिया रिपोर्टनुसार, शनिवारी झालेल्या हल्ल्याच्या पहिल्या टप्प्यात अवघ्या ३० सेकंदांत इराणमधील ३ महत्त्वाच्या शहरांना लक्ष्य करण्यात आले. या हल्ल्यांमध्ये सुमारे ३० वरिष्ठ राजकीय आणि लष्करी नेत्यांचा मृत्यू झाल्याचा दावा केला जात आहे. विशेष म्हणजे, या संपूर्ण कारवाईत '३०' हा आकडा वारंवार समोर येत आहे. ३० सेकंद, ३० ठिकाणे, ३० ☞(पान २ वर)






# अमेरिका-इराण-इस्त्रायल युद्धाचा शेकडो विमानांना फटका; हजारो प्रवासी अडकले

**नवी दिल्ली/ वृत्तसंस्था-** अमेरिका आणि इस्त्रायलनेइराणवर संयुक्त लष्करी कारवाई केल्यानंतर अनेक आखाती देशांनी सुरक्षिततेच्या कारणास्तव आपले हवाई क्षेत्र तात्पुरते बंद केले आहे. यामुळे देशातील प्रमुख विमानतळांसह मुंबई विमानतळावरील विमान उड्डाणे रद्द केली आहेत. इराण-इस्त्रायल युद्धामुळे जगभरातील हवाई वाहतुकीवर मोठा परिणाम झाला आहे. विमानांची वाहतूक कोलमडल्याने विमानतळांवर हजारो प्रवासी अडकले आहेत. अण्वस्त्रनिर्मिती रोखण्यासाठी करार करण्याकरिता चर्चेच्या तीन फेऱ्या अपयशी ठरल्यानंतर अमेरिका आणि इस्त्रायलने शनिवारी



इराणवर जोरदार हल्ले चढविले. या हल्ल्यात इराणमध्ये २०० पेक्षा अधिक जण ठार झाले. या हल्ल्यांना प्रत्युत्तर देत इराणने इस्त्रायलसह आठ देशांवर प्रतिहल्ले केले. ☞(पान २ वर)

# डिझेल, पेट्रोलची अवैध वाहतूक ५ लाख ७३ हजारांचा मुद्देमाल जप्त

**वर्धा / प्रतिनिधी ::** जिल्ह्यात डिझेल आणि पेट्रोलची विनापरवाना अवैध वाहतूक करणाऱ्या एका मोठ्या रॅकेटचा स्थानिक गुन्हे शाखेने पर्दाफाश केला आहे. वर्धा ते सेवाग्राम रोडवरील महिलाश्रम परिसरात केलेल्या या धडक कारवाईत पोलिसांनी ५ लाख ७३ हजार ४० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून, यामध्ये एका पेट्रोलपंप मालकाचाही समावेश असल्याचे



समोर आले आहे. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार, काही व्यक्ती ☞(पान २ वर)






# बांधकामाधीन इमारतीवरून ६ मजूर कोसळले; एक ठार

**मुंबई/ प्रतिनिधी : :** चेंबूरच्या सुभाष नगरमधील ३६ क्रमांकाच्या बांधकामाधीन इमारतीवरून शनिवारी दुपारी सहा मजूर कोसळले. या दुर्घटनेत एकाचा मृत्यू झाला, तर उर्वरित पाच जणांवर उपचार सुरू आहेत. त्यापैकी एकाची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती यंत्रणांनी दिली.

अपघाताची माहिती मिळताच अग्निशमन दल, पोलिस तसेच संबंधित प्रभागांतील महापालिका कर्मचारी तातडीने दुर्घटनास्थळी दाखल झाले. जखमी मजुरांना राजावाडी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. रुग्णालय प्रशासनाकडून मिळालेल्या माहितीनुसार, दुर्घटनेत रामल्लू (५५) या मजुराचा मृत्यू झाला. तर गुंधधर राय (२२) याची प्रकृती गंभीर असून त्याच्यावर अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. अन्य जखमी मजूर उसराई (३०), रमेश राय (२५), विजय (३५) आणि संदीप (२७) यांच्यावर नियमित उपचार सुरू आहेत.

हा अपघात नेमका कशामुळे घडला? याची चौकशी पोलिस आणि महापालिका प्रशासनाने सुरू केली आहे.

**ठेकेदारावर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करा : महापौर तावडे**

चेंबूर येथील सुभाष नगर



परिसरातील दुर्घटना स्थळी महापौर रितू तावडे यांनी भेट दिली. त्यानंतर घाटकोपर येथील राजावाडी रुग्णालयात जाऊन जखमी मजुरांची विचारपूस केली. यावेळी उप महापौर संजय घाडी आणि विरोधी पक्षनेत्या किशोरी पेडणेकर उपस्थित होते.

बेजबाबदारपणे काम करणाऱ्या विकासक आणि कंत्राटदारांविरोधात कठोर कारवाई करावी, ☞(पान २ वर)

## युवक काँग्रेसचा निर्धार

# अचलपूर तालुका आढावा बैठकीत संघटन बळकटीवर भर!

**अचलपूर/प्रतिनिधी:-** अचलपूर येथे तालुका युवक काँग्रेसची महत्त्वपूर्ण आढावा बैठक उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर संघटनात्मक मजबुती, जनहिताचे प्रश्न आणि युवकांच्या सक्षमीकरणावर सखोल चर्चा करण्यात आली. बैठकीत कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड उत्साह दिसून आला.

बैठकीला प्रमुख मार्गदर्शक म्हणून महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे प्रवक्ते कपिल ढोके, युवक काँग्रेस अमरावतीचे जिल्हाध्यक्ष राहुल येवले, कार्याध्यक्ष अनिकेत ढेंगळे, महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे महासचिव उत्कर्ष देशमुख व नितेश वानखडे, अचलपूर विधानसभा अध्यक्ष निलेश डांगे, दर्यापूर विधानसभा अध्यक्ष ऋग्वेद सरोदे तसेच तालुका अध्यक्ष नामदेवराव तनपुरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

या वेळी मार्गदर्शकांनी कार्यकर्त्यांना संघटन विस्तार, बूथ स्तरावरील बांधणी आणि



युवकांच्या प्रश्नांवर प्रभावीपणे आवाज उठवण्याचे आवाहन केले. युवक काँग्रेस हीच भविष्यातील नेतृत्वाची शाळा असून तळागाळातील सामान्य जनतेच्या प्रश्नांवर ठाम भूमिका घेण्याची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

बैठकीत असलम बंजारा, देवेंद्र पेटकर, कैलास आवारे, अचलपूर शहराध्यक्ष श्रीकांत झोडपे, परतवाडा शहराध्यक्ष राहुल गवई, प्रशांतराव ठाकरे, अमोल चिमोटे, इतेशाम नबील, सईद मौलाना, राहुल गाठे, राजाभाई, अकबर सर, अफजल गौरी, मन्नू शहा, जलील पठाण, मतीन, ओमश्री घोरे, राजीक, जॉन अली रिजवी, शब्बीर, अमोल बोरेकर, अंकुश ठाकरे, जय घोरे, गौरव डकरे, शुभम ठाकरे, सुजित अपाले, कुलदीप कडू, राजेश कडू, श्याम नवले, प्रदीप डवरे, अरविंद नेतनराव, ज्ञानेश्वर शेळके, शोएब, शारीक, नरेंद्र हगवने, विशाल खानजोडे, राहुल सालफळे, सुरेंद्र पवार, प्रणव ठाकरे, शईबाज इलियासी, रुपेश जवंजाळ तसेच निलेश रा. कविटकर, तुशार कांजे, प्रज्वल काळे, तूबार वि. दाभाडे, विभूष सु. दाभाडे, दिपक खंडारे, सुरज दामले, रितेश दामले, रुपेश सु. जवंजाळ, दिनेश खंडारे, आतीष गुळसुंदरे, उज्वल सु. दाभाडे, भानुदास आखतकर, शिरज अपाले, राजेश ज. पेटकर, सुधिर वा. गाडगे, सुमीत बेलसर, संदेश निकम, उद्देश जावरकर, अभीजीत नेरकर यांच्यासह असंख्य पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बैठकीच्या शेवटी युवकांच्या हक्कांसाठी आणि काँग्रेसची विचारधारा घराघरात पोहोचवण्यासाठी सर्व कार्यकर्त्यांनी एकजुटीने काम करण्याचा निर्धार व्यक्त केला. अचलपूर तालुक्यात युवक काँग्रेस अधिक बळकट करण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला.

## १ व १० वरील उर्वरित

### टीम इंडियाची सेमीफायनलमध्ये मुसंडी

यांनी भारतीय गोलंदाजांची दाणादाण उडवत ७६ धावांची अभेद्य युती केली आणि विंडीजला १९५ या विशाल धावसंख्येपर्यंत पोहोचवले. भारताकडून जसप्रीत बुमराहने २ बळी घेतले, मात्र धावगती रोखण्यात तोही अपयशी ठरला.

**भारताचा प्रतिहल्ला: संजू सॅमसनची 'मॅच विनिंग' खेळी**

१९६ धावांचे महाप्रचंड लक्ष्य समोर असताना भारताची सुरुवात अडखळत झाली. अभिषेक शर्मा आणि इशान किशन स्वस्तात बाद झाले, तर कर्णधार सूर्यकुमार यादवही १८ धावांवर माघारी परतला. ईडन गार्डन्सवर काही काळ स्मशानशांतता पसरली होती. पण आज नशिबाच्या रेषा आणि बॅटची ताकद वेगळ्याच मुडमध्ये होती. यष्टीरक्षक फलंदाज संजू सॅमसन आज एखाद्या चिवट योद्ध्यासारखा मैदानावर पाय रोवून उभा होता. त्याने आपल्या बॅटमधून चौकार-षटकारांची अशी काही बरसात केली की कॅरिबियन गोलंदाज हतबल झाले. संजूने अवघ्या ५० चेंडूत १२ चौकार आणि ४ उत्तुंग षटकारांसह नाबाद ९७ धावांची अजरामर खेळी साकारली. शतकाने त्याला अवघ्या ३ धावांनी हुलकावणी दिली असली, तरी त्याने भारतीय चाहत्यांची मने जिंकली. त्याला तिलक वर्मा (२७) आणि हार्दिक पंड्या (१७) यांनी मोलाची साथ दिली.

**अखेरचा प्रहार आणि जल्लोष**

शेवटच्या षटकांत रोमांच शिगेला पोहोचला होता, पण संजू सॅमसनच्या साथीला आलेल्या शिवम दुबेने २ चेंडूत ८ धावा कुटून विजयाची औपचारिकता पूर्ण केली. भारताने १९.२ षटकांत ५ बाद १९९ धावा करत विजयावर शिक्कामोर्तब केले.

### मध्यपूर्वेत युद्धाचा भडका! पेट्रोल-

, तर हे दर १०० डॉलर्सच्या पार जाऊ शकतात. असे झाल्यास भारतीय तेल कंपन्यांवर प्रचंड आर्थिक दबाव येईल आणि त्यांना नाईलाजाने भारतात पेट्रोल आणि डिझेलच्या किमती वाढवाव्या लागतील. जगातील जवळपास २०३ ते २५३ खनिज तेल इराणच्या जवळ असलेल्या 'होर्मुझच्या सामुद्रधुनी'तून जाते. भारताला येणारे जवळपास ५०३ तेल याच मार्गाने येते. इराणने हा मार्ग रोखल्यास तेलाचा पुरवठा खंडित होईल.

सर्वसामान्यांवर काय परिणाम?

इंधनाचे दर वाढले की त्याचा थेट परिणाम वाहतूक व्यवस्थेवर होतो. पेट्रोल आणि डिझेल महाग झाल्यामुळे मालवाहतुकीचा खर्च वाढेल. परिणामी दैनंदिन गरजेच्या वस्तू, भाजीपाला, फळे आणि अन्नधान्य महाग होईल. देशातील महागाईचा दर वाढेल, ज्यामुळे रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाला व्याजदर कमी करणे कठीण होईल. म्हणजेच गृहकर्ज आणि वाहन कर्जाचे हप्ते स्वस्त होण्याची आशा मावळेल.

युद्धाच्या बातम्यांमुळे जागतिक गुंतवणूकदारांमध्ये भीतीचे वातावरण आहे. परदेशी गुंतवणूकदार भारतीय शेअर बाजारातून आपले पैसे काढून घेत आहेत, ज्यामुळे सेन्सेक्स आणि निफ्टीमध्ये मोठी घसरण पाहायला मिळत आहे.

जेव्हा जगात युद्ध किंवा अस्थिरता असते, तेव्हा गुंतवणूकदार 'सुरक्षित गुंतवणूक' म्हणून सोन्याकडे वळतात. यामुळे येत्या काळात भारतात सोन्याचे आणि चांदीचे दर आणखी गगनाला भिडण्याची शक्यता आहे.

### अयातुल्ला अली खामेनीचा

नेते अन् ३० बॉम्ब. काही रिपोर्ट्सनुसार, खामेनी यांच्या ठिकाणावर सुमारे ३० शक्तिशाली बॉम्ब टाकण्यात आले, ज्यामुळे संपूर्ण परिसर उद्ध्वस्त झाला. यानंतर खामेनी यांच्या मृत्यूचे वृत्त जगभर पसरले. खामेनी यांचे उत्तर प्रदेशातील गावाशी होते खास कनेक्शन अयातुल्ला अली खामेनींच्या मृत्यूच्या बातमीने उत्तर प्रदेशातील बाराबंकी जिल्ह्यातील किंतूर गावात शोककळा पसरली. खामेनींचे आजोबा सय्यद अहमद मुसावी हिंदी यांचे मूळ या गावाशी संबंधित असल्याची माहिती आहे. बाराबंकीच्या सिरौली गौसपूर तहसीलमधील किंतूर गावाचा खामेनी कुटुंबाशी ऐतिहासिक संबंध असल्याचं सांगितलं जातं. अयातुल्ला खामेनी यांचे आजोबा सय्यद अहमद मुसावी हिंदी हे १८-१९व्या शतकात याच गावात राहत होते, अशी माहिती स्थानिकांकडून दिली जाते. स्थानिकांच्या मते, सय्यद अहमद मुसावी हिंदी यांनी आपल्या नावामागे 'हिंदी' हा शब्द जोडून मूळ भारतीय ओळख जपली होती. या गावात आजही काही जुनी कागदपत्रे आणि परंपरागत वास्तूंच्या आठवणी या ऐतिहासिक नात्याची साक्ष देतात, असे सांगितले जाते.

दरम्यान, स्थानिक रहिवासी भावुक होत ही घटना केवळ इराणची नाही तर संपूर्ण जगाची हानी असल्याचे म्हटले असून, ही मोठी दुःखद घटना असल्याचीही भावना व्यक्त केली. अनेक ग्रामस्थांनी या घटनेला 'इतिहासातील वेदनादायक क्षण' असं संबोधले आहे. गावातील नागरिक एकत्र येऊन जुन्या आठवणी आणि या ऐतिहासिक नात्याविषयी चर्चा करत असल्याचे पाहायला मिळत आहे. हजारो किलोमीटर दूर सुरू असलेल्या युद्धाचे पडसाद या छोट्या गावातही स्पष्टपणे उमटत आहेत.

### अमेरिका-इराण-इस्रायल युद्धाचा

अद्यापही अनेक ठिकाणी हल्ले सुरूच आहेत. मध्य पूर्वेतील देशांमधील तणाव वाढताना पाहायला मिळत आहे. यातच विमान उड्डाणे रद्द झाल्याने हजारो लोकांना त्याचा फटका बसल्याचे पाहायला मिळत आहे. अमेरिका-इराण-इस्रायल युद्धाचा शेकडो विमानांना फटका मुंबईहून लंडन, न्यूयॉर्क, शिकागो, टोरंटो, फ्रँकफर्ट आणि पॅरिसला जाणारी रविवार-सोमवारची एअर इंडियाची सर्व उड्डाणे रद्द केली होती. एअर इंडियाने अडकलेल्या भारतीय कर्मचाऱ्यांना सुखरूप बाहेर काढण्याचे प्रयत्न सुरू केले आहेत. दुसरीकडे इंडिगोनेही पश्चिम आशिया आणि काही आंतरराष्ट्रीय क्षेत्रांतील उड्डाणे रद्द करण्यात निर्णय घेतला आहे. याचा परिणाम मुंबई-लंडन सेवेवरही झाला आहे. दिल्लीहून तेल अवीवला जाणारे एअर इंडियाचे विमान मध्यमार्गाने रविवारी मुंबईला उतरविण्यात आले.

रीबुकिंगबाबत माहिती न मिळाल्याने प्रवासी संभ्रमात

बहरीनमार्गे अमेरिकेला जाणारे प्रवासी रीबुकिंगबाबत माहिती न मिळाल्याने संभ्रमात असल्याचे म्हटले जात आहे. मुंबईहून मक्का-मदीनाला उमरासाठी जाणारे प्रवासीही अडकले आहेत. याशिवाय अबू धाबी, बहरीन आणि इटलीला जाणारे प्रवासी खोळंबले आहेत. मुंबई बाहेरुन आलेल्या प्रवाशांची सोय विमान कंपन्यांनी केली आहे. प्रवाशांचे हाल उड्डाणे रद्द झाल्याने मुंबई विमानतळ अनेक प्रवासी अडकून पडले आहेत. मुंबई विमानतळावरुन अमेरिका आणि युरोपला जाणारी उड्डाणे रद्द केली आहेत.

### डिझेल, पेट्रोलची अवैध वाहतूक

अवैधरित्या इंधनाची वाहतूक करून ते शहरातील एका पेट्रोलपंपावर विक्रीसाठी आणणार होते. या माहितीच्या आधारे पोलिसांनी दोन पथके तयार करून सेवाग्राम रोडवरील राजपाल पेट्रोलपंप परिसरात सापळा रचला. दरम्यान, एम.एच. ३२ ए.एस. ४८४३ क्रमांकाचे एक वाहन महिलाश्रम परिसराकडून पेट्रोलपंपाच्या दिशेने येताना दिसले. पोलिसांनी संशयावरून हे वाहन थांबवले आणि चालकाची चौकशी केली.

वाहनाची झडती घेतली असता पोलिसांना धक्कादायक प्रकार पाहायला मिळाला. वाहनामध्ये एकूण २० प्लास्टिकच्या डबक्यांमध्ये इंधनाचा साठा दडवून ठेवण्यात आला होता. यामध्ये २८० लिटर पेट्रोल (किंमत २९,१२० रुपये) आणि १२० लिटर डिझेल (किंमत १०,९२० रुपये) असा एकूण ४०,०४० रुपयांचा इंधन साठा आढळून आला. पोलिसांनी यासह वाहतुकीसाठी वापरलेले वाहन आणि मोबाईल असा एकूण ५ लाख ७३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी वाहन चालक समीर शकील शेख (वय २२, रा. सेलू) आणि रवींद्र विठ्ठलराव चोरे (वय ४५, रा. केळझर) यांना ताब्यात घेण्यात आले. अधिक चौकशी केली असता, हे आरोपी केळझर परिसरातील ढाब्यांवर थांबणाऱ्या टँकर चालकांकडून कमी भावात पेट्रोल-डिझेल खरेदी करत असत. हा साठा करून ते वर्ध्यातील राजपाल पेट्रोलपंपचे मालक गिरीश राजपाल (रा. मोहिनीनगर) यांना जास्त भावाने विकण्यासाठी आणत असल्याची कबुली त्यांनी दिली. हे आरोपी संगनमताने नियमितपणे अशा प्रकारे इंधनाची अवैध विक्री करत असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

या गंभीर प्रकरणी वर्धा शहर पोलिस ठाण्यात तिन्ही आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई जिल्हा पोलिस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल आणि अपर पोलिस अधीक्षक सदाशीव वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे निरीक्षक विनोद चौधरी, आशिषसिंह ठाकूर व त्यांच्या पथकाने यशस्वीरित्या पार पाडली.

### बांधकामाधीन इमारतीवरून ६ मजूर

मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात यावा. तसेच अशा घटना होऊ नयेत यासाठी महानगरपालिका व म्हाडा प्राधिकरणाने योग्य ती खबरदारी घ्यावी, असे निर्देश महापौर तावडे यांनी दिले.

पुलावरून सळई पडली; तरुण जखमी

मुंबई : शिवडी-वरळी पुलावरून शुक्रवारी रात्री एक सळई अंगावर पडल्याने २२ वर्षीय तरुण जखमी झाला. त्याच्यावर उपचार सुरू आहेत. गणेश विष्णू बुधाले (२२) असे त्याचे नाव आहे.

आचार्य दोंदे मार्ग परिसरातून हा तरुण जात होता. स्थानिकांनी त्याला ग्लेनीगल्स रुग्णालयात दाखल केले. याप्रकरणी एमएमआरडीएने प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार स्टप आणि कंत्राटदार जे कुमार प्रोजेक्टस या दोघांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे.

### अंजनगाव सुर्जी पंचायत समितीचे

शिक्षक मातोश्री देशमुख, आशिष किनेकर यांनी सीताबाई संगई शाळेतील कस्टडी रूम मध्ये भेट दिली असता परीक्षा संपल्यानंतर उत्तरपत्रिका मोजणीदरम्यान दोन उत्तरपत्रिका शिक्षण विभागाच्या पथकाला संशयास्पदरीत्या कमी आढळल्या.

तपासणीदरम्यान एका खाजगी कर्मचाऱ्याच्या शर्टाच्या आत दोन उत्तरपत्रिका लपविल्याचे आढळून आले. दोन्ही उत्तर पत्रिका भरारी पथकाने ताब्यात घेतल्या. दोन उत्तर पत्रिका या इसमाजवळ कशा आल्या याबाबत भरारी पथकाने गटशिक्षणाधिकारी सुधीर खोडे यांना विचारले असता त्यांनी मला माहीत नसल्याचे सांगितले. इंग्रजी व उर्दू माध्यमाचे अनुक्रमे एक- एक उत्तर पत्रिका गहाळ झाली होती. त्या उत्तर पत्रिका अनिल हाडोळे नामक व्यक्ती जवळ आढळल्या त्या ह्याच उत्तर पत्रिका होत्या याची खात्री झाल्याने तसेच उत्तर पत्रिका सील बंद करून पोस्ट ऑफिसला पोहोचण्याची संपूर्ण जबाबदारी परिरक्षक यांची असते. दिनांक २७ फेब्रुवारी रोजी इयत्ता दहावीचा इंग्रजी विषयाचा पेपर हा सकाळी ११ ते २ वाजून १० पर्यंत यावेळी घेण्यात आला तर संपूर्ण परीक्षा केंद्राचा पेपर DC कस्टडी केंद्रावर साधारणता ३ वाजून ३० मिनिट वाजेपर्यंत येणे अपेक्षित असते. त्यानंतर संपूर्ण उत्तर पत्रिका पाच ते साडेपाच पर्यंत सीलबंद होणे अपेक्षित असताना डीसी स्टडी रूमवर चार वाजून ४० मिनिटापर्यंत एकही उत्तर पत्रिका सीलबंद झाल्याचे दिसून आले नाही. यावरून डीसी मध्ये सुधीर खोडे परिरक्षक, (गटशिक्षणाधिकारी अंजनगाव पंचायत समिती), उपपरीक्षक सुशील कुमार अभ्यंकर हे प्रथम दर्शनी दोषी आढळून आले असल्याचे तसेच खासगी व्यक्ती अनिल हाडोळे हे सुद्धा दोषी असल्याचे आढळून आल्याने याबाबतचा अहवाल तातडीने दिनांक २८ फेब्रुवारी रोजी अध्यक्ष /सचिव महाराष्ट्र राज्य माध्यमिक उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ अमरावती यांना प्रत्यक्ष भेट अहवाल व जप्त केलेल्या दोन उत्तर पत्रिका सिलबंद करून दिल्याचे रजनी शिरभाते उपशिक्षणाधिकारी अमरावती यांनी पोलीस स्टेशनला दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे. सुधीर खोडे, सुशील कुमार अभ्यंकर, अनिल हाडोळे यांनी संगनमताने दोन अनोळखी विद्यार्थी यांना उत्तर पत्रिका सोडविण्यास परस्पर स्वाधीन करून बेकायदेशीर कृत्य केल्याने वरील तीन इसम व दोन अनोळखी विद्यार्थी यांच्यावर प्रचलित कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्याबाबत उपशिक्षणाधिकारी रजनी शिरभाते यांनी अंजनगाव सुर्जी पोलीस स्टेशनला दिनांक २७ फेब्रुवारी रोजी रात्री तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवरून अंजनगाव पोलिसांनी भादंवि कलम ३१६(५), ३१८(३)(४), ६१(२)(ँ) तसेच महाराष्ट्र विद्यापीठ मंडळ व इतर परीक्षांतील गैरप्रकार प्रतिबंध अधिनियम १९८२ अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. आरोपींमध्ये सुधीर खोडे (वय ५७) गटशिक्षणाधिकारी अंजनगाव पंचायत समिती, सुशील कुमार अभ्यंकर (वय ५५) शिक्षण विस्तार अधिकारी पंचायत समिती, अनिल हाडोळे (वय ४५) यांचा समावेश असून दोन अनोळखी विद्यार्थ्यांचाही शोध सुरू आहे. अंजनगाव पोलिसांनी सुधीर खोडे, व अनिल हाडोळे यांना अटक केली असून विस्तार अधिकारी सुशील कुमार अभ्यंकर फरार आहे. या प्रकरणाची अंजनगाव सुर्जी पोलिसांनी गंभीर दखल घेतली असून सखोल चौकशी पोलीस करीत आहे. गटशिक्षणाधिकाऱ्याच्या अटकेने संपूर्ण अंजनगाव तालुक्यात शिक्षण क्षेत्रात एकच खळबळ उडाली आहे. या घटनेमुळे परीक्षेच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असल्याची चर्चा जनतेत आहे.

**सखोल चौकशी करणार-**

याप्रकरणी सखोल चौकशी करून जे जे दोषी असतील त्यांच्यावर कार्यवाही करण्यात येईल. यानंतर असे चुकीचे गैरप्रकार करण्याचे कोणी धाडस करणार नाही.या प्रकरणातील सर्व बाबी तपासल्या जातील.

**-सुरज बोंडे, ठाणेदार अंजनगाव सुर्जी.**

### कर्जमुक्तीची आठवण व

गावांतून आदिवासी बांधवांना समज देणे, वाहनांची अडवणूक करणे, तपासणीच्या नावाखाली उगाच दिरंगाई करणे असे प्रकार घडल्याचेही समोर आले आहे. 'लोकशाही मार्गाने शांततेत काढली जाणारी पदयात्रा रोखण्यासाठी प्रशासनाने नोटीसांचा बडगा उगारला आहे,' असा रोखठोक आरोप करण्यात आला.

या यात्रेत ग्रामसभांमधून शेतकरी कर्जमाफी, मनरेगा कामे, मानव-वन्यप्राणी संघर्ष, वीज-पाणी-आरोग्य-शिक्षणाच्या मूलभूत सुविधा या प्रमुख मागण्यांवर ठोस निर्णयाची मागणी करण्यात येणार आहे. शासनाने आश्वासनांवर न थांबता तातडीने निर्णय घ्यावेत, अन्यथा जनतेचा रोष तीव्र होईल, असा इशाराही देण्यात आला आहे. 'नोटीस देऊन जनतेचा हक्क हिरावून घेता येणार नाही; मेळघाटाचा आवाज दाबण्याचा कोणताही प्रयत्न हाणून पाडला जाईल,' असे ठामपणे सांगत संघर्ष यात्रा समितीने ९ मार्च रोजी चिखलदरा येथे होणाऱ्या महाअंतिम सभेला मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे. 'आजपासून सुरू झालेली ही कर्जमुक्तीची आठवण व मेळघाट संघर्ष यात्रा ही जनतेच्या जगण्याच्या प्रश्नांसाठी आहे. नऊ अटींच्या नोटीसा देऊन आमचा आवाज दाबता येणार नाही. प्रशासनाची कोणतीही दडपशाही आम्ही सहन करणार नाही. आंदोलन करणे हा आमचा घटनात्मक अधिकार आहे आणि तो आम्ही बजावणारच.'

-बच्चू कडू, प्रहार प्रमुख

### महानगरपालिका क्षेत्रातील ६६६

उपस्थित होते. महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाच्या शासन निर्णय क्रमांक एमयुएन-२०१८/प्र.क्र.१९७/नवि-१८, दिनांक १७ नोव्हेंबर २०१८ अन्वये अशा प्रकारच्या अतिक्रमणांबाबत निर्णय घेण्यासाठी जिल्हास्तरीय समिती गठीत करण्यात आलेली आहे. सदर शासन निर्णयातील अटी व शर्तींच्या अधीन राहून महसूल विभागाच्या अखत्यारीतील शासकीय जमिनीवरील निवासी अतिक्रमणांना नियमानुकूल करण्याचा अधिकार समितीकडे आहे.

समितीपुढे वडरपुरा भाग १ व २, फ्रेजरपुरा, कुंभारवाडा, मोतीनगर (कंपासपुरा), माताफैल, माताखिडकी, इंदिरानगर (फ्रेजरपुरा), मसानगंज भाग २ (शासकीय जमीन), रमाबाई आंबेडकर नगर, राजमाता क्र. २, अण्णाभाऊ साठे नगर क्र. २, गांधी आश्रम, झाडीफैल आणि आनंद नगर या एकूण १५ झोपडपट्ट्यांमधील ६६६ अतिक्रमण धारकांची प्रकरणे अमरावती महानगरपालिकेमार्फत समितीसमोर सादर करण्यात आली होती.

प्रथम टप्प्यात प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत पात्र ठरणाऱ्या लाभार्थ्यांची बहुतांश घरे कच्ची स्वरूपाची असल्याने त्यांना नवीन पक्के घरकुल उभारण्यासाठी पात्रता देण्यात आली आहे. संबंधित विभागांच्या नाहरकती व अभिप्रायाच्या अधीन राहून प्रस्तावास मान्यता देण्यात आली आहे. सध्या प्रधानमंत्री आवास योजना २.० सुरू असून पात्र व गरजू लाभार्थ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी केले आहे. या निर्णयामुळे शहरातील झोपडपट्टीवासीयांना कायदेशीर संरक्षणासोबतच पक्क्या घरांचे स्वप्न साकार करण्याची मोठी संधी उपलब्ध झाली आहे.

### विहिरीत आढळला तरुणाचा

पोलिसांनी दिली. परिसरातील अलीकडील बेपत्ता व्यक्तींची माहिती तपासली जात होती. मृत व्यक्तीची ओळख पटविण्यासाठी नागरिकांना पुढाकार घेण्याचे आवाहन पोलिसांनी केले होते. दरम्यान एका व्यक्तीने मृताची ओळख पटविल्याची माहिती रात्री उशिरा पुढे आली.

### भरधाव ट्रकची दुचाकीला

हाताला गंभीर दुखापत झाली आहे. तर भयलू तोटे यांच्या डोक्याला जबर मार लागल्याने त्यांची प्रकृती चिंताजनक झाली आणि उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. या प्रकरणी अमोल बाबूलाल तोटे (वय २१, रा. डोमा, चिखलदरा) यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञात ट्रक चालकाविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे. अपघातानंतर चालक फरार झाल्याची माहिती असून पोलिसांनी त्याचा शोध सुरू केला आहे. दरम्यान, अमरावती-परतवाडा मार्गावरील वाढत्या अपघातांच्या पार्श्वभूमीवर वाहनचालकांनी वेगावर नियंत्रण ठेवावे, असे आवाहन करण्यात येत आहे. पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

### ८२ लाखांच्या गृहकर्ज

जीपीएफ प्रमाणपत्रे तयार करून गृहकर्जासाठी बँकेत सादर केली. तसेच शेगाव व मुंडेगाव येथील व्यक्तींच्या नावे प्लॉट खरेदीची खोटी इसारचिठ्ठी व विक्रीपत्र तयार करून त्याआधारे कर्ज मंजूर करून घेतले. कॅम्प शाखेतून ३८ लाख, पीडीएमएमसी शाखेतून ४४ लाख अशी एकुण ८२ लाखांची फसवणूक झाल्याचे दिसून आले. याशिवाय बनावट आधार-पॅन कार्ड तयार करून कोटक महेंद्र बँक, ॲक्सीस बँक, आणि अमरावती डीस्ट्रीक सेन्ट्रल को-ऑपरेटीव्ह बँक येथे तोतया व्यक्ती उभा करून खाती उघडण्यात आली व त्यांचा व्यवहारासाठी वापर करण्यात आल्याचे निदर्शनास आले.

**११ आरोपी निष्पन्न; ६ जण अटकेत-**

आर्थिक गुन्हे शाखेने आतापर्यंत एकूण ११ आरोपी निष्पन्न केले आहेत. त्यापैकी संजय दुर्योधन धंदर, सुनिल ओंकारराव धंदर, अतुल रमेश छापानी, सुमीत गंगाप्रसाद जयस्वाल, दिपक गेंदालाल गुप्ता व रोहन आनंदराव भोपळे यांना अटक करण्यात आली आहे. दोन आरोपींचा मृत्यू झाल्याची माहिती पोलिसांनी दिली. तपासाच्या पुढील टप्प्यात कागदपत्रे तयार करणारे व आर्थिक व्यवहारात सहभागी असलेले इतर संशयित समोर येण्याची शक्यता असून, आर्थिक गुन्हे शाखा सखोल चौकशी करीत आहे. ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला तसेच पोलिस उपायुक्त रमेश धुमाळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात येत असून वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाबाराव अवचार व त्यांच्या पथकाने तपासाची सूत्रे हाती घेतली आहेत.

### सणांच्या पार्श्वभूमीवर

विना हेल्मेट दुचाकीस्वार, ट्रिपल सीट प्रवास, सीट बेल्ट न लावणे, नो पार्किंगमध्ये वाहन उभे करणे तसेच मालवाहू वाहनांत धोकादायक पद्धतीने मजूर वाहतूक अशा प्रकारांवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले. एकूण १८९ प्रकरणे नोंदविण्यात आली. त्यामधून मोठ्या प्रमाणावर दंड वसूल करण्यात आला. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध पुढील काळातही अशाच कठोर कारवाया सुरू राहणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले. ही मोहीम जिल्हा वाहतूक शाखा, चांदूर बाजार पोलीस स्टेशन व वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली एपीआय शैलेश पांडे, पोलिस अमलदार शकुर शेख, अरविंद सरोदे आणि अखिलेश थोरात यांच्या पथकाने राबविली.

### एटीएम फसवणुकीचा

आणि ग्राहकाचे पैसे वाचले. पोलिसांनी तत्काळ बँक प्रशासनाशी संपर्क साधून सुरक्षा उपाययोजना वाढवण्याच्या सूचना दिल्या आहेत. तसेच परिसरातील एटीएम केंद्रांवर विशेष लक्ष ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. या घटनेमुळे शहरात एटीएम सुरक्षेचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे. फसवणूक करणारे टोळके आधी स्लॉटवर टेप लावून पैसे अडकवतात आणि ग्राहक निघून गेल्यानंतर अडकलेली रक्कम काढून घेतात, असा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे.

### आराधना शॉपिंग मॉलमधून

दुकान उघडल्यावर काउंटर क्रमांक १ आणि काउंटर क्रमांक २ मधील प्रत्येकी २१ हजार रुपये, असे एकूण ४२ हजार रुपये चोरीस गेल्याचे निदर्शनास आले. काउंटरमध्ये ठेवलेली रोकड अज्ञात व्यक्तीने लंपास केल्याचे स्पष्ट झाले. या घटनेनंतर फिर्यादीने तात्काळ नांदगाव पेठ पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार नोंदविली. पोलिसांनी भारतीय न्याय संहितेच्या संबंधित कलमान्वये घरफोडीचा गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. घटनास्थळी पाहणी करण्यात आली असून सीसीटीव्ही फुटेजची तपासणी केली जात आहे. परिसरातील हालचालींचा मागोवा घेत चोरट्याचा शोध सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

### तलवारींच्या धाकावर दहशत

हा फरार झाला होता. पोलिसांनी त्याचा शोध घेत सातत्याने तपास सुरू ठेवला होता. वरिष्ठ पोलीस निरीक्षक पुनीत कुलट यांच्या नेतृत्वाखाली पोलिस उपनिरीक्षक मिलिंद हिवरे, पोलिस अमलदार सागर सरदार, पवन तिवारी व दिनेश भिसे यांच्या पथकाने ही कारवाई यशस्वीरीत्या पार पाडली. या कारवाईसाठी पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त श्याम घुगे तसेच सहाय्यक पोलीस आयुक्त (राजापेठ विभाग) संजय खताळे यांचे मार्गदर्शन लाभले. दरम्यान, या अटकेमुळे परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले असून उर्वरित आरोपींच्या शोधासाठी पोलिसांची मोहीम सुरू असल्याची माहिती मिळाली आहे.

### मार्डी येथे गावठी दारू

हजार )रुपयाचा प्रोव्ही माल जप्त करून नष्ट करण्यात आला. सदर कार्यवाही एपीआय सचिन पवार ठाणेदार , पीएसआय विलास थुल, पोलीस अंमलदार सोमेश्वर सपाटे, रामेश्वर चव्हाण,अनिल निंघोट, हेमंत डाहाके, योगेश चौधरी, आणि होमगार्ड यांनी केली.

### महसूल वसुली पूर्ण

करण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांचा आढावा नियोजन भवनात घेण्यात आला. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र, धारणीचे उपविभागीय अधिकारी सिद्धार्थ शुक्ला, परीविक्षाधिन अधिकारी कौशल्या एम., अपर आयुक्त अजय लहाने, अतिरिक्त जिल्हाधिकारी गोविंद दानेज, निवासी उपजिल्हाधिकारी संतोष काकडे, सह जिल्हानिबंधक अनिल औतकर, जिल्हा भूमी अभिलेख अधिकारी महेश शिंदे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राहुल सातपुते आदी उपस्थित होते.

आयुक्त सिंघल यांनी, शासनाने लक्ष्यांक दिलेली महसूल वसुली पूर्ण करण्यासाठी वसुली करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा नियमित आढावा घेण्यात यावा. यासाठी नियोजन करण्यात यावे. ही वसुली होण्यासाठी उपविभागीय अधिकारी यांनी प्रकरण निहाय आढावा घ्यावा. भूसंपादनाची प्रक्रिया करताना पुनर्वसनावरही लक्ष देऊन पुनर्वसित गावाचे प्रश्न सोडविण्यात यावे. पुनर्वसित गावात करण्यात येणारी पायाभूत सुविधांची कामे चांगल्या दर्जाची होण्यासाठी प्रयत्न करावेत. ही कामे सुरू असताना या ठिकाणी भेटी देऊन कामाच्या गुणवत्तेची तपासणी करावी. ही कामे सुरू असताना पाहणी केल्यास यात काही सुधारणाही सांगण्यात यावी. प्रकल्पग्रस्तांना मोबदला देताना त्याचवेळी प्लॉटचे वाटप करण्यात यावे. याठिकाणी नागरी सुविधा एकत्रित पूर्ण करण्यात याव्यात. प्रकल्पग्रस्तांना योग्य मोबदला मिळावा, यासाठी व्हिडिओ आणि फोटो काढण्यात यावे. सिंचन प्रकल्प वेगाने पूर्ण होण्यासाठी प्रकल्पनिहाय आढावा घेण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. त्यासोबत पाणीपट्टी आणि करपट्टी वसुली करावी, अभियानात शिबिर आयोजित करण्याबाबत तालुकानिहाय आढावा घेण्यात आला. महाराजस्व अभियान राबवतेवेळी सर्व कार्यक्रमांची रील्सद्वारे जनजागृती करावी, असे निर्देशही त्यांनी यावेळी दिले.

### गल्फ देशांतील युद्धजन्य

, अमरावती जिल्हाधिकारी कार्यालय नियंत्रण कक्ष: ०७२१-२६६२०२५, पोलीस अधीक्षक कार्यालय (ग्रामीण) अमरावती: ७५८८४१०००० हेल्पलाईन जाहिर करण्यात आली आहे. जिल्हा प्रशासनाने परदेशात असलेल्या नागरिकांना खबरदारी घेण्याचे आवाहन केले आहे. यात सुरक्षित ठिकाणी राहावे आणि अनावश्यक हालचाल टाळावी. भारतीय दूतावासाच्या अधिकृत सूचनांचे काटेकोर पालन करावे. आपले लोकेशन आणि सद्यस्थिती कुटुंबीयांना सतत कळवत राहावी. आपले मोबाईल चार्ज ठेवावेत आणि सर्व आवश्यक कागदपत्रे सोबत ठेवावीत. सोशल मीडियावर कोणत्याही अफवा किंवा चुकीची माहिती पसरवू नये. संबंधित देशातील भारतीय दूतावासाकडे आपली नोंदणी करणे आवश्यक आहे, असे निवासी उपजिल्हाधिकारी संतोष काकडे यांनी कळविले आहे.

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

# ...तर इस्त्रायल-इराणचे युद्ध मोदी का थांबवू शकले नाहीत?

## संजय राऊत यांचा सवाल

**मुंबई-** इस्त्रायल-अमेरिका आणि इराणमध्ये घनघोर युद्धाला सुरुवात झाली आहे. दोन्ही बाजूने क्षेपणास्त्रांचा मारा केला जात असून जगावर तिसऱ्या युद्धाचे ढग जमा होऊ लागले आहेत. रविवारी इस्त्रायल-अमेरिकेने केलेल्या संयुक्त हल्ल्यात इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी मारले गेले. त्यानंतर इराणने आखाती देशातील अमेरिकन लष्करी तळांवर ड्रोन आणि क्षेपणास्त्रांनी हल्ला केला. यावरून आता शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) नेते, खासदार संजय राऊत यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि सरकारवर जोरदार हल्ला चढवला आहे.

रविवारी सकाळी माध्यमांशी बोलताना संजय राऊत म्हणाले की, इराण-इस्त्रायल आणि अमेरिकेच्या युद्धामध्ये इराणचे सर्वेसर्वा अयातुल्ला खामेनी आणि त्यांचे कुटुंब ठार झाले. मोदी दोन दिवसांपूर्वी इस्त्रायलमधून आले. भारताच्या जागतिक धोरणाला बसलेला हा धक्का आहे. इराणमध्ये ४० दिवसांचा शोक जाहीर केला आहे. इराण भारताचा मित्र होता, इस्त्रायलही आले. इराणने संकट काळात भारताला अनेकदा मदत केलेली आहे. कश्मीरच्या प्रश्नावर खुलेपणाने उभा राहिलेला देश म्हणजे इराण आहे. इराण भारताला अत्यंत स्वस्त दरामध्ये तेल देत होता. इराणने हे मैत्रीचे नाते कायम जपले. इराणने भारताशी कायम मित्रत्वाचे नाते ठेवले. या युद्धा संदर्भात भारताने एक भूमिका घेणे आवश्यक होते.

इराणवर बॉम्ब हल्ले झाले, लहान मुलांच्या हत्या झाल्या, खामेनींचे कुटुंब त्यांच्या नातवासह मारले गेले. भारताचे परराष्ट्र धोरण, नेतृत्व काय करत होते? हे युद्ध त्यांनाही थांबवता आले असते, असे भाजप-मोदींच्या समर्थकांचे म्हणणे आहे. जर भारत-पाकिस्तान युद्ध ट्रम्प थांबवू शकतात, तर इस्त्रायल-इराणचे युद्ध मोदी का थांबवू शकले नाहीत? याचे उत्तर भाजपने, सरकारने द्यावे अशी आमच्या सगळ्यांची अपेक्षा आहे, असे संजय राऊत म्हणाले.

जागतिक राजकारणासाठी आणि मध्य पूर्व आशियातील स्थैर्यासाठी अत्यंत वाईट घटना आहे. इराणचे कमजोर होणे हे भारतासाठीही अत्यंत घातक आहे. कारण ज्या पद्धतीने इराणवर अमेरिका आणि इस्त्रायल ताबा घेईल, हळूहळू ही पावलं भारताच्या दिशेने पडू शकतात. नेतन्याहू आज आहेत, उद्या नसतील. पण भारत हा महान देश आहे. आधीच मोदींनी अमेरिकेबरोबर केलेल्या ट्रेड डीलमुळे भारत हा अमेरिकेचा गुलाम झालेला आहे, असेही राऊत म्हणाले.



अफगाणिस्तान-पाकिस्तान युद्धामध्ये ट्रम्प पूर्णपणे पाकिस्तानला मदत करत आहेत. पाकिस्तानला अर्थसहाय्य, क्षेपणास्त्र, शस्त्र पुरवण्याचे काम ट्रम्प करत आहेत. प्रे. ट्रम्प यांनी पाकिस्तान-अफगाणिस्तान युद्धात पाकिस्तानचे पंतप्रधान आणि जनरलच्या शौर्याचे कौतुक केले आहे. याच्यावरही भारताच्या परराष्ट्र खात्याकडून साधे निषेधाचे शब्द बाहेर पडले नाहीत. मग भारताचे परराष्ट्र धोरण काय आहे? जागतिक भूमिका काय आहे? की फक्त परदेशात जाऊन फिरायचे आणि नेत्यांना मिठ्या मारून फोटो काढायचे हेच आहे का? असा सवाल राऊत यांनी केला.

पाकिस्तान-अफगाणिस्तान, इराण-इस्त्रायल, इराण-दुबई, इराण आणि अमेरिका हे युद्ध भारताच्या दारापर्यंत आले आहे. या युद्धामुळे भारताची आर्थिक व्यवस्था कोलमडण्याची शक्यता आहे. या युद्धामुळे हिंदुस्थानच्या सीमेवरील भूगोल बदलण्याची शक्यता आहे आणि या युद्धामुळे भारताला चटके बसण्याची शक्यता आहे. तरीही मोदी या युद्ध काळात इस्त्रायलला गेले आणि दुसऱ्या दिवशी इराणवर बॉम्ब पडले. जागतिक स्तरावर भारताची नाचक्की झाली आहे, असेही राऊत यावेळी म्हणाले.

# शक्तिपीठ महामार्गाच्या मोजणीस येणाऱ्यांना तुडवून हाणा – राजू शेट्टी

**नागपूर-** गोवा शक्तिपीठ महामार्गासाठी डोंगराएवढे भराव टाकल्याने गावांना, शहरांना महापुराचा धोका बसणार आहे. शेतात ४-५ महिने पाणी साठून राहिल्याने शेती, शेतकरी उद्ध्वस्त होणार आहेत. शक्तिपीठसाठी ६५ हजार कोटी रुपयांचा जादा खर्च दाखवला आहे. रस्त्याच्या प्रक्रियेत कमालीची गुप्तता पाळली आहे. आता, रस्त्यासाठी जमीन मोजणीसाठी कोणी आले तर त्यांना तुडवून हाणा, असे आवाहन माजी खासदार राजू शेट्टी यांनी केले.



'शक्तिपीठ महामार्ग रद्द करावा', या मागणीसाठी ईश्वरपूर तहसील कार्यालयावर राजू शेट्टी, भारत पाटणकर, धनाजी गुरव यांच्या नेतृत्वाखाली मोर्चा काढण्यात आला. श्रमिक मुक्ती दल, मराठा क्रांती मोर्चा, राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्ष, स्वाभिमानी शेतकरी संघटना, दलित महासंघ, प्रहार संघटना, बळीराजा शेतकरी संघटना आदी पक्ष, संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते, शेतकरी मोर्चात सहभागी झाले होते. मागण्याचे निवेदन तहसीलदार सारिका रासकर यांना देण्यात आले.शेट्टी म्हणाले, शक्तिपीठ महामार्गासाठी १२४ कोटी रुपये प्रतिकिलो मीटर खर्च आहे. इतर रस्त्यांची तुलना करता ६५ हजार कोटी रुपये अधिक खर्च दाखवला आहे. सरकारला जादा पैशातून २०२९ ची निवडणूक लढवायची आहे. मतासाठी ५ ते ७ हजार रुपयेदेखील वाटले जातील, असा हल्लाबोल त्यांनी केला.

# समृद्धी महामार्गावरील सुरक्षिततेसाठी एआय प्रणाली

**मुंबई-** समृद्धी महामार्गावरील सुरक्षित प्रवास आणि अपघातांची संख्या कमी करण्यासाठी देशातील पहिली एआय-आधारित 'इंटेलिजेंट ट्रान्सपोर्टेशन' प्रणाली कार्यान्वित करण्यात आली आहे. या प्रणालीद्वारे वाहनांच्या वेगावर नियंत्रण येणार असून वाहतूक व्यवस्थापन अधिक सक्षम होऊन भविष्यात अपघातांचे प्रमाण घटण्यास मदत होईल, अशी माहिती राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी विधान परिषदेत दिली.



समृद्धी महामार्गावरील अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी कोणती उपाययोजना करण्यात आली आहे, यासंदर्भात सुधाकर आडबाले यांनी तारांकित प्रश्न विचारला होता. समृद्धी महामार्गावरील सुरक्षित प्रवासासाठी मानांकनानुसार सर्व आवश्यक उपाययोजना करण्यात येत आहे. या महामार्गावर क्रॅश बॅरियर्स, रबर स्ट्रिप्स, साईनबोर्ड आदी सुविधा बसविण्यात आल्या आहेत. तसेच महामार्गावर नियमित पोलीस पेट्रोलिंग तसेच ॲम्बुलन्स पेट्रोलिंग सुरू असून आपत्कालीन परिस्थितीसाठी स्वतंत्र ॲम्बुलन्सची व्यवस्था करण्यात आली आहे. याशिवाय २१ क्यूआरव्ही (क्विक रिस्पॉन्स व्हेईकल) पथके कार्यान्वित असल्याचेही राज्यमंत्र्यांनी सांगितले.

भिवंडी–ठाणे मार्गाचे काम सुरू असून ठाणे-मुंबई उन्नत मार्ग समृद्धी महामार्गाला जोडला जाणार आहे. प्रवास गतिमान करण्यासाठी विविध जोडरस्त्यांचे नियोजन करण्यात आले आहे. तसेच छेडानगर ते आनंदनगर तसेच ठाणे ते मुंबई दरम्यानचे रस्ते विकसित करण्यासाठी बांधा वापरा हस्तांतरित करा (बीओटी) तत्त्वावर किंवा इतर माध्यमांतून निधी उभारण्याचे पर्याय तपासले जात आहेत. आवश्यक निधी उपलब्ध करून प्रकल्प लवकरात लवकर कार्यान्वित करण्यात येईल, अशीही माहिती राज्यमंत्री साकोरे-बोर्डीकर यांनी दिली.

# राज्यसभेच्या सातही जागांवर उमेदवार उतरवा

## अमित शाहांच्या थेट सूचना, अतिरिक्त २० मतांसाठी महायुतीची जुळवाजुळव



**मुंबई-** महाराष्ट्रातील राज्यसभेच्या सात जागांसाठी १६ मार्च रोजी होणाऱ्या निवडणुकीत, सर्वाधिक तीन ते चार जागा जिंकण्याइतके आमदार संख्याबळ असलेल्या भाजपकडून केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांच्या व्यतिरिक्त आश्चर्याचा धक्का देणारी नावे जाहीर होऊ शकतात. यात एका अमराठी नेत्याच्या नावाचीही चर्चा आहे. विरोधकांच्या महाविकास आघाडीत उमेदवारीवरून झालेले वाद पाहता, पहिल्या टप्प्यात सहा जागांवर विजयाची खात्री असलेली सत्ताधारी महायुती ऐन वेळी सातव्या जागेसाठीही उमेदवार उतरवण्याची शक्यता आहे.

राज्यसभेसाठी भाजपकडून चार उमेदवारांची नावे ठरवण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निवासस्थानी राज्य सुकाणू समितीची नुकतीच बैठक झाली. त्यात निश्चित झालेल्या नावांबाबत भाजपाध्यक्ष नितीन नवीन यांच्याशी प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण व राज्यातील नेते चर्चा करण्याची शक्यता आहे. येत्या एक-दोन दिवसांत भाजपचे राज्यातील उमेदवार जाहीर होऊ शकतात.

परराष्ट्रमंत्री एस जयशंकर, अर्थमंत्री निर्मला सीतारामन, आठवले या वरिष्ठ मंत्र्यांचे अपवाद वगळता भाजप राज्यसभेसाठी एका नेत्याला दुसऱ्यांदा संधी देत नाही. किंबहुना महाराष्ट्र, गुजरात, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेशासारख्या राज्यांबाबत पक्षाने धोरण म्हणूनच तसे ठरविल्याचे पूर्वीची उदाहरणे सांगतात. माजी अर्थ राज्यमंत्री भागवत कराड याला अपवाद ठरणार का, असा प्रश्न यावेळी आहे. कराड, रावसाहेब दानवे व धैर्यशील पाटील यांना राज्यात काम करण्यास सांगितले जाऊ शकते, असे सूत्रांनी सांगितले.

भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे व राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांचीही नावे चर्चेत आहेत. तावडे स्वतः महाराष्ट्रातून राज्यसभेवर येण्यास कितपत उत्सुक आहेत, हाही प्रश्न कायम आहे. भाजप उमेदवारांची नावे वरिष्ठ पातळीवर निश्चित झाल्याचेही सूत्रांनी स्पष्ट केले. यात एका अमराठी नेत्याचेही नाव असल्याची चर्चा आहे.

# २० जिल्हा परिषदांच्या निवडणुका अधांतरी

## सर्वोच्च न्यायालयात पुढील सुनावणी जुलैमध्ये

**मुंबईः** आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा ओलांडलेल्या राज्यातील २० जिल्हा परिषदा व त्या अंतर्गत येणाऱ्या पंचायत समित्यांच्या निवडणुका पुढील आदेश होईपर्यंत जाहीर करू नये, असे सर्वोच्च न्यायालयाने आदेश दिला आहे. या याचिकेवरील पुढील सुनावणी २१ जुलै रोजी होणार असल्याने निवडणुका घेण्याचा आदेश सर्वोच्च न्यायलयाने दिला तरी या सर्व निवडणुका पावसाळ्यानंतरच ऑक्टोबर वा नोव्हेंबरमध्ये होण्याची अधिक शक्यता आहे.

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या गेल्या पाच वर्षापासून रखडलेल्या निवडणूका मार्गी लावताना ५० टक्के आरक्षणाची मर्यादा पाळणाऱ्या महापालिका, जिल्हा परिषदांच्या निवडणुका घेण्याचे आदेश राज्य निवडणूक आयोगास दिले होते. त्यानुसार राज्य निवडणूक आयोगाने ४२ नगरपंचायती, २४६ नगरपालिकांसह २९ महापालिका आणि १२ जिल्हा परिषदा व त्या अंतर्गत येणाऱ्या पंचायत समित्यांच्या निवडणुकांची प्रक्रिया पूर्ण केली आहे. त्यानंतर आता विदर्भ आणि मराठवाड्यातील उर्वरित २० जिल्हा परिषदांच्या निवडणुका घेण्यासाठी राज्य सरकारने प्रयत्न सुरू केले होते. त्यानुसार २३ फेब्रुवारी रोजी



सर्वोच्च न्यायालयात झालेल्या सुनावणीदरम्यान सरकारने शिल्लक राहिलेल्या २० जिल्हा परिषदांच्या निवडणुका होऊ देण्याची न्यायालयास विनंती केली.

मात्र स्थानिक स्वराज्य संस्थामंधील ५० टक्के आरक्षण मर्यादेचे उल्लंघन झाल्याचा मुद्दा निकाली लागेपर्यंत जिल्हा परिषदांच्या निवडणुका घेऊ नका, असे आदेश सर्वोच्च न्यायालयाने काही दिवसांपूर्वीच दिले होते. त्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने ५० टक्के आरक्षण उल्लंघनाचा मुद्दा निकाली काढण्यासाठी सरन्यायाधीश सुर्य कांत यांच्या अध्यक्षतेखाली न्या.जॉयमाल्या बागची, न्या. विपूल पांचोली अशा तीन न्यायाधिशांचे खंडपीठ गठीत केले आहे. या खंडपीठासमोर आता २१ आणि २२ जुलै रोजी ५० टक्के आरक्षण मर्यादेच्या उल्लंघनाबाबत सुनावणी घेण्याचे न्यायालयाने जाहीर केले आहे. त्यामुळे ही सुनावणी पूर्ण होऊन निकाल लागेपर्यंत जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांच्या निवडणुका होऊ शकणार नाहीत. जुलै, आगस्ट दरम्यान याचा निकाल लागला तरी पावसांमुळे या निवडणुका ऑक्टोबर-नोव्हेंबर पर्यंत होऊ शकणार नाहीत अशी माहिती आयोगातील सूत्रांनी दिली.

# ठाणे, पालघरमधील आदिवासी वसतिगृहांचा आहार भत्ता रखडल्याने विद्यार्थ्यांची उपासमार

## सत्ताधाऱ्यांकडूनच सरकारची पोलखोल

**मुंबई-** ठाणे व पालघर जिह्यातील आदिवासी विकास विभागाअंतर्गत उभारलेल्या वसतिगृहातील विद्यार्थ्यांना राज्य सरकारकडून देण्यात येणारा आहार भत्ता दोन ते तीन महिने विलंबाने मिळत असल्याने विद्यार्थ्यांवर अक्षरशः उपासमारीची वेळ येत असल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. याबाबत सत्ताधारी पक्षाच्याच आमदार मनीषा कायंदे यांनी प्रश्न उपस्थित करून सरकारच्या निष्क्रियतेबाबत घरचा आहेर दिला आहे.

ठाणे व पालघर जिल्हय़ात आदिवासी विकास विभागाच्या माध्यमातून उभारलेल्या वसतिगृहातील विद्यार्थ्यांना आहार भत्ता विलंबाने मिळत असल्याच्या निषेधार्थ गेल्याच महिन्यात आदिवासी विद्यार्थी पृती समितीने ठाणे आदिवासी विभाग अपर आयुक्त कार्यालयावर धडक आंदोलन करीत 'भीक मांगो' आंदोलन केले होते. विशेष म्हणजे, अनुसूचित जमातीमधील विद्यार्थ्यांना सुधारित दराने आहार भत्ता मिळावा यासाठी नवीन शासन निर्णयही निर्गमित करण्यात आला, मात्र त्याची अंमलबजावणी अद्याप झालेली नाही. या प्रश्नामुळे विद्यार्थाची फरफट होत असल्याचे कायंदे यांनी स्पष्ट केले आहे. या सर्व गोष्टी सत्य असल्याची कबुलीच आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांनी दिलेल्या लेखी उत्तरात दिली आहे.



सरकार म्हणते, वाढीव भत्ता देणार!

४ जुलै २०२५ च्या शासन निर्णयानुसार शासकीय वसतिगृहात राहणा?या आदिवासी विद्यार्थ्यांचा निर्वाह भत्ता, शैक्षणिक साहित्य खरेदी भत्ता, आहार भत्ता यामध्ये वाढ करण्यात आली आहे. मात्र सुधारित भत्ता अदा करण्याचा टॅब उपलब्ध नसल्याने सदर देयके जुन्याच दराने वितरित केल्याचे लेखी उत्तर सरकारने दिले आहे. मात्र आता 'स्वयम महाऑनलाइन' या पोर्टलवर ऑरिअर्स हा टॅब आता उपलब्ध झाल्यामुळे वाढीव दराचा फायदा विद्यार्थ्यांना अदा करण्यात येईल, असेही सरकारकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

## संक्षिप्त

### विमानतळावर हाय अलर्ट

**दिल्ली-** इराण आणि इस्त्रायलमधील वाढत्या तणावपूर्ण परिस्थितीमुळे दिल्लीतील इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावर प्रवाशांसाठी तातडीची नियमावली जारी करण्यात आली आहे. शनिवारपासून सुरू असलेल्या हल्ल्यामुळे अनेक महत्त्वाची विमानतळ बंद करण्यात आली असून अनेक आंतरराष्ट्रीय उड्डाणे रद्द करण्यात आली आहेत. तर काहींचे मार्ग बदलण्यात आले आहेत. दिल्ली विमानतळ प्रशासनाने प्रवाशांना विनंती केली आहे की, त्यांनी विमानतळावर येण्यापूर्वी आपल्या संबंधित एअरलाईन्सशी संपर्क साधून फ्लाइटच्या स्थितीची खात्री करून घ्यावी.युद्धामुळे उद्भवलेल्या धोक्याची दखल घेत नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाने हिंदुस्थानी विमान कंपन्यांना इराण, सौदी अरेबिया आणि यूएईसह ११ देशांच्या हवाई क्षेत्राचा वापर टाळण्याचा सल्ला दिला आहे. यामुळे दिल्लीहून लंडन, न्यूयॉर्क आणि पॅरिस सारख्या शहरांकडे जाणाऱ्या विमानांना मोठा वळसा घालून प्रवास करावा लागणार आहे. या बदलामुळे प्रवासाचा वेळ २ ते ३ तासांनी वाढण्याची शक्यता आहे. याचा थेट परिणाम प्रवाशांच्या खिशावर होणार आहे. प्रवासातील वेळ वाढल्यामुळे इंधनाच्या खर्चातही वाढ होत असल्याने विमान प्रवासाचे दरही वाढू शकतात.एअर इंडिया आणि इंडिगो सारख्या प्रमुख कंपन्यांनी आपल्या सर्व सेवा १ मार्च २०२६ पर्यंत स्थगित केल्या आहेत. दिल्लीहून तेल अवीवसाठी रवाना झालेले एअर इंडियाचे विमान हवाई क्षेत्र बंद झाल्याने अर्ध्या वाटेतूनच मुंबईकडे वळवण्यात आले. या संकटामुळे दिल्ली विमानतळावर प्रवाशांची मोठी गर्दी पाहायला मिळत असून, अनेक प्रवाशांना आपल्या नियोजित सहली रद्द कराव्या लागल्या आहेत.




### मराठी कुटुंब दुबईत अडकले

**पुणे-** अण्वस्त्रनिर्मिती रोखण्यासाठी करार करण्याकरिता चर्चेच्या तीन फेऱ्या अपयशी ठरल्यानंतर अमेरिका आणि इस्त्रायलने शनिवारी इराणवर जोरदार हल्ले चढविले. या हल्ल्यात इराणमध्ये २०० पेक्षा अधिक जण ठार झाले. दक्षिण इराणमध्ये मिनाब येथे शाळेला लक्ष्य करण्यात आले, यात ८५ विद्यार्थिनींचा मृत्यू झाला. या हल्ल्यांना प्रत्युत्तर देत इराणने इस्त्रायलसह आठ देशांवर प्रतिहल्ले केले. यामुळे अनेक विमानसेवा बंद करण्यात आल्या आहेत. दुबईसह अनेक ठिकाणी भारतीय अडकले आहेत. भारतात सुरक्षित परत येण्यासाठी केंद्र सरकारला साद घातली जात आहे. भारताचे परराष्ट्रमंत्री एस जयशंकर यांनी इस्त्रायल आणि इराणच्या परराष्ट्रमंत्र्यांशी फोनद्वारे संवाद साधला आहे.राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी एक्सवर एक पोस्ट करत मराठी कुटुंब अडल्याची माहिती दिली. पुण्यातील अभिषेक कलंत्री, नम्रता कलंत्री आणि मिराया कलंत्री सध्या दुबईमध्ये अडकले आहेत आणि त्यांना तातडीने मदतीची आवश्यकता आहे. परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर, परराष्ट्र मंत्रालय आणि दुबईतील भारतीय दूतावास यांना विनंती आहे की, कृपया आवश्यक ती मदत द्यावी आणि त्यांना लवकरात लवकर भारतात सुरक्षित परतण्याची सोय करावी, असे सुप्रिया सुळे यांनी म्हटले आहे.

### भारतीय बॅडमिंटनची सुवर्णकन्या अडकली दुबई विमानतळावर

**दिल्ली-** भारतीय बॅडमिंटनची सुवर्णकन्या आणि दोन वेळा ऑलिंपिक पदक विजेती बॅडमिंटनपटू पीव्ही सिंधू शनिवारी (२८ फेब्रुवारी) इंग्लंडमधील बर्मिंगहॅमला जात असताना दुबई विमानतळावर अडकली होती. इराण आणि अमेरिका-इस्त्रायलमधील वाढत्या तणावामुळे विमान वाहतूक थांबवण्यात आली होती. सिंधू प्रतिष्ठित ऑल-इंग्लंड बॅडमिंटन चॅम्पियनशिपमध्ये सहभागी होण्यासाठी बर्मिंगहॅमला जात होती. त्यानंतर सिंधूने सोशल मीडियावर एक पोस्ट शेअर केली, ज्यामध्ये तिच्या प्रकृतीबद्दल अपडेट देण्यात आली आणि ती सध्या सुरक्षित असल्याचे सांगितले.



### फेब्रुवारीतच मे महिन्याचा चटका

**मुंबई-** राज्यात फेब्रुवारी महिना संपत असतानाच कडक उन्हाचा तडाखा जाणवू लागला आहे. सकाळपासूनच पडणाऱ्या तीव्र उन्हामुळे मे महिन्यासारखा अनुभव येत असून, या बदलत्या हवामानाचा थेट परिणाम आपल्या आरोग्यावर होत आहे. हिवाळा सरता सरता सुरू झालेल्या या उष्म्यामुळे थकवा आणि डिहायड्रेशनच्या तक्रारी वाढल्या आहेत.



### १३ महिन्यांच्या चिमुकलीचा गळा आवळून केले सात तुकडे

**तामलवाडी(जि. धाराशिव)-** अत्यंत थरकाप उडवणारी अन् माणुसकीला काळीमा फासणारी घटना तुळजापूर तालुक्यातील गवळेवाडी शिवारात उघडकीस आली आहे. अवघ्या १३ महिन्यांच्या निष्पाप बालिकेची तिच्याच सख्ख्या चुलत्याने गळा आवळून हत्या केली आणि रागाच्या भरात सत्तुराने शरीराचे सात तुकडे करून शेतात पुरले. ही हृदयद्रावक घटना शनिवारी रात्री उघडकीस आली असून, तामलवाडी पोलिसांनी नराधम चुलत्याला बेड्या ठोकल्या आहेत.मिळालेल्या माहितीनुसार, गवळेवाडी येथील महादेव माने यांची १३ महिन्यांची मुलगी आराध्या ही २७ फेब्रुवारी रोजी पहाटे अचानक बेपत्ता झाली होती. २८ फेब्रुवारी रोजी वडील महादेव माने यांनी तामलवाडी पोलीस ठाण्यात मुलगी बेपत्ता असल्याची तक्रार दिली. पोलिसांनी भारतीय न्याय संहिता कलम १३७ (२) नुसार अपहरणाचा गुन्हा दाखल करून तपास सुरू केला. तपासादरम्यान सपोनि गोकुळ ठाकूर यांना गोपनीय बातमीदाराकडून माहिती मिळाली की, मुलगी बेपत्ता झाली, त्या दिवशी तिचा चुलता शंकेश माने हा तिला घेऊन जाताना दिसला होता. पोलिसांनी संशयावरून शंकेश माने याला ताब्यात घेऊन खाक्या दाखवताच त्याने गुन्ह्याची कबुली दिली, जी ऐकून पोलीसही हादरले.

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक ९५ ■ सोमवार, २ मार्च २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


# पेट्रोलपंपाच्या आड काळाबाजाराचा खेळ; तिघांविरुद्ध गुन्हा दाखल

## महिला आश्रम परिसरात अवैध पेट्रोल-डिझेल रॅकेट उघड

### ५.७३ लाखांचा मुद्देमाल जप्त

**वर्धा जनमाध्यम :** शहराच्या मध्यवर्ती भागात पेट्रोल-डिझेलचा काळाबाजार सुरू असल्याची धक्कादायक बाब स्थानिक गुन्हे शाखेच्या कारवाईत उघडकीस आली. महिला आश्रम परिसरात सापळा रचून पोलिसांनी अवैधरित्या इंधन वाहतूक करणारी चारचाकी पकडत तब्बल ५ लाख ७३ हजार ४० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी पेट्रोलपंप मालकासह तिघांविरुद्ध गुन्हा दाखल झाल्याने शहरात एकच खळबळ उडाली आहे.



गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी सेवाग्राम रोडवरील राजपाल पेट्रोलपंप जवळ दबा धरला. काही वेळातच संशयित मारुती सुझुकी ईको (एमएच-३२ एएस-४८४३) वाहन तेथे पोहोचले. तपासणी केली असता वाहनातून २८० लिटर पेट्रोल, १२० लिटर डिझेल, २० प्लास्टिक डबे, दोन मोबाईल व चारचाकी वाहन असा मोठा साठा आढळून आला.

आरोपी समीर शकील शेख (रा. सेलू) व रविंद्र विठ्ठलराव चोरे (रा. केळझर) यांच्याकडे कोणताही वैध परवाना किंवा खरेदीची पावती नव्हती. चौकशीत त्यांनी टँकर चालकांकडून कमी दरात इंधन खरेदी करून ते जास्त दरात विक्रीसाठी आणल्याची कबुली दिली. या व्यवहारात पेट्रोलपंप मालक गिरीश राजपाल यांचा सहभाग असल्याची माहिती समोर आली आहे.या प्रकरणी वर्धा शहर पोलीस स्टेशन येथे जीवनावश्यक वस्तू अधिनियम, पेट्रोलियम अधिनियम व मोटार वाहन कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल व अपर पोलीस अधीक्षक सदाशीव वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने ही धडक कारवाई केली. इंधनाच्या काळ्या बाजाराला खतपाणी घालणाऱ्यांवर पोलिसांनी दिलेला हा जोरदार दणका असून, शहरातील अवैध इंधन साखळीचा आता अधिक तपास होणार असल्याचे संकेत आहेत.

# पवनारमध्ये महिलांच्या हाताला उद्योगाची नवी ताकद

## डॉ.भोयर यांच्या हस्ते 'उजास ग्रीन पॅड' युनिटचे लोकार्पण

**वर्धा जनमाध्यम –** स्वावलंबनाच्या दिशेने महिलांनी टाकलेले ठाम पाऊल आज पवनार येथे साकार झाले. आदित्य बिर्ला एज्युकेशन ट्रस्ट, उमेद, वर्धिनी व क्षितीज महिला प्रभाग संघ यांच्या संयुक्त विद्यमाने महिला बचतगट भवनात 'उजास ग्रीन पॅड' युनिटची मुहूर्तमेढ रोवण्यात आली. या युनिटचे उद्‌घाटन पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या हस्ते झाले.



या प्रसंगी बोलताना त्यांनी सांगितले की, या युनिटमुळे बचतगटातील महिलांना रोजगाराची शाश्वत संधी मिळणार असून उत्पन्नाचे सक्षम साधन त्यांच्या हाती येईल. उद्योगाच्या माध्यमातून महिला सक्षमीकरणाची चळवळ अधिक बळकट होईल.

जिल्ह्यात प्रथमच महिला बचतगटाच्या माध्यमातून पुनर्वापरयुक्त, रसायनमुक्त सॅनेटरी पॅड निर्मिती युनिट उभारण्यात आले आहे. त्यामुळे बचतभवनाचा उद्योग क्षेत्रात समावेश झाला असून उमेदच्या चळवळीला नवे यश मिळणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

राज्यातील महिला बचतगटांना बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 'उमेद मॉल' उभारण्यास मान्यता दिली आहे. विदर्भात वर्धा येथे सुमारे २० कोटी रुपयांच्या खर्चातून हा मॉल उभारला जाणार आहे. या मॉलमध्ये उमेदअंतर्गत तयार होणारी सर्व उत्पादने ग्राहकांना एकाच छताखाली उपलब्ध होतील. बचतगटांनी बाजारातील स्पर्धेला तोंड देण्यासाठी पॅकेजिंग व मार्केटिंगवर विशेष भर द्यावा, असे आवाहनही त्यांनी केले.

कार्यक्रमात मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण, ट्रस्टच्या महाव्यवस्थापक पुनम पाटकर, पुनम ढोबळे, महिला शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा शितल भोयर, उमेदचे जिल्हा अभियान व्यवस्थापक निरज नखाते, क्षितीज प्रभाग संघाच्या अध्यक्षा सिमा ठाकूर आदी उपस्थित होते.

प्रास्ताविकात पुनम पाटकर यांनी ट्रस्टमार्फत राबविण्यात येणाऱ्या मासिक पाळी व्यवस्थापन जनजागृती उपक्रमांची माहिती दिली. रसायनमुक्त सॅनेटरी पॅडच्या उपयुक्ततेबाबत मार्गदर्शन करत महिलांच्या आरोग्यजागृतीचा ध्यास ट्रस्टने घेतल्याचे त्यांनी स्पष्ट केले.फित कापून 'उजास ग्रीन पॅड' युनिटचे उद्‌घाटन होताच महिलांच्या चेहऱ्यावर समाधानाची झळाळी उमटली. पवनारच्या मातीतून आता स्वावलंबनाचा उजास अधिक तेजाने झळकणार आहे.

# देववाडी जंगलात भीषण आग; दोन मजुरांच्या धाडसाने टळला मोठा अनर्थ

## -वनविभागाचा बेपत्ता कारभार पुन्हा ऐरणीवर

**आष्टी (शहीद), जनमाध्यम :**आष्टी तालुक्यातील इंदरमारी परिसरात, सारवाडी गावाजवळील देववाडी जंगलात रविवारी दुपारी एकच्या सुमारास भीषण आग लागल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६ ला लागून असलेल्या या जंगलाने काही क्षणांत रौद्र रूप धारण केले. आगीचे काळे लोळ आकाशात झेपावत होते आणि ती शेतशिवार व पारधी तांडा वस्तीकडे सरकणार की काय, अशी भीती निर्माण झाली होती.

ही आग तळेगाव ग्रामपंचायत हद्दीत, तळेगाव वनविभाग अंतर्गत येणाऱ्या जंगलात लागली. देववाडी गावाच्या शिवारात अज्ञात व्यक्तीने आग लावल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. दुपारच्या कडक उन्हामुळे आगीने क्षणातच उग्र रूप धारण केले. वन्य प्राणी जीव मुठीत धरून सैरावैरा पळताना दिसत होते.



दरम्यान, जवळच काम करणाऱ्या दोन मजुरांनी प्रसंगावधान राखत आग विझविण्याची यंत्रणा पाठीवर घेत थेट घटनास्थळी धाव घेतली. जीवाची पर्वा न करता त्यांनी आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. त्यांच्या धाडसामुळे संभाव्य मोठी दुर्घटना टळली. हा थरारक प्रसंग कॅमेऱ्यातही कैद झाला आहे.

मात्र, सुट्टीचा दिवस असल्याने वनविभागाचे बिट गार्ड व वनपाल घटनास्थळी अनुपस्थित होते, अशी चर्चा रंगली आहे. उन्हाळा चढत असताना जंगलात आगीच्या घटना वारंवार घडत आहेत. अशा वेळी नियमित गस्त व सतर्कता आवश्यक असताना यंत्रणा रामभरोसे असल्याची भावना नागरिकांतून व्यक्त होत आहे.

वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या प्रकाराची गंभीर दखल घेऊन जबाबदाऱ्यांकडे दुर्लक्ष करणाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी ग्रामस्थांतून होत आहे. दोन मजुरांच्या धाडसाने आज जंगल आणि वस्ती वाचली; पण उद्या पुन्हा अशीच वेळ आली तर जबाबदारी कोण घेणार, हा प्रश्न अनुत्तरितच आहे.

# ऑटो उभा करण्याच्या वादातून चाकूहल्ला; एक गंभीर

**वर्धा जनमाध्यम :**रेल्वे स्थानक गेटसमोरील परिसरात ऑटो उभा करण्याच्या कारणावरून झालेल्या वादाचे रूपांतर प्राणघातक हल्ल्यात झाले. या घटनेत एक जण गंभीर जखमी झाला असून दुसरा थोडक्यात बचावला आहे.

माहितीनुसार, इतवारा बाजार येथील शेख शानू शेख जब्बार व त्यांचा भाऊ सोनू हे दोघे वर्धा ते सेवाग्राम दरम्यान ऑटो चालवतात. रेल्वे स्थानक गेट परिसरात रंगरंगोटीचे काम सुरू असल्याने संबंधित कामगारांनी वाहनधारकांना ऑटो दूर करण्यास सांगितले. त्यावेळी जावेद उपस्थित नसल्याने त्याचा ऑटो इतरत्र हलविण्यात आला. काही वेळाने परत आलेल्या जावेदने ऑटो हलविल्याच्या कारणावरून शिवीगाळ केली. यावेळी सोनू व जावेद यांच्यात वाद झाला. वाद वाढल्यानंतर शेख जावेद शेख शाकीर व शेख रहिम शेख शाकीर (रा. इतवारा बाजार) यांनी सोनूवर चाकूने वार केल्याचे सांगितले जाते. यात सोनू गंभीर जखमी झाला. तसेच सत्तूरने केलेला वार दुसऱ्या व्यक्तीने चुकविल्याने मोठा अनर्थ टळला. जखमीस तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्याच्यावर उपचार सुरू आहेत. याप्रकरणी शहर पोलीस ठाण्यात दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

# वादळी पावसाचा तडाखा; गारपीटीने शेतकरी पुन्हा उद्ध्वस्त

## तात्काळ पंचनाम्यांचे आदेश द्या : खा. अमर काळे यांचे जिल्हाधिकाऱ्यांना पत्र

**वर्धा जनमाध्यम :** हातातोंडाशी आलेला घास अकाली पाऊस आणि गारपीटीने हिरावून घेतला. जिल्ह्यात नुकत्याच झालेल्या वादळी पावसाने शेतकऱ्यांच्या कष्टांवर अक्षरशः पाणी फेरले आहे. तुरीच्या गंजी शेतात होत्या, चन्याची संवगणी करून ढीग लावलेले होते, तर गव्हाचे पिक कापणीच्या उंबरठ्यावर उभे होते. पण निसर्गाच्या अवकृपेने या सर्व पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले.



विशेषतः समुद्रपूर आणि हिंगणघाट परिसरात झालेल्या गारपीटीने गव्हाची उभी शेते जमिनदोस्त झाली. चन्याचे ढीग पावसाने पूर्ण भिजून गेले. वर्षभर काबाडकष्ट करून शेतकरी जेव्हा उत्पादनाच्या आशेने उभा असतो, त्याच वेळी हा अकाली तडाखा त्याच्यासाठी कर्दनकाळ ठरला आहे. परिणामी अनेक शेतकरी पुन्हा रडकुंडीला आले आहेत.

या पार्श्वभूमीवर खासदार अमर काळे यांनी कृषी विभागाकडून संपूर्ण जिल्ह्यातील नुकसानीचा तातडीने अंदाज घेण्याचे निर्देश देत, झालेल्या नुकसानीचे तात्काळ पंचनामे करण्याची मागणी जिल्हाधिकाऱ्यांकडे पत्राद्वारे केली आहे. शेतकऱ्यांना शासनाची मदत वेळेत मिळावी, यासाठी प्रशासनाने विलंब न लावता कारवाई करावी, अशी ठाम भूमिका त्यांनी मांडली.

निसर्गाच्या या आघातानंतर आता शेतकऱ्यांच्या नजरा प्रशासनाच्या निर्णयाकडे लागल्या आहेत. पंचनामे जलदगतीने पूर्ण होऊन मदतीचा हात लवकर मिळेल का, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# एसटी तिकिटासाठी एनसीएमसी कार्ड सक्तीचा निर्णय मागे

## प्रवाशांना मोठा दिलासा

**सेलु । जनमाध्यम :** राज्यातील एसटी बस प्रवाशांसाठी महत्त्वाची दिलासादायक बातमी समोर आली आहे. एसटी बस तिकिटांवरील सवलतींसाठी NCMC (नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड) कार्ड सक्तीचे करण्याचा निर्णय राज्य सरकारने मागे घेतला आहे. नागरिकांकडून वाढत्या तक्रारी आल्यानंतर शासनाने आपल्या भूमिकेत बदल करत हा निर्णय शिथिल केला आहे.

राज्यात एसटी बसने प्रवास करणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांना मोफत प्रवास, महिलांना अर्धे तिकीट आणि विद्यार्थ्यांना सवलतीच्या पासची सुविधा दिली जाते. या सवलतींचा लाभ घेण्यासाठी NCMC कार्ड अनिवार्य करण्याची घोषणा यापूर्वी करण्यात आली होती. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी यासंदर्भात सक्तीचा निर्णय जाहीर केला होता.

मात्र, या निर्णयानंतर अनेक प्रवाशांनी नाराजी व्यक्त केली. NCMC कार्ड काढण्यासाठी लागणारी फी, रिचार्जची प्रक्रिया आणि अटी-शर्ती जाचक असल्याच्या तक्रारी मोठ्या प्रमाणावर समोर आल्या. ग्रामीण भागातील नागरिकांना कार्ड मिळवताना अडचणी येत असल्याचेही निदर्शनास आले.

या पार्श्वभूमीवर राज्य परिवहन महामंडळाने स्पष्ट केले आहे की, सध्या तरी ग्र्श कार्ड सक्तीचे राहणार नाही. म्हणजेच, सवलतींचा लाभ घेण्यासाठी प्रवाशांना हे कार्ड अनिवार्य असणार नाही. प्रत्येक आगारात NCMC स्मार्टकार्ड नोंदणीची सुविधा सुरू असली तरी, ती ऐच्छिक राहील. नागरिकांच्या विरोधानंतर शासनाने हा निर्णय मागे घेतल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे ज्येष्ठ नागरिक, महिला आणि विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. भविष्यात या निर्णयाबाबत पुन्हा आढावा घेतला जाईल, अशी शक्यता वर्तवली जात आहे.

दरम्यान, एसटी प्रशासनाकडून प्रवाशांना कोणतीही अडचण येऊ नये यासाठी आवश्यक त्या सूचना देण्यात येत आहेत.

# अवैध दारू अड्ड्यांवर पोलिसांची धडक मोहीम

## लाखो रुपयांचा मुद्देमाल जप्त; ७ जणांविरुद्ध गुन्हे दाखल

**वर्धा जनमाध्यम :** पोलीस स्टेशन सावंगी मेघे यांनी विशेष मोहिम अंतर्गत अवैध गावठी मोहा दारू निर्मिती व विक्री करणाऱ्यांविरुद्ध मोठी कारवाई करत लाखो रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. गुप्त माहितीच्या आधारे पारधी बेडा, पांढरकवडा आणि शिखबेडा (सावंगी मेघे) परिसरात पोलिसांनी एकाच वेळी छापे टाकत अवैध भट्ट्यांचा पर्दाफाश केला.

या कारवाईत तयार गावठी मोहा दारू, हजारो लिटर कच्चा मोहा सडवा, दारू गाळण्यासाठी वापरले जाणारे रसायन, भांडी व इतर साहित्य असा एकूण १८ लाख ५६ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. केमिकल ॲनालिसिस (सी.ए.) परीक्षणासाठी नमुने वेगळे काढून उर्वरित साहित्य नष्ट करण्यात आले आहे.



या प्रकरणी एकूण ७ आरोपींविरुद्ध ७ गुन्हे दाखल करण्यात आले असून पुढील तपास सुरू आहे. आरोपींमध्ये विक्रमसिंग ठाकुरसिंग भादा (६२), कमलाकौर भरतसिंग भादा, राजगिरीसिंग खिच्ची, सुंदरकौर बावरी (रा. शिखबेडा), तसेच चंद्रशिला दीपक पवार, सुनिता भोसले व आमोद काळे (रा. पांढरकवडा) यांचा समावेश आहे. सदर कारवाई सौरभकुमार अग्रवाल, पोलीस अधीक्षक, सदाशिव वाघमारे, अप्पर पोलीस अधीक्षक आणि प्रमोद मकेश्वर, उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. ठाणेदार पंकज वाघोडे यांच्या नेतृत्वाखालील पथकाने ही धडक कारवाई यशस्वी केली.

या मोहिमेमुळे अवैध दारू व्यवसाय करणाऱ्यांमध्ये दहशतीचे वातावरण निर्माण झाले असून समाजात गुन्हेगारी प्रवृत्तीला आळा बसण्यास मदत होणार असल्याचे पोलिसांनी सांगितले.

# कॅनलमध्ये सापडलेल्या 'त्या' वाघिणीच्या मृत्यूचे गूढ कायम

## अहवालाच्या प्रतीक्षेत वनविभाग; नमुने पाठवून तीन महिने उलटले

### शिकार की नैसर्गिक मृत्यू? प्राथमिक अहवालात ठोस कारणाचा अभाव

**वर्धा जनमाध्यम :** वर्षाच्या अखेरीस हिंगणघाट तालुक्यात उघडकीस आलेल्या 'त्या' वाघिणीच्या मृत्यूचे कोडे अद्याप उलगडलेले नाही. ३१ डिसेंबर २०२५ रोजी सेलू मुरपाड परिसरातील कॅनलमध्ये सुमारे ३ ते ४ वर्षे वयोगटातील वाघिणीचा मृतदेह आढळून आल्याने परिसरात एकच खळबळ उडाली होती. घटनेनंतर तीन महिने उलटूनही तिच्या मृत्यूमागील नेमके कारण स्पष्ट झालेले नसल्याने वनविभागासमोर अनेक प्रश्न अनुत्तरित आहेत.

**घटनास्थळी धाव, पंचनामा आणि शवविच्छेदन**

घटनेची माहिती मिळताच प्रादेशिक वनविभागाचे अधिकारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले. कॅनलमधून मृतदेह बाहेर काढून पंचनामा करण्यात आला. त्यानंतर त्रिसदस्यीय पशुवैद्यकीय पथकाद्वारे शवविच्छेदन प्रक्रिया पार पडली. मात्र प्राथमिक शवविच्छेदन अहवालात मृत्यूचे ठोस कारण नमूद नसल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे नैसर्गिक मृत्यू झाला की मानवनिर्मित कारणामुळे प्राण गमवावे लागले, याबाबत संभ्रम कायम आहे.

**शिकार झाल्याची शक्यता**

वनअधिकाऱ्यांच्या प्राथमिक अंदाजानुसार, वाघिणीची शिकार करून पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने मृतदेह कॅनलमध्ये फेकण्यात आला असावा, अशी शक्यता व्यक्त करण्यात आली होती. या पार्श्वभूमीवर आवश्यक ऊतक नमुने संकलित करून जनुकीय तपासणीसाठी हैद्राबाद येथील अधिकृत प्रयोगशाळेत पाठविण्यात आले.

**अहवालाच्या प्रतीक्षेत निर्णय**

नमुने पाठवून तब्बल तीन महिन्यांचा कालावधी लोटला असला तरी अद्याप जनुकीय विश्लेषणाचा अहवाल वनविभागाला प्राप्त झालेला नाही. या अहवालानंतरच मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होणार असून पुढील कायदेशीर कारवाईचा मार्ग मोकळा होईल.

दरम्यान, या घटनेने जिल्ह्यातील वन्यजीव सुरक्षेच्या उपाययोजनांबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. वाघिण 'पाहुणी' म्हणून परिसरात आली होती का, तिचा संचारमार्ग कोणता होता, तसेच मानवी हस्तक्षेपाची भूमिका किती होती, याबाबतही चर्चा रंगू लागली आहे.

वनविभागाकडून जनुकीय अहवालाची प्रतीक्षा सुरू असतानाच 'त्या' वाघिणीच्या मृत्यूचे गूढ अधिकच गहिरे होत आहे.

# नाविन्यपूर्ण शेतीला शासनाची साथ; सेलूत १८ एकरवर कृषी मॉल उभारणार - पालकमंत्री

**वर्धा जनमाध्यम :** पारंपरिक पिकांपलीकडे जाऊन नवीन आणि बाजारपेठेची मागणी असलेली पिके घेण्यास इच्छुक असलेल्या शेतकऱ्यांना शासन सर्वतोपरी सहकार्य करेल, अशी माहिती पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी दिली. प्रयोगशील शेतकऱ्यांचे क्लस्टर तयार करून त्यांना बियाणे, तंत्रज्ञान, प्रक्रिया व विक्री व्यवस्थेचे पाठबळ देण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित बैठकीत वर्धा आणि सेलू तालुक्यातील युवा शेतकऱ्यांशी संवाद साधताना ते बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी वान्मथी सी, मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी अरविंद उपरीकर आदी उपस्थित होते.

जिल्ह्यातील काही शेतकरी विषमुक्त शेती, गावरान पपई, टरबूज-खरबूज, रसाचा ऊस, स्ट्रॉबेरी, चिया, अश्वगंधा तसेच निशिगंधा यांसारख्या पिकांचे उत्पादन घेत आहेत. अशा शेतकऱ्यांना एकत्र आणून त्यांचे क्लस्टर केल्यास उत्पादन खर्च कमी होऊन बाजारपेठेपर्यंत पोहोच सुलभ होईल, असे पालकमंत्र्यांनी नमूद केले. सेंद्रिय उत्पादनांना प्रमाणपत्र मिळविण्यात येणाऱ्या अडचणींचा मुद्दा शेतकऱ्यांनी मांडला. त्यावर वर्ध्यातच तपासणी व प्रमाणन सुविधा उपलब्ध करण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना निर्देश देण्यात आले. सेलू येथे कृषी विभागाच्या १८ एकर जागेवर कृषी मॉल उभारण्याचा प्रस्ताव आहे. 'बियाण्यांपासून बाजारपेठेपर्यंत सर्व सुविधा एकाच छताखाली देण्याचा या प्रकल्पाचा उद्देश आहे. इनपुट प्लाझा, धान्य व तेलबिया प्रक्रिया, फलोत्पादन केंद्र, कोल्ड चेन, लॉजिस्टिक व्यवस्था, बँकिंग सुविधा, रिटेल दालन तसेच सौर ऊर्जा प्रकल्पाचा समावेश या योजनेत आहे.

हा प्रकल्प जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी आर्थिकदृष्ट्या महत्त्वाचा ठरेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठीत सवय



# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## सर्वसमावेशक धोरणाची गरज

राज्याची अर्थव्यवस्था २०४७ पर्यंत ५ लाख कोटी डॉलरपर्यंत वाढवण्यासाठी सरकार दमदारपणे पावले टाकत असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेला उत्तर देताना गुरुवारी सांगितल्याने महाराष्ट्रात राहणाऱ्या प्रत्येक माणसाच्या आणि विशेषतः मराठी माणसाच्या मनात गौरवाची भावना निर्माण होणे साहजिक आहे. देशाच्या जीडीपीत भरीव योगदान देताना राज्याला विकासाचे 'ग्रोथ इंजिन' बनविण्याची सुरू असलेली धडपड त्यातून ध्वनीत होते. राज्याच्या अर्थव्यवस्थेने अर्धा ट्रिलियनचा पार केलेला टप्पा आणि १ ट्रिलियनचे लक्ष्य या मोठ्या जमेच्या बाजू. राज्यावरील कर्जाचा बोजा वाढत असताना लोककल्याणकारी योजनांवरील वाढता खर्च आणि अर्थव्यवस्थेवरील त्याचे परिणाम दुर्लक्षिता येणार नसले, तरी राज्याचा गाडा गतीने पुढे हाकण्याच्या सकारात्मक प्रयत्नांची दखल घ्यावी लागेल. महाराष्ट्राचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या अभिभाषणात त्याबद्दलचा आराखडा मांडताना पायाभूत सुविधा गुंतवणूक आणि जनकल्याणकारी योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीवर सरकारचा भर असल्याचे विधानसभेत स्पष्ट केले होते. अर्थात, आगामी अर्थसंकल्प पायाभूत क्षेत्रातील गुंतवणुकीवर भर देणारा असेल, असे संकेत मिळतात. शेती, बेरोजगारी, शहरांचे बकालीकरण यासारख्या कळीच्या प्रश्नांवर सरकारची कसोटी लागणार आहे. देशाच्या सकल देशांतर्गत उत्पादनात (जीडीपी) राज्याचा १३.५ टक्क्यांहून अधिक वाटा असून, २०२४-२५ या वर्षात महाराष्ट्रात १ लाख ६४ हजार कोटी रुपयांची, तर २०२५-२६ च्या पहिल्या सहामाहीत ९१ हजार कोटी रुपयांची थेट परकीय गुंतवणूक प्राप्त झाली. दावोसच्या गुंतवणूक परिषदेत ३० लाख कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचे सामंजस्य करार झाले. त्यातून ४० लाख इतकी रोजगारनिर्मिती अपेक्षित आहे. या पार्श्वभूमीवर, अर्थव्यवस्थेने अर्धा ट्रिलियन टप्पा ओलांडलेले देशातील हे एकमेव राज्य. २०१२-१३ मध्ये अर्थव्यवस्था १३ लाख कोटी रुपयांची होती. ती गेल्या ११ वर्षांत ५१ लाख कोटी रुपयांवर गेली. १ ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था करण्यासाठी सरकारने २०३२ चे उद्दिष्ट ठेवले असले, तरी त्याची पूर्ती २०२९ पर्यंतच करण्याची महत्त्वाकांक्षा बाळगण्यात आली आहे. २०५७ पर्यंत ५ ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था, दरवर्षी १० लाख इतकी रोजगारनिर्मिती आणि दरडोई उत्पन्नात दहापट वाढ करण्याचे ध्येय सरकारने निश्चित केले. युरोपातील बेल्जियमसारख्या देशांइतकी महाराष्ट्राची अर्थव्यवस्था असून, एकप्रकारे केवळ अन्य राज्यांशीच नव्हे, तर जगातील इतर देशांशीही राज्य स्पर्धा करत आहे. शिवाय २०२१-२२ मध्ये देशाच्या जीडीपीत महाराष्ट्राचा हिस्सा १३.१ टक्के होता, तो टप्प्याटप्प्याने वाढत आता १४ टक्क्यांवर गेला. राज्यातून काही उद्योग बाहेर गेले असले, तरीदेखील हजारो कोटी रुपये गुंतवणुकीचे शेकडो नवे उद्योग राज्यात येत आहेत. गडचिरोलीत पोलादनगरी आकारास येत आहे. छत्रपती संभाजीनगर अथवा अहिल्यानगर असो, वेगवेगळ्या क्षेत्रांमधील मोठे उद्योग येत आहेत. पूर्वी मुंबई, ठाणे, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर आणि नागपूर येथेच उद्योगधंदे येत असत. आता सर्व भागांत विविधांगी उद्योग आकर्षित होत आहेत. त्यासाठी सरकारने व्हिजन डॉक्युमेंट तयार केले. एका कुंभमेळ्याने उत्तर प्रदेशचे ब्रँडिंग जगात झाले. महाराष्ट्रालाही नाशिकचे ब्रँडिंग कुंभमेळ्याच्या माध्यमातून जगात करायचे आहे, हा फडणवीस यांचा दृष्टिकोन. ते कसे होते, याची उत्सुकता राहील. नाशिकच्या तपोवनात कुंभमेळ्यासाठी वृक्षांची कत्तल झाली, तेव्हा अन्यत्र झाडे लावून त्याची भरपाई करण्याचे आश्वासन दिले गेले. त्याचे नेमके काय झाले, वृक्षांचे पुनर्रोपण झाले काय, किती तोडली, किती लावली याचीही स्पष्टता देण्याची गरज आहे. वृक्षतोड आणि पर्यावरणाचा विषय कुंभमेळ्याच्या आयोजनात अडसर ठरणार नाही, याची दक्षता घ्यावी लागेल. २०२७ मध्ये म्हणजे पुढील वर्षी हा कुंभमेळा भरेल. राज्याची अर्थव्यवस्था १ ट्रिलियन डॉलरची झाली, तर जगात महाराष्ट्राचा क्रमांक तेरावा असेल. आज जगात भारताची अर्थव्यवस्था चौथ्या क्रमांकाची असून, ती तिसऱ्या क्रमांकावर लवकरच येणार आहे. महाराष्ट्र हे देशातील अग्रेसर राज्य असून, त्यामुळे एका राज्याने प्रगत देशांशी टक्कर देणे भूषणावहच म्हणावे लागेल. देशाचा 'स्टार्टअप हब' यापूर्वी बंगळुरू व हैदराबाद होता, आता महाराष्ट्र बनला आहे, अशी बाब मुख्यमंत्र्यांनी नमूद केली. देशातील नोंदणीकृत २५ टक्के स्टार्टअप राज्यात आहेत. देशातील ११९ युनिकॉर्नपैकी २८ युनिकॉर्न महाराष्ट्रात आहेत. 'स्टार्टअप कॅपिटल' म्हणून आज राज्याकडे पाहू शकतो. स्टार्टअप उद्योग आणि नावीन्यता धोरणास राज्याने मान्यता दिली. १४६ पेक्षा जास्त इनक्युबिटर केंद्रे स्थापन केली. यासाठी तीन व्हेंचर फंडांच्या माध्यमातून 'फंड ऑफ फंडस्' तयार केला. स्टार्टअप उभारणीत पुणे शहराचा देशात पाचवा क्रमांक लागतो, ही गौरवास्पद बाब. सरकारच्या नोंदणीनुसार पुण्यात ५०० स्टार्टअप असून, सैन्यदलाच्या स्टार्टअपची संख्या लक्षणीय. मोजके स्टार्टअप चार-पाच वर्षांत एवढे मूल्यांकन प्राप्त करतात की, ते बड्या बड्या उद्योगांना मागे टाकतात. स्टार्टअपसाठी राज्यातील तरुण-तरुणींना मुख्यमंत्री महाफंडातून पाच ते दहा लाखांपर्यंतचे कर्ज उपलब्ध होणार आहे. पुढील पाच वर्षांत राज्यात सव्वा लाख उद्योजक घडवणे आणि ५० हजार स्टार्टअप सुरू करणे, हा यामागील उद्देश. 'स्टार्टअप सप्ताह' साजरा करणे, स्टार्टअपना शासनाच्या पायलट ऑर्डर्स देणे, स्टार्टअपना पेटंट व प्रदर्शन खर्चाकरिता मदत करणे या गोष्टी शासनातर्फे केल्या जात आहेत. शिवाजी विद्यापीठात सध्या आरोग्य, शेती, शिक्षण यासह विविध क्षेत्रांतील १०५ हून अधिक स्टार्टअप सुरू आहेत; मात्र त्याचवेळी केंद्र सरकारच्या सेमीकंडक्टर मिशनअंतर्गत एकही प्रकल्प राज्यात आलेला नाही. गुजरात व अन्य राज्यांत हे प्रकल्प खेचले जात आहेत. याची नोंद सरकारने घेतली पाहिजे. उद्योजकांकडून वसूल होणारी खंडणी व त्यापायी होणारे गैरप्रकार थांबवण्याचे आव्हान आहेच. राज्याच्या प्रगतीच्या स्टार्टअपला गती देताना विकासाचा समतोल आणि सर्वसमावेशक धोरण अर्थसंकल्पात मांडले जाईल, ही आशा!

# ट्रम्प टेरिफला सर्वोच्च धक्का

अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या टेरिफ युद्धाला वेसण घालण्याचा जाहीर केलेला निवाडा अनेक दृष्टींनी महत्त्वाचा आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या संपूर्ण नऊ सदस्यांच्या पीठाने सहा विरुद्ध तीन असा बहुमताने निर्णय देताना कर लागू करण्याचे सार्वभौमित्व संसदेकडे (अमेरिकी काँग्रेस) असल्याचा निर्वाळा दिला आहे. विधिमंडळ, कार्यपालिका व न्यायपालिका या लोकशाहीच्या तीन केंद्रीय संस्थांपैकी केवळ विधिमंडळाला कर लागू करणे, नष्ट करणे आणि कमी-जास्त करण्याचे सर्वांगीण अधिकार असल्याचे अमेरिकी सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे.

कर आकारणीच्या प्रकारात देशाच्या आयात-निर्यात मालावरील शुल्कांचा समावेश सर्वोच्च न्यायालयाने केला आहे. त्यामुळे, अमेरिकी राष्ट्राध्यक्षांनी, म्हणजे कार्यपालिकेने, एप्रिल २०२५ मध्ये वटहुकुमाद्वारे सर्व देशांवर लागू केलेले आयात शुल्क रद्दबातल ठरले आहे. हा निवाडा देणाऱ्या सहा न्यायाधीशांपैकी तीन न्यायाधीश रिपब्लिकन विचारसरणीचे असल्यामुळे या निर्णयाला प्रचंड महत्त्व आले आहे. या तीन रिपब्लिकन न्यायाधीशांमध्ये जॉर्ज बुश (कनिष्ठ) यांच्या काळात नियुक्त झालेले व सध्या सरन्यायाधीश असलेले जॉन जी रॉबर्ट्स आणि ट्रम्प यांच्या प्रथम कारकिर्दीत नियुक्त करण्यात आलेल्या दोन न्यायाधीशांचा समावेश आहे.

मागील वर्षभराच्या काळात सर्वोच्च न्यायालयाने काही मोजके अपवाद वगळता अनेक महत्त्वाच्या प्रकरणांमध्ये ट्रम्प प्रशासनाला हिरवा कंदील दिलेला आहे. मात्र, आयात-शुल्क प्रकरणातील निर्णयातून दोन बाबी स्पष्ट होतात. एक, जिथे अमेरिकी राज्यघटनेने संस्थांचे अधिकार निश्चित केले आहेत, तिथे या अधिकारांच्या पायमल्लीकडे न्यायपालिका कानाडोळा करू शकत नाही. दोन, ट्रम्प यांच्या आयात शुल्क धोरणावरून रिपब्लिकन गटात दुफळी आहे. अन्यथा, तीन रिपब्लिकन न्यायाधीशांनी एवढी स्पष्ट भूमिका घेतली नसती. सर्वोच्च न्यायालयातील अन्य तीन रिपब्लिकन न्यायाधीशांनी आयात-शुल्क आकारण्यातील ट्रम्प यांचे अधिकार मान्य केले आहेत.

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या काही दिवसांपूर्वी रिपब्लिकन गटातील मतभेदांचे दर्शन अमेरिकी काँग्रेसचे कनिष्ठ सभागृह असलेल्या हाऊस ऑफ रेप्रेझेंटेटिव्ह जमध्ये सुद्धा घडले होते. कॅनडावर अतिरिक्त आयात शुल्क लादण्याच्या निर्णयाला सत्ताधारी रिपब्लिकन पक्षाच्या सहा प्रतिनिधींनी विरोध केल्याने तो ठराव बारगळला होता. अमेरिकेत घेण्यात आलेल्या जनमत चाचण्यांमध्ये जवळपास ३० टक्के रिपब्लिकन मतदारांनी ट्रम्प यांच्या आयात-शुल्क धोरणाबाबत नापसंती दर्शवली आहे. अमेरिकेत या वर्षाअखेरीस हाऊस ऑफ रेप्रेझेंटेटिव्हजची सार्वत्रिक निवडणूक आणि वरिष्ठ सभागृह असलेल्या सिनेटच्या रिक्त होणाऱ्या जागांच्या निवडणुका होऊ घातल्या आहेत. ट्रम्प यांच्या आयात-शुल्क धोरणाबाबत रिपब्लिकन समर्थकांमध्ये एकवाक्यता न झाल्यास डेमोक्रॅटिक पक्षाला या निवडणुकांमध्ये फायदा होऊ शकतो.

> **सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाने राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांचे आयात-शुल्क धोरण जमीनदोस्त झाले आहे. गेले वर्षभर भारताला वेठीस धरणाऱ्या ट्रम्प यांच्यावर दबाव आणण्याची संधी आता भारताकडे आहे.**

अन्योन्य पद्धतीने आयात शुल्क लागू करणे हे ट्रम्प यांच्या परराष्ट्र धोरणातील सर्वात प्रमुख अस्त्र आहे. त्यामुळे, त्यांनी अपेक्षेप्रमाणे सन १९७४ च्या एका कायद्याच्या आधारे सर्व देशांवर १५ टक्के आयात-कर लागू केला आहे. या कायद्याअंतर्गत अमेरिकी राष्ट्राध्यक्ष जास्तीत जास्त १५ टक्के आयात-कर १५० दिवसांपर्यंत लागू करू शकतात. त्यापुढे, अमेरिकी काँग्रेसची परवानगी आवश्यक ठरते. यापूर्वी कोणत्याही राष्ट्राध्यक्षाने या कायद्याच्या आधारे आयात-कर वाढवले नव्हते. त्यामुळे, १५० दिवसांनंतर नेमके काय होणार याबाबत अनिश्चितता आहे. ट्रम्प यांची मदार या वर्षीच्या निवडणुकांवर आहे. तोवर हाऊस ऑफ रेप्रेसेंटेटिव्हजची निवडणूक होऊन ट्रम्प यांच्या पक्षाकडे बहुमत असणार की नाही हे कळेल, आणि त्यानुसार या १५ टक्के आयात कराचे भवितव्य निर्धारीत होईल. सध्या तरी सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाने ट्रम्प प्रशासनापुढे दोन मोठ्या अडचणी उभ्या ठाकल्या आहेत.

### वसुलीचा परतावा होणार का?

यातील पहिली अडचण म्हणजे, एप्रिल २०२५ ते जानेवारी २०२६ या कालावधीत वसूल करण्यात आलेला अतिरिक्त आयात-शुल्क आता बेकायदा ठरला आहे. या बेकायदा वसुलीचा परतावा मिळावा यासाठी मोठमोठ्या कंपन्यांनी न्यायालयांचे दरवाजे ठोठावणे सुरू केले आहे. ही सर्व प्रकरणे साहजिकच सर्वोच्च न्यायालयापर्यंत पोहोचतील. सर्वोच्च न्यायालयाने आताच्या निकालात अतिरिक्त वसुलीच्या परताव्याबाबत भाष्य केलेले नाही. पुढे, सर्वोच्च न्यायालयाने परताव्याच्या बाजूने निर्णय दिला तर त्याचा प्रचंड बोजा अमेरिकी सरकारवर पडणार आहे. एप्रिल ते डिसेंबर २०२५ दरम्यान जमा झालेला अतिरिक्त आयात-कर हा १३३ बिलियन डॉलर एवढा होता, जो आकडा ६ फेब्रुवारी २०२६ च्या सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयावेळी




१५० बिलियन डॉलरपर्यंत पोहोचला असण्याचा अंदाज आहे. या रकमेपैकी काही भाग ट्रम्प प्रशासनाने शेतकऱ्यांना सबसिडीच्या रूपात देऊ केला आहे, जो शेतकऱ्यांकडून प्रत्यक्ष वसूल करणे राजकीय सोयीचे नाही. याशिवाय, ट्रम्प प्रशासनाने मध्यम व निम्नमध्यम वर्गातील कुटुंबांना दोन हजार डॉलरचे अनुदान देण्याची योजना तयार केली होती. ही योजना आता बारगळण्याची चिन्हे आहेत, ज्याचा फटका ट्रम्प यांच्या लोकप्रियतेला बसू शकतो. याचप्रमाणे, अतिरिक्त आयात-शुल्कातून सरकार खजिन्यात जमा झालेल्या रक्कमेतून ५०० बिलियन डॉलरचा महत्त्वाकांक्षी संरक्षण अर्थसंकल्प ट्रम्प यांना साकार करायचा होता. या महत्त्वाकांक्षेला आता कात्री लावण्याची वेळ येणार आहे.

### पुन्हा उलथापालथ

ट्रम्प प्रशासनापुढे उभी ठाकलेली दुसरी अडचण म्हणजे ज्या देशांशी मागील नऊ महिन्यांमध्ये व्यापार करार केले आहेत, ते आयात-शुल्काला अन्योन्य न्याय लावत लादलेल्या अतिरिक्त करांच्या संदर्भात करण्यात आले होते. या पैकी बहुतांश द्विपक्षीय करारांमध्ये अमेरिकेने दुसऱ्या पक्षावर १५ टक्केपेक्षा अधिक कर लावलेला आहे. पण आता जास्तीत जास्त आयात कर हा १५ टक्केच असणार आहे. अमेरिकी सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे भारत, चीन, दक्षिण कोरिया, जपान, आशियान गटातील बहुतांश देश, ब्राझिल, कॅनडा, तुर्की या अमेरिकेशी मोठा व्यापार असणाऱ्या देशांवरील आयातकर २४ फेब्रुवारीपासून कमी झाला आहे. याउलट, अनेक देश ज्यांच्यावरील कर ट्रम्प प्रशासनाने व्यापार कराराच्या माध्यमातून किरकोळ केला होता, त्यांच्यावर सुद्धा आता १५ टक्के कर लागू झाला आहे. यामध्ये प्रामुख्याने, युनायटेड किंग्डम, रशिया, ऑस्ट्रेलिया, सौदी अरेबिया, कतार, संयुक्त अरब अमिरात आणि अर्जेंटिना या देशांचा समावेश आहे. या देशांवरील आयात-कर कमी करण्यामागे ट्रम्प यांचे उद्देश हे आर्थिक नव्हे तर सामरिक व राजकीय होते. त्यामुळे, नजिकच्या काळात या देशांवरील आयात-करात कपात होण्याची ठोस शक्यता आहे. युरोपीय महासंघावरील आयात-कर आधी सुद्धा १५ टक्केच होता, त्यामुळे युरोपीय देशांच्या बाबत बदल घडलेला नाही. पण, युरोपीय उत्पादकांना आता चीन, जपान, भारत, व्हिएतनाम अशा देशांशी स्पर्धा करावी लागणार आहे. या उलथापालथीने जागतिक व्यापाराची वार्षिक गणिते पुन्हा बदलणार आहेत.

### भारताच्या पदरी काय?

दिल्लीस्थित आयात-निर्यात धोरणाचे तज्ज्ञ, अजय श्रीवास्तव यांच्या मते ट्रम्प यांनी घोषित केलेले १५ टक्के आयात-कराचे धोरण सरसकट सर्व उत्पादनांना लागू नाही. जास्तीत-जास्त १५ टक्के आयात-कर असेल, पण अनेक वस्तूंवर तो १५ टक्क्यांपेक्षा कमी असू शकतो. त्याचवेळी, अमेरिकी सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाची बांधिलकी स्टील व ॲल्युमिनियम आणि ऑटो घटकांच्या आयातीवर नाही. त्यामुळे, त्यांच्यावरील आयात-शुल्क अनुक्रमे ४० टक्के आणि २५ टक्के असणार आहे. भारतातून अमेरिकेला होणाऱ्या ६० टक्के निर्यातीवरील शुल्क १८ टक्क्यांऐवजी १५ टक्के किंवा त्याहूनही कमी झाले आहे. पण, एप्रिल २०२५ पूर्वी भारतीय मालाच्या आयातीवर असलेले सरासरी तीन टक्के आयात शुल्क पूर्ववत होणार की ते वस्तुनुरूप तीन टक्के ते १५ टक्के या दरम्यान असणार याबाबत फार स्पष्टता निदर्शनास येत नाही. अमेरिकी सर्वोच्च न्यायालयाच्या निरर्णयापूर्वी चिनी आयातीवरील आयात-शुल्क ४५ टक्के होते, जे आता भारताप्रमाणे १५ टक्क्यांपर्यंत असणार आहे (स्टील, ॲल्युमिनियम, ऑटो घटक वगळून). म्हणजे, आता अस्तित्वात आलेल्या चौकटीत भारतीय निर्यातकांना चीनशी तीव्र स्पर्धा करावी लागणार आहे.

अमेरिकी सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर भारताने अमेरिकेशी होऊ घातलेल्या व्यापार-कराराच्या चौकटीतून बाहेर पडणे आवश्यक झाले आहे. भारताच्या वाणिज्य मंत्रालयाने व्यापार कराराच्या चर्चेकरिता अमेरिकेस जाणाऱ्या शिष्टमंडळाला द्विपक्षीय सहमतीने स्थगिती दिली आहे. अमेरिकेतील काही राज्यस्तरीय न्यायालयांनी ट्रम्प यांच्या टेरिफ-युद्धाविरुद्ध निर्णय दिले होते आणि सर्वोच्च न्यायालयात न्यायाधीशांनी नोंदविलेल्या विधानामुळे निर्णय ट्रम्प यांच्या विरुद्ध लागण्याच्या शक्यता वर्तवल्या जात होत्या. त्यामुळे, सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयापूर्वी भारताने द्विपक्षीय कराराच्या चौकटीला मान्यता दिली नसती तर व्यापार-करारावरील चर्चेत भारताची बाजू अधिक भक्कम असती असे म्हणण्यास वाव आहे. परंतु, मुळात द्विपक्षीय व्यापारी कराराच्या चौकटीची घोषणाच एकपक्षीय होती, जी ट्रम्प यांनी समाज माध्यमांवर जाहीर केली होती. आता, जाहीर करण्यात आलेल्या व्यापार चौकटीतील किमान पाच मुद्द्यांवर असहमती दर्शवत नवी चौकट तयार करण्याचा आग्रह भारताने धरावयास हवा. एक, भारताने रशियाकडून तेल विकत घ्यावे की नाही, हा भारत-अमेरिका व्यापार करारातील मुद्दा असू शकत नाही. दोन, भारतात होणाऱ्या अमेरिकी मालाच्या आयातीवर शून्य टक्के आयात-शुल्क मान्य करण्याची गरज नाही.

तीन, अमेरिकेकडून ५०० बिलियन डॉलरची आयात करण्याची भारताची इच्छा हा द्विपक्षीय व्यापार कराराचा भाग असण्याची गरज नाही. चार, अमेरिकी शेतीमाल व दुग्ध-पदार्थांच्या आयातीबाबत ठोस स्पष्टता असणे अत्यावश्यक आहे. पाच, भारतीय कुशल कामगारांना अमेरिकी व्हिसा मिळण्याबाबत उदार धोरणाचा व्यापार करारात समावेश करणे आवश्यक आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाने राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांचे आयात-शुल्क धोरण जमीनदोस्त झाले आहे आणि हा ट्रम्प यांच्या राजकीय व वैयक्तिक प्रतिष्ठेला देशांतर्गत व जागतिक स्तरावर बसलेला हादरा आहे. मागील सव्वा वर्षांपासून डोनाल्ड ट्रम्प सातत्याने भारतावर कुरघोडी करत आहेत. आता ट्रम्प यांच्यावर दबाव आणण्याची संधी अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयातून भारताला प्राप्त झाली आहे. यातून भारत-अमेरिका द्विपक्षीय संबंधांतील तारतम्य व सन्मान पुनर्स्थापित करण्याचा मार्ग सरकारला निर्माण करावा लागणार आहे.(साभार-म.टा)

**परिमल माया सुधाकर**

## मंदिर सरकारीकरणाचा परिणाम

काही दिवसांपासून जे अनुभवायला आले ते लिहीत आहे. अनेक पवित्र तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी जो गैरप्रकार सुरू आहे तो म्हणजे पैसे भरल्यास देवाचे दर्शन! श्री क्षेत्र तुळजापूर येथे देवीच्या दर्शनाला 'स्पेशल लाईन' दर्शन रुपयात, पास दर्शन २०० रुपयात , व्हीआयपी दर्शन, व्ही व्ही आय पी दर्शन ५०० रुपये आणि ज्याने पैसे भरले नाहीत त्याला मंदिराच्या बाहेरूनच देवीचे मुखदर्शन ही पद्धत पाहिली आणि अनुभवली. ५०० रुपये प्रत्येकी भरले तर देवीच्या थेट गाभाऱ्यात दर्शन आणि २०० रुपये भरले तर २-३ घंटे रांगेत उभे राहून २ सेकंदात गाभाऱ्याच्या बाहेरच्या लाईन मधून 'पुढे चला' करत दर्शन करू इच्छिणाऱ्या भक्ताला हाकलून लावायचे, हा अतिशय संतापजनक प्रकार दिसून आला. तिरुपतीला श्री बालाजी देवाच्या दर्शनाला पण हाच संतापजनक प्रकार पाहिला. देव गरीबाचा किंवा सामान्य व्यक्तीचा नाही आणि फक्त पैसे असलेल्यांचा असतो का? मंदिरांचे सरकारीकरण हेच याचे मुख्य कारण आहे. मंदिर सरकारीकरण नसताना मंदिरे भक्तांच्या हातात होती, तेव्हा ही परिस्थिती नव्हती. मंदिर सरकारीकरण रद्द झाले पाहिजे ही प्रत्येक सामान्य व्यक्तीची इच्छा आहे यात शंकाच नाही.

**आदिती देखणे**

## महाविकास आघाडीत विसंवाद

राज्यातील राज्यसभेच्या सात जागांसाठी येत्या १६ मार्च रोजी होणाऱ्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, महाविकास आघाडीमध्ये पुन्हा एकदा 'शीतयुद्ध' पेटले आहे. आजच्या संख्याबळावर महाविकास आघाडीतर्फे एकजण राज्यसभेवर निवडून जाऊ शकतो. या जागेवरून शिवसेना उबाठा नेते आदित्य ठाकरे आणि वरुण सरदेसाई यांनी घेतलेली आक्रमक भूमिका सध्या राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय ठरली आहे. दुसरीकडे, काँग्रेसने शिवसेना उबाठा ला पाठिंबा देण्यासाठी 'देण्या-घेण्याचा' प्रस्ताव समोर ठेवला आहे.

'शिवसेना उबाठास राज्यसभा हवी असेल, तर विधान परिषदेची एक जागा काँग्रेसला सोडावी लागेल,' अशी अट काँग्रेसने घातली आहे. मात्र, याच जागेवरून उद्धव ठाकरे यांना पुन्हा विधान परिषदेवर निवडून जायचे असल्याने हा तिढा अधिकच जटील झाला आहे. काही दिवसांपूर्वी शिवसेना उबाठा प्रवक्ते संजय राऊत यांनी शरद पवारांचे नाव पुढे करून खेळलेली राजकीय चाल आता या बदलत्या राजकारणात त्यांच्यावरच उलटल्याचे दिसत आहे. आदित्य ठाकरे आणि वरुण सरदेसाई यांचे विधान म्हणजे संजय राऊत यांना स्वपक्षातूनच मिळालेला 'घरचा आहेर' मानला जात आहे.

यापूर्वी महाविकास आघाडी सत्तेत असताना, चार वर्षांपूर्वी २०२२ मध्ये राज्यसभेच्या निवडणुकीदरम्यान कोल्हापूरच्या छत्रपती संभाजी महाराज यांच्या उमेदवारीवरून शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये मोठा विसंवाद झाला होता. 'आधी शिवबंधन बांधावे, मगच शिवसेनेचे उमेदवार व्हा; आमची मते हवीत पण पक्षीय बांधीलकी नको, हे चालणार नाही,' अशी ताठर भूमिका शिवसेनेने घेतली होती. परिणामी, छत्रपती संभाजी महाराजांना निवडणुकीतून माघार घ्यावी लागली. शिवसेनेने कोल्हापूरचे जिल्हाप्रमुख संजय पवार यांना उमेदवारी दिली, मात्र त्याचा फटका बसून शिवसेनेच्या उमेदवाराचा पराभव झाला. त्यानंतर लगेच झालेल्या विधान परिषद निवडणुकीतही काँग्रेस उमेदवाराचा पराभव झाला आणि राज्याच्या राजकारणात मोठा भूकंप झाला. शिवसेना नेते एकनाथ शिंदे यांनी केलेल्या बंडामुळे महाविकास आघाडीचे सरकार कोसळले, हा इतिहास ताजा आहे. थोडक्यात, महाविकास आघाडीने आपल्या जुन्या चुकांतून बोध घेतला नाही, तर इतिहासाची पुनरावृत्ती अटळ आहे. जेव्हा राजकीय स्वार्थ आघाडीच्या धर्मापेक्षा मोठा होतो, तेव्हा विघटनाची प्रक्रिया सुरू होते. लोकशाहीत केवळ जागा जिंकणे महत्त्वाचे नसून मित्रपक्षांमधील 'परस्पर विश्वास' जपणे अधिक गरजेचे असते. संवाद खुंटला की संशयाचे जाळे विणले जाते, जे अंतिमतः विनाशाला कारणीभूत ठरते.

**अविनाश देशपांडे**

# होळी पारंपरिक पद्धतीनेच साजरी करा!

होळी हा आपल्या संस्कृतीतील अत्यंत प्राचीन आणि धार्मिक महत्त्व असलेला सण आहे. हा केवळ रंगांचा किंवा उत्साहाचा सण नसून, त्यामागे अध्यात्म, आरोग्य आणि समाजहित यांचा सुंदर संगम आहे. त्यामुळे होळी साजरी करताना तिचे मूळ स्वरूप जपणे अत्यंत आवश्यक आहे. आपल्या परंपरेनुसार होळीच्या दिवशी प्रथम होळीदेवतेचे पूजन केले जाते. 'एक वार्ड एक होळी' किंवा 'एक गाव एक होळी' ही संकल्पना सांगते की अनावश्यक झाडांची तोड न करता, शक्यतो गोवऱ्या व वाळलेली लाकडे वापरून होळी करावी. होळीला प्रदक्षिणा घालून नारळ अर्पण करावा आणि प्रार्थना करावी. होळीच्या ज्वालेत रज-तमप्रधान वृत्तींचे दहन व्हावे आणि आपल्या मनातील अहंकार, मत्सर, द्वेष यांचा नाश व्हावा, ही भावपूर्ण भावना ठेवावी.

आयुर्वेदानुसार, फाल्गुन महिन्यात वातावरणात कफदोष वाढतो. होळीच्या अग्नीमुळे वातावरण शुद्ध होते, सूक्ष्म जंतू नष्ट होतात आणि आरोग्यास लाभ होतो. म्हणूनच होळी हा केवळ धार्मिक नव्हे, तर आरोग्यदायी सणही आहे. पर्यावरणाच्या नावाखाली अपप्रचार सुरू आहे, कचऱ्याची होळी करा असे सांगितले जाते,



पण हा कचरा वर्षभर नसतो का? आणि कचरा जाळल्यास त्या कचऱ्यामध्ये प्लास्टिक खूप अनैसर्गिक तत्व असतात त्यामुळे प्रदूषण वाढते असे आपण नेहमीच बघतो म्हणून ही कचरा होळीत जाळू नये या सणाला एक धार्मिक अध्यात्मिक महत्त्व आहे हे न विसरता कुठल्याही अपप्रचाराला बळी पडू नये

आयुर्वेदिक वनस्पतींची लाकडे वापरून होळी पर्यावरण पूरक बनवूया. मात्र, आज काही ठिकाणी होळीच्या नावाखाली अपप्रवृत्ती दिसून येतात. जबरदस्तीने रंग फासणे, पाण्याचा अपव्यय करणे, मद्यपान करणे, अश्लील गाणी लावणे किंवा धिंगाणा घालणे. या गोष्टी परंपरेचा भाग नाहीत. शास्त्रात अशा कोणत्याही वर्तनाला मान्यता नाही. उलट अशा कृत्यांमुळे सणाचे पावित्र्य कमी होते आणि समाजात गैरसमज पसरतात. पारंपरिक पद्धतीने, मर्यादित साधनांनी आणि भावपूर्वक केलेली होळी ही पर्यावरणाला हानीकारक नसून वातावरण शुद्ध करणारी असते. त्यामुळे अपप्रचारांना बळी न पडता, शास्त्राधिष्ठित माहिती समजून घेणे आवश्यक आहे.

होळी म्हणजे वाईट प्रवृत्तींचे दहन आणि चांगल्या संस्कारांची सुरुवात. दुसऱ्या दिवशी धुळवड साजरी करताना सकाळी स्नान करून देवपूजा करावी आणि नैसर्गिक रंगांचा वापर करावा. सण साजरा करताना शिस्त, मर्यादा आणि परस्पर आदर राखणे हेच खरे धर्मपालन आहे. आजच्या काळात आपल्या सणांचे मूळ स्वरूप जपणे ही प्रत्येक हिंदूची जबाबदारी आहे. होळी हा केवळ उत्सव नसून संस्कार देणारा पर्व आहे. चला, आपण सर्वांनी मिळून होळी पारंपरिक, धार्मिक आणि सात्त्विक पद्धतीने साजरी करूया आणि समाजासमोर आदर्श निर्माण करूया.

**रमा देशमुख नागपूर**

### तिघांना अटक, ११ मार्चपर्यंत पोलीस कोठडी, अवधूतवाडी पोलिसांची धडक कारवाई मुख्य सूत्रधारांपर्यंत तपास पोहोचणार

# ‘टिडब्ल्यूजे’च्या नावाखाली कोट्यवधींची गुंतवणूक लाटली!

**जनमाध्यम प्रतिनिधी**



यवतमाळ - शेअर मार्केटमधील गुंतवणुकीवर “अतिरिक्त व हमखास परतावा” देण्याचे आमिष दाखवत राज्यभरातील गुंतवणूकदारांची कोट्यवधी रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी ‘टिडब्ल्यूजे’शी संबंधित आणखी तिघांना अटक करण्यात आली आहे. शुक्रवारी (२७ फेब्रुवारी) अवधूतवाडी पोलिसांनी ही कारवाई केली. शनिवारी न्यायालयात हजर केले असता आरोपींना ११ मार्चपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली.

अटक करण्यात आलेल्यांमध्ये समीर सुभाष नार्वेकर (३५) व नेहा समीर नार्वेकर (दोघे रा. गणीवी, रत्नागिरी) तसेच अमित विश्वनाथ बालम (३८, रा. बालमवाडी, सिंधुदुर्ग) यांचा समावेश आहे. यापूर्वीच या प्रकरणात यवतमाळ येथील विभागीय व्यवस्थापक सागर राम मंचलवार आणि शाखा व्यवस्थापक सूरज प्रकाश मडगुलवार यांना अटक करण्यात आली असून ते सध्या न्यायालयीन कोठडीत आहेत. पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, जांब मार्गावर ‘टिडब्लूजे असोसिएशन प्रा. लि., पुणे’ या नावाने वित्तीय संस्थेचे कार्यालय सुरू करण्यात आले होते. कंपनीमार्फत शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक केल्यास कमी कालावधीत मोठा परतावा मिळेल, असा दावा करून नागरिकांना आकर्षित करण्यात आले. सुरुवातीला काही गुंतवणूकदारांना परतावा देऊन विश्वास निर्माण करण्यात आला. मात्र काही महिन्यांपासून परतावा थांबविण्यात आला. कार्यालयात चौकशीसाठी गेलेल्या गुंतवणूकदारांना उडवाउडवीची उत्तरे देण्यात येत होती. अखेर एका सभासदाने अवधूतवाडी पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार नोंदवली. त्यानुसार फसवणुकीचा गुन्हा दाखल करून तपास सुरू करण्यात आला. प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता तपासाची सूत्रे पांढरकवडा उपविभागीय पोलिस अधिकारी रॉबिन बन्सल यांच्याकडे सोपविण्यात आली. त्यांच्या पथकाने पुढील तपास करत शुक्रवारी तिघांना ताब्यात घेतले. या प्रकरणात एकूण किती रकमेची फसवणूक झाली, किती गुंतवणूकदार बाधित आहेत आणि या व्यवहारामागील खरे सूत्रधार कोण, याचा सखोल तपास सुरू आहे. आर्थिक गुन्ह्यांचे जाळे राज्याच्या विविध जिल्ह्यांपर्यंत पसरले असल्याची प्राथमिक माहिती पुढे येत आहे. त्यामुळे या प्रकरणात आणखी अटकांची शक्यता नाकारता येत नाही.दरम्यान, “अल्पावधीत दुप्पट-तिप्पट परतावा” या आमिषाला बळी पडू नये, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे. वित्तीय गुंतवणूक करताना कंपनीची अधिकृत नोंदणी, व्यवहारांची पारदर्शकता आणि नियामक संस्थांची मान्यता तपासणे आवश्यक असल्याचेही पोलिसांनी स्पष्ट केले आहे. गुंतवणूकदारांचे कोट्यवधी रुपये परत मिळणार का, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे. आर्थिक फसवणुकीच्या वाढत्या घटनांमुळे प्रशासन आणि तपास यंत्रणांसमोर कठोर कारवाईचे आव्हान उभे राहिले आहे.

# होळी वृक्ष पूजन करुण साजरी करा निसर्ग प्रेमी मंडळीचे आव्हान

**जनमाध्यम प्रतिनिधी**



घाटंजी - होळीला आपल्याकडे मोठया प्रमाणात लाकडे जाळली जातात त्यासाठी निसर्गातील लाखो झाडे तोड़ली जातात त्यामुळे जंगल कमी होत आहे होळी सण वृक्ष पूजन करुण करावयाचे आवाहन निसर्गप्रेमी मंडळीनी केले आहे.

भारतीय संस्कृती मध्ये होळी ला लाकडे पेटवून साजरी केली जाते जुन्या काळात घराच्या बाहेर ,गावालगत जी किड पडलेली जुनी लाकडे आहे त्याला होळी मध्ये टाकून पेटवित असत कारण अशी पडलेली लाकडे उन्हाळयात आग लागण्याची शक्यता असते त्यापासून गाव सुरक्षित राहावे अशी जुन्या काळात मान्यता होती पण आता होळी साठी लाकडे विकत घ्यावी लागते. प्रत्येक गावात एक होळी तर मोठ्या गावात शहरात अनेक होळ्या पेटत असते.

प्रत्येक होळीमध्ये एक दोन वृक्षाचे जलतन जाळल्या गेली तर सर्व जिल्हाभर लाखो क्विंटल जलतन यामध्ये जाळल्या जातात याचा परिणाम लाखो वृक्ष या साठी तोडावे लागते.

सर्व लाकडे काही तासात सर्व जळून मोकळे होतात. यामुळे निसर्गाचे मोठे नुकसान होत आहे ते टाळण्यासाठी होळी मध्ये लाकड़ा ऐवजी शेणाच्या गोवऱ्या, छोटी काम नसलेली लाकडे, टाकून छोटी सांकेतिक होळी पेटवली पाहीजे.

त्यापेक्षा आपण निसर्गाचे संरक्षण करण्यासाठी आपल्या परिसरातील, कॉलनी, सर्व शाळेतील परिसरात वृक्षाचे पूजन केले पाहीजे. त्यामुळे वृक्षाचे महत्व सर्वाना कळेल. घाटंजीतील अनेक जिल्हा परिषदच्या शाळा तसेच शहरातील शिक्षण प्रसारक मंडळ विद्यालय घाटंजी येथे गेल्या १५ वर्षा पासून सर्व विद्यार्थी व् शिक्षक पालक यांच्या उपस्थीतीत वृक्ष पूजन करुण होळी साजरी करीत असतात तसेच यावेळी वृक्षाचे निसर्गातील महत्व विषद केले जाते.

याच प्रकारे सर्व नागरिकांनी शेतकरी, शिक्षक, विद्यार्थी, मंडळ यांनी सुद्धा वृक्ष पूजन करुण होळी साजरी करायचे आवाहन निसर्ग प्रेमी मंडळी घाटंजी यांनी केले आहे.

## • वेचक

### वाहन दुरुस्ती करण्याच्या वादातून मारहाण

वणी : वाहन दुरुस्ती करण्याच्या कारणावरून वाद घालून एकाला टामीने मारहाण करण्यात आली. एवढेच नव्हेतर संबंधिताचे दोन दात पाडून गंभीर जखमी केले. दरम्यान, वादात मध्यस्थी करणाऱ्या राजेंद्र प्रसाद यांना देखील शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिली. ही घटना २७फेब्रुवारी रोजी सीसीआय पेट्रोल पंप जवळ वणी येथे घडली. मोहम्मद जैनुद्दीन मोहम्मद जमालुद्दीन (४२) रा. मेघदूत कॉलनी वणी असे फिर्यादीचे नाव आहे. घटनेनंतर त्यांनी वणी पोलीस ठाणे गाढून याप्रकरणी रीतसर तक्रार दिली. त्यावरून पोलिसांनी आरोपी मोहम्मद रमजानी (५०), मोहम्मद सलमान (३०), मोहम्मद शकील (२२), मोहम्मद राजा (२८) सर्व रा. मेघदूत कॉलनी वणी यांच्यावर गुन्हा दाखल केला. या घटनेचा अधिक तपास वणी पोलीस करत आहे.

### मोटारपंप चोरीचा प्रयत्न

यवतमाळ : शेतात मोटारपंप चोरी करण्याकरिता आल्याच्या संशयावरून संबंधितांची चौकशी केली असता त्यांनी पळ काढला. दरम्यान, यातील एकाने दगड भिरकावून शेतमालकाला जखमी केले. ही घटना २६ फेब्रुवारी रोजी नागपूर धामणगाव बायपास मार्गावरील डोरली शेत शिवारात घडली. प्रीतम भास्कर नागरगोजे (३२) रा. डोरली तालुका जिल्हा यवतमाळ असे फिर्यादीचे नाव आहे. घटनेनंतर त्यांनी यवतमाळ शहर पोलीस ठाणे गाठून याप्रकरणी रीतसर तक्रार दिली. त्यावरून पोलिसांनी आरोपी प्रकाश वसंतराव (२०) रा. खनगाव यासह एकावर गुन्हा दाखल केला. घटनेचा अधिक तपास यवतमाळ शहर पोलीस करीत आहे.

### अज्ञात चोरट्याने दुचाकी पळविली

यवतमाळ : येथील एका दुचाकीच्या शोरुम समोरून कुणीतरी अज्ञात चोरट्याने दुचाकी पळविली. ही घटना २२ फेब्रुवारी रोजी दारव्हा मार्गावर उघडकीस आली. बंटी देवराव थोरात (४०) रा. नेताजी नगर, असे फिर्यादीचे नाव आहे. घटनेनंतर त्यांनी लोहारा पोलीस ठाणे गाठून एमएच २९ सीडी ९०८९ क्रमांकाची दुचाकी चोरी गेल्याची रितसर तक्रार दिली. त्यावरून पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

### अल्पवयीन मुलीला फूस लावून पळविले

वणी - एका अल्पवयीन मुलीला कुणीतरी अज्ञात आरोपीने फूस लावून पळविले. ही घटना वणी येथे उघडकीस आली आहे. याप्रकरणी पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरुद्ध मुलीला फूस लावून पळवून नेल्याचा गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित कुटुंब मूळचे छत्तीसगड राज्यातील आहे. सध्या ते वणीयवतमाळ मार्गावर लालपुलिया परिसरात मजुरी करून उदरनिर्वाह करत आहे. २२ फेब्रुवारी रोजी सकाळी ७.३० वाजताच्या सुमारास अल्पवयीन मुलगी घराबाहेर फिरण्यासाठी गेली होती. मात्र बराच वेळ उलटूनही ती परत न आली नाही. कुटुंबीयांनी परिसरात तसेच वणी शहरात तिचा शोध घेतला. सलग तीन दिवस शोध घेऊनही मुलगी न सापडल्याने अखेर २५ फेब्रुवारी रोजी कुटंबीयांनी वणी पोलीस ठाणे गाठून याप्रकरणी रितसर तक्रार दिली.

### वृत्तपत्र विक्रेता श्रेयस बनला विद्युत साहाय्यक

यवतमाळ : गत अनेक वर्षे ऊन्ह-पावसाची तमा न बाळगता शहरात पहाटे वृत्तपत्र वितरणाचे काम करणाऱ्या श्रेयस राजेंद्र डाखोरेची महावितरण कंपनीत पुणे येथे 'विद्युत साहायक' या पदावर निवड झाली आहे. प्रतिकूल परिस्थितीवर मात करत स्वतःचे भविष्य घडवणारा श्रेयस डाखोरे हा यवतमाळमधील अनेक तरुणांसाठी प्रेरणास्थान ठरला आहे. घरच्या आर्थिक परिस्थितीला हातभार लावण्यासाठी श्रेयसने २०१३ काम पासून वृत्तपत्र वितरक (पेपर टाकण्याचे काम) म्हणून करण्यास सुरुवात केली. पहाटेच्या वेळी जेव्हा सर्वजण गाढ झोपेत असतात, तेव्हा श्रेयस सायकलवरून यवतमाळकरांच्या घरी वृत्तपत्र पोहोचविण्याचे काम नित्यनेमाने करत होता. मात्र, हे काम करत असताना त्याने आपल्या शिक्षणाकडे कधीही दुर्लक्ष होऊ दिले नाही. खंड परिस्थिती कितीही कठीण असली तरी अभ्यासात पडू दिला नाही. त्याची महावितरण कंपनीत पुणे येथे विद्युत साहाय्यक म्हणून निवड झाली आहे. सामान्य कुटुंबातील एका वृत्तपत्र विक्रेत्याने आपल्या हिंमतीवर मिळविलेल्या या यशाबद्दल यवतमाळ जिल्हा वृत्तपत्र विक्रेता संघटना आणि मित्र परिवारातून त्याचे कौतुक केले जात आहे.

## सामाजिक कार्यकर्ते अमर पाटील चालबर्डीकर यांच्या वाढदिवसानिमित्त विविध उपक्रम

**जनमाध्यम प्रतिनिधी**



चालबर्डी : सामाजिक कार्यकर्ते अमर पाटील चालबर्डीकर यांच्या वाढदिवसानिमित्त चालबर्डी गावामध्ये विविध सामाजिक व शैक्षणिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. यानिमित्ताने जिल्हा परिषद माध्यमिक शाळेत वृक्षारोपण कार्यक्रम घेण्यात आला. अमर पाटील चालबर्डीकर यांच्या हस्ते वृक्षांची लागवड करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. यानंतर गावामध्ये विद्यार्थ्यांसाठी मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. अतिशय उष्ण वातावरणातही विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग नोंदविला.

मुलींच्या गटामध्ये प्रथम क्रमांक कु. प्राची वाघमारे हिने पटकावला, द्वितीय क्रमांक कुमारी साक्षी थांबरे हिने मिळविला तर तृतीय क्रमांक सोनाली टेकाम हिने मिळविला. मुलींच्या गटातील प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाची पारितोषिके अमर पाटील चालबर्डीकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आली. तीनही बक्षिसे अमर पाटील मित्र परिवार यांच्याकडून अनुक्रमे रुपये ५०१, ३०१ व २०१ देण्यात आले. मुलांच्या गटामध्ये प्रथम क्रमांक वंश गाडगे याने मिळविला. या प्रथम क्रमांकासाठी रुपये ५०१ चे बक्षीस संजय चिंतावार सर, मुख्याध्यापक आदर्श हायस्कूल यांच्या कडून देण्यात आले. ़वितीय क्रमांक व्यास कापडे याने पटकावला. त्यास रुपये ३०१ चे बक्षीस प्रा. डॉ. अमर वंजारी यांच्या कडून देण्यात आले. तृतीय क्रमांक उज्वल पवार याने मिळविला. त्यास रुपये २०१ चे बक्षीस श्री बी.पी. दडांजे सर, मुख्याध्यापक जिल्हा परिषद माध्यमिक शाळा चालबर्डी यांच्या कडून आले. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व विजेत्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच जिल्हा परिषद प्राथमिक शाळेमध्ये केक कापून वाढदिवस साजरा करण्यात आला व विद्यार्थ्यांना सामूहिक अल्पोपहार व खाऊ वाटप करण्यात आले. या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये क्रीडा भावना, सामाजिक जाणीव व पर्यावरणाविषयी जागरूकता निर्माण झाल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले. कार्यक्रमास गावातील मान्यवर, शिक्षकवृंद व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मृत्यूच्या उंबरठ्यावरून परतला राहुल..!

## नंददीप फाउंडेशनच्या ‘विजय-१६’ अभियानातून बेघर मनोरुग्णांना नवजीवन





**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ - रस्त्यावर बेवारस अवस्थेत जगणाऱ्या आणि मानसिक आजाराने ग्रस्त असलेल्या व्यक्तींना पुन्हा माणुसकीचा स्पर्श देत त्यांच्या आयुष्याला नवी दिशा देण्याचे कार्य करणाऱ्या नंददीप फाउंडेशनच्या “विजय-१६ पुनर्वसन अभियानाला” भावनिक यश मिळाले आहे. या अभियानाच्या माध्यमातून तीन बेघर मनोरुग्णांना त्यांच्या मूळ गावी नेऊन कुटुंबीयांशी पुन्हा एकत्र आणण्यात आले. या पुनर्वसन मोहिमेत राहुल आणि स्नेहल भरणे या दोघांना त्यांच्या कुटुंबीयांच्या स्वाधीन करण्यात आले. मात्र तिसऱ्या एका मनोरुग्णाने सांगितलेल्या गावात पोहोचल्यानंतर त्यांचे घरच अस्तित्वात नसल्याचे समोर आले. घर पूर्णपणे उद्ध्वस्त झाल्याने त्या व्यक्तीस पुन्हा नंददीप फाउंडेशनच्या निवारा केंद्रात आणून त्याची काळजी घेण्याची व्यवस्था करण्यात आली.

मागील पावसाळ्यात यवतमाळ शहरातील बाजार परिसरात एक व्यक्ती मृतावस्थेत पडून असल्याची माहिती नंददीप फाउंडेशनला मिळाली होती. मुसळधार पावसात चार दिवस थंड पाण्यात पडून राहिल्याने त्या व्यक्तीची अवस्था अत्यंत दयनीय झाली होती. शरीरावर गंभीर जखमा, त्यात पडलेले किडे आणि अर्धमृत अवस्थेत असलेले शरीर पाहून अनेकांनी आशा सोडली होती. परंतु नंददीप फाउंडेशनचे संस्थापक संदीप शिंदे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी माणुसकीचा हात पुढे करत तातडीने त्या व्यक्तीला उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले. त्या व्यक्तीचे नाव राहुल असल्याचे नंतर समोर आले.

उपचारांनी दिले नवजीवन : रामभाऊ शिरसकर, डॉ. प्रवीण राखुंडे आणि डॉ. कविता बोरकर यांच्या वैद्यकीय उपचारांमुळे राहुलची प्रकृती हळूहळू सुधारू लागली. पुढे मानसोपचारतज्ज्ञ डॉ. श्रीकांत मेश्राम यांच्या उपचारांनी राहुल पूर्णपणे सावरला. मृत्यूच्या उंबरठ्यावरून परत आलेल्या राहुलला पुन्हा आयुष्याची नवी संधी मिळाली.

### आई-मुलाचे भावनिक पुनर्मिलन

राहुलची ओळख पटवून त्याला देवगाव येथील कुटुंबीयांपर्यंत सुरक्षित पोहोचविण्यात आले. अनेक वर्षांपासून हरवलेला मुलगा अचानक समोर उभा राहिल्याचे पाहताच त्याची आई अश्रूंनी भरून आली. आई-मुलाचे ते भावनिक पुनर्मिलन पाहून उपस्थितांच्या डोळ्यांतही आनंदाश्रू तरळले. एका कुटुंबाला पुन्हा आपला हरवलेला संसार मिळाल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. ही पुनर्वसन मोहीम यशस्वी करण्यासाठी नंददीप फाउंडेशनचे स्वयंसेवक निशांत सायरे यांनी विशेष परिश्रम घेतले. त्यांच्या समर्पित कार्याचे संस्थेच्या वतीने कौतुक करण्यात आले. नंददीप फाउंडेशनतर्फे रस्त्यावर बेवारस अवस्थेत आढळणाऱ्या मनोरुग्णांना उपचार, निवारा आणि कुटुंबाशी पुनर्मिलन घडवून आणण्याचे कार्य सातत्याने सुरू असून ही सेवा समाजातील दात्यांच्या सहकार्यावर चालत असल्याचे संस्थेने सांगितले. माणुसकीचा हात पुढे केला तर एखाद्याचे संपूर्ण आयुष्य बदलू शकते, याचे जिवंत उदाहरण म्हणजे राहुलची ही हृदयस्पर्शी घरवापसी होय.

### गरजूव्यक्ती करिता भव्य रोगनिदान व मार्गदर्शन शिबीर

# पुसदमधील विविध संघटनेचा पुढाकार!

**जनमाध्यम प्रतिनिधी**



पुसद - १/०३/२६ रोजी पुसद येथील माणुसकीची भिंत सोशल फाउंडेशन, रुग्ण मित्र फाउंडेशन, मिशन ग्रीनबहुउद्देशीय संस्था व आयकॉन मल्टिस्पेशालिट हॉस्पिटल त्यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य रोगनिदान शिबिर पार्डी रोड निंबी येथे २३तारखेला झालेल्या संत गाडगे बाबा यांच्या जयंतीचे औचित्य साधुन 'कर्मयोगी संत गाडगेबाबा स्मृती स्थळ' जाधव बाग येथे परिसरातील गरजवंत प्रभुजींचे मोफत आरोग्य तपासणी व मार्गदर्शन शिबिर दिनांक १ मार्च २०२६रोजी संपन्न झाले. सर्व प्रथम उपस्थित मान्यवरांच्या हस्ते संत गाडगे बाबा, राजमाता जिजाऊ व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मूर्तिचे पूजन करण्यात आले.व नंतर शिबिरास सुरवात करण्यात आली.

या शिबिरात आयकॉन हॉस्पिटलच्या तज्ञ डॉक्टरांनी, हृदयविकार, उच्च रक्तदाब, मधुमेह, थायरॉईड, दमा, फुफुसाचे आजार, निमोनिया, किडनीचे आजार, मान पाठ दुखी, हाता पायाला मुंग्या येणे लहान बाळाचे कोणते ही आजार, नेत्र तपासणी व मार्गदर्शन, दंतचिकित्सा या सर्व रोगांवर गरजू उपस्थित रुग्णांची तपासणी करण्यात आली. या वेळेस आयकॉन हॉस्पिटलचे डॉ.राहुल जाधव,डॉ.पवन चव्हाण, नेत्रतज्ञ डॉ.उमेश रेवणवार, दंततज्ञ डॉ.सोमेश चोपडे,डॉ.रवी कोल्हाने, सुरेश मोटाळे व माणुसकीची भिंत सोशल फॉउंडेशनचे अध्यक्ष गजानन जाधव,रुग्ण मित्र फॉउंडेशनचे अध्यक्ष शांतिसागर इंगोले मिशन ग्रीन बहुउद्देशीय संस्था पुसदचे अध्यक्ष रमेश डंबोळे, उपाध्यक्ष पवन बोजेवार, सप्तखंजेरी वादक पंकजपाल महाराज, शेतीनिष्ठ शेतकरी व माणुसकीची भिंतचे मार्गदर्शक दत्तात्रय जाधव मिशन ग्रीनचे सर्वश्री नयन रामधनी, निखिल गादेवार, गौरी जाधव, मोनिका जाधव, रेखा आगलावे, रेखा अंभोरे, शिवानी अंभोरे, सोनाली पोटे तसेच निंबी पार्डी येथील रुग्ण व प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.

# वर्धा नदी घाटांवरील अनियमिततेचा बोजवारा

## ओव्हरलोड वाहतूक, नंबर प्लेटशिवाय ट्रक; महसूल प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह

**जनमाध्यम प्रतिनिधी**

राळेगाव - वर्धा नदी परिसरातील वाळू घाटांच्या लिलावानंतर राळेगाव तालुक्यातील काही घाटांवर नियमांना अक्षरशः तिलांजली दिली जात असल्याचे चित्र समोर येत आहे. घाटांचे लिलाव झाल्यानंतर वाळू वाहतुकीसाठी वाहनांचा अक्षरशः महापूर सुरू झाला असून, अनेक ठिकाणी शासनाने घालून दिलेल्या अटी व शर्तींचे उल्लंघन होत असल्याची चर्चा आहे.

स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार काही ट्रक बिना नंबर प्लेटचे धावताना दिसत आहेत, तर अनेक वाहनांत ओव्हरलोड वाळूची वाहतूक केली जात आहे. दिवस-रात्र सुरू असलेल्या या वाहतुकीमुळे शहरातील मुख्य रस्त्यांवर ताण वाढला असून अपघाताचा धोका निर्माण झाला आहे. विशेष म्हणजे, ही सर्व वाहतूक डोळ्यासमोर सुरू असतानाही संबंधित महसूल अधिकारी व कर्मचारी याकडे दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे. घाट लिलाव प्रक्रियेत शासनाने स्पष्ट नियमावली दिलेली असतानाही प्रत्यक्ष अंमलबजावणीत त्रुटी दिसून येत आहेत. घाटांवरून निघणाऱ्या वाहनांची तपासणी, वजन मोजणी, रॉयल्टी पावतीची पडताळणी आदी प्रक्रिया काटेकोरपणे राबविणे अपेक्षित असते. मात्र, प्रत्यक्षात अनेक वाहनांकडे योग्य कागदपत्रे नसल्याची तक्रार आहे. यामुळे शासनाला महसुली तोटा होत असल्याची शक्यता व्यक्त होत आहे.

दरम्यान, या परिस्थितीचा सर्वाधिक फटका बसत आहे तो गरीब घरकुल लाभार्थ्यांना. शहर व परिसरातील अनेक घरकुलधारकांचे बांधकाम रेतीअभावी रखडले आहे. शासकीय दराने रेती उपलब्ध होत नसल्याने त्यांना बाजारभावापेक्षा जास्त दराने वाळू खरेदी करावी लागत आहे. परिणामी, आधीच मर्यादित निधीत घर बांधणाऱ्या कुटुंबांवर आर्थिक ओझे वाढले आहे. स्थानिक नागरिकांच्या मते, शहरातील मोठ्या बांधकामांना मात्र वाळू सहज उपलब्ध होत असल्याचे चित्र आहे. त्यामुळे गरीब लाभार्थ्यांना रेती मिळत नसताना मोठ्या प्रकल्पांना पुरवठा कसा होतो, असा सवाल उपस्थित केला जात आहे. या सर्व पार्श्वभूमीवर राळेगाव येथील उपविभागीय अधिकारी (एस. डी.ओ.) तसेच तहसीलदार यांनी तातडीने लक्ष घालून वस्तुस्थितीची चौकशी करावी, अशी मागणी जोर धरत आहे. नागरिकांनी घाटांवर अचानक तपासण्या, ओव्हरलोड वाहनांवर कारवाई, बिना नंबर प्लेट वाहनांवर दंडात्मक उपाययोजना तसेच घरकुल लाभार्थ्यांसाठी स्वतंत्र वाळू कोटा निश्चित करण्याची मागणी केली आहे. अन्यथा, या अनियमिततेविरोधात तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही काही सामाजिक संघटनांकडून देण्यात येत आहे. महसूल प्रशासनाने या प्रकरणाची दखल घेऊन पारदर्शकता राखत कठोर कारवाई केली, तरच सर्वसामान्यांचा शासनावरचा विश्वास टिकून राहील, अशी भावना व्यक्त होत आहे.

## स्व. देवरावजी गेडाम यांच्या जयंतीनिमित्त आश्रमशाळा वांजरी येथील विद्यार्थ्यांचा प्रेरणादायी संकल्प

**जनमाध्यम प्रतिनिधी**



पांढरकवडा - महाकाली आदिवासी विकास संस्था द्वारा संचालित प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळा वांजरी (पोड), ता. केळापूर येथे संस्थापक अध्यक्ष स्व. देवरावजी जैतुजी गेडाम साहेब यांची ७९ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाची सुरुवात प्रतिमा पूजन व दीपप्रज्वलनाने झाली. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व सर्व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक वानखडे सर तर प्रमुख अतिथी म्हणून प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक वाय. आर. राऊत सर उपस्थित होते. अध्यक्षीय भाषणात वानखडे सरांनी विद्यार्थ्यांना जयंतीदिनी घेतलेला संकल्प आयुष्यभर जपण्याचे आवाहन केले. प्रास्ताविकात राऊत सरांनी स्व. गेडाम साहेबांच्या कार्याचा व जीवनप्रवासाचा आढावा घेतला. वांजरी गावचे पोलीस पाटील अशोक कुमरे तसेच सौ. आठवले मॅडम यांनीही मनोगत व्यक्त करत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनीही स्व. गेडाम साहेबांच्या कार्यापासून प्रेरणा घेऊन समाजसेवेचा संकल्प व्यक्त केला. कार्यक्रमानिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. शेवटी विद्यार्थ्यांना फळवाटप करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. सूत्रसंचालन भाटे सर यांनी तर आभार प्रदर्शन बोडेवार सर यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेतील सर्व कर्मचारीवृंदांनी परिश्रम घेतले.

### माळवाकद येथे सेवालाल महाराज व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीच्या निमित्त सत्कार सोहळा

**जनमाध्यम प्रतिनिधी**



महागाव - माळवाकत स्थानिक जि.प.मराठी शाळा माळवाकद येथे नुकताच घेतलेल्या सामान्य ज्ञान परीक्षेत घवघवीत यश मिळवणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा,सामान्य ज्ञान स्पर्धा परीक्षेत सर्वाधिक गुण मिळविलेल्या पहिल्या गटातील ५ विद्यार्थी दुसऱ्या गटातील ३ विद्यार्थी, शैक्षणिक सत्र २०२५ मधील १० वी १२ वी ६५% पेक्षा जास्त गुण संपादन केलेले विद्यार्थी, माळवाकद गावातील शासकीय सेवेत नव्याने रुजू झालेल्या सेवानिवृत्त, शैक्षणिक व विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी करण्याऱ्या गुणवंताच सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन विद्यार्थ्यांचा व सत्कार्मुर्तीचं गौरव करण्यात आला.

जि.प.शाळेच्या प्रांगणात आयोजित या सोहळ्यात प्रमुख मार्गदर्शक मा.पानतावने सर (गटविकास अधिकारी भंडारा लाखनी) व प्रा.निरंजन राठोड सर (दत्त सेवा अकॅडमि पुसद) प्रमुख पाहुणे म्हणून जेष्ठ नागरिक रामा कांबळे, विष्णू गव्हाने सर,सुरेश राठोड, अविनाश राठोड सर, ठेंगळे सर, खाडे सर, पांडुरंग राठोड, ऍडव्होकेट गोपाल राठोड कार्यक्रमाचे अध्यक्ष सौ.रसिकाबाई पानपट्टे पाटिल कार्यक्रमाला उपस्थित गावकरी मंडळी, विद्यार्थी व पालक यांना प्रमुख मार्गदर्शक यांनी मार्गदर्शन केलं कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मा.धुर्वे सर यांनी केला. सोहळ्याला मोठ्या संख्येने गावकरी,पालक आणि विद्यार्थी, नवतरुण मंडळी उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन सामाजिक कार्यकर्ते डॉ. गोपाल डि.राठोड यांनी केले तर राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

## तब्बल २२ वर्षानंतर मिळाला अतिक्रमीत शेत जमीनीचा ताबा

**जनमाध्यम प्रतिनिधी**

उमरखेड - तालुक्यातील ब्राह्मणगाव येथील श्रीमती कमलबाई पलंचेवार यांचे जमीनीवर लगत कास्तकाराने जवळपास 1 एकर जमीनीवर बेकायदेशीर अतिक्रमण केले होते परंतु कमलबाई पलंचेवार त्यांना ताबा मागुनही दिला नाही. त्यामुळे सन 2004 मध्ये दिवाणी न्यायालयात दावा दाखल केला. प्रकरण न्यायालयात प्रदिर्घ काळ चालल्यानंतर प्रकरणाचा निकाल कमलबाई पलंचेवार यांचे सारखा झाला व न्यायालयाने अतिक्रमीत 34 गुंठे जमीनीचा ताबा देण्याचा व उत्पन्न नुकसानीची चौकशी करण्याचा आदेश पारीत केला. सदर आदेशाप्रमाणे 34 आर जमीनीचा ताबा कमलबाई पलंचेवार यांना दि. 07/01/2026 रोजी न्यायालयाचे बेलीफ व कर्मचारी यांचे मार्फत कायदेशीररित्या मिळाला व त्याबाबत त्यांनी न्यायालयाचे समाधान व्यक्त केले. कमलबाई पलंचेवार यांनी न्यायालयीन प्रक्रियेत कायदेशीर मार्गाचा अवलंब करुन ताबा मिळविण्यासाठी सन 2004 पासुन प्रयत्नरत होत्या व शेवटी सन 2026 मध्ये त्यांना कायदेशीररित्या ताबा मिळाला, याबाबत कमलबाई पलंचेवार यांनी न्यायालयाचे व कर्मचाऱ्यांचे तसेच भुमी अभिलेख कार्यालय उमरखेड यांचे सुध्दा आभार व्यक्त केले. कमलबाई पलंचेवार यांचे तर्फे त्यांची बाजु ॲड. श्री. प्रेमानंद माळवे यांनी प्रखरतेने व अत्यंत सचोटीने मांडुन त्यांना न्याय मिळवुन दिला. याचेही त्यांनी आभार मानले. शेवटी तब्बल 22 वर्षाच्या प्रदिर्घ न्यायालयीन प्रक्रियेनंतर अतिक्रमीत 34 गुंठे जमीनीचा ताबा मिळाला.

## शेतकरी, आदिवासी व मजूरांच्या हक्कासाठी विविध मागण्यांकरीता

# मेळघाटात बच्चू कडू यांच्या २५० किमी पदयात्रेला प्रारंभ

### वयोवृद्ध आदिवासी बांधवांचे घेतले आशीर्वाद घेत

**अचलपूर/वार्ताहर**

मेळघाट व दुर्गम भागातील शेतकरी, आदिवासी आणि मजूर वर्गाच्या वर्षानुवर्षे प्रलंबित असलेल्या मूलभूत प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी माजी आमदार बच्चू कडू यांनी आजपासून मेळघाटात २५० किलो.मीटरच्या पदयात्रेला आज १ मार्च पासून परतवाडा शहरातील चिखलदरा स्टॉप येथे वयोवृद्ध आदिवासी बांधवांचे आशीर्वाद घेत सुरुवात केली आहे. १ मार्च ते ९ मार्च दरम्यान ही पदयात्रा पार पडणार असून ९ मार्च रोजी चिखलदरा येथे महाअंतिम मोर्चाने यात्रेची सांगता होणार आहे.

माजी आमदार बच्चू कडू यांनी परतवाडा शहरातील वयोवृद्ध आदिवासी बांधवांशी संवाद ही साधला .यावेळी प्रहार पक्षाचे अशपाक खान , सूरज कश्यप ,विशाल खडसे, शेख नासिर ,शेख जमील तसेच आदिवासी बांधव मोठ्या संख्येने उपस्थितीत होते.यावेळी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना माजी आमदार बच्चूभाऊ कडू यांनी सांगितले की ,ही पदयात्रा केवळ आंदोलन नसून मेळघाटातील प्रत्यक्ष परिस्थितीचा थेट आढावा घेत शासनाला जाब विचारण्याचा प्रयत्न आहे. प्रत्येक गावात ग्रामसभा, नागरिक संवाद व समस्यांची नोंद घेऊन त्या शासनापर्यंत पोहोचविण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला . शेतकरी कर्जमाफी व आर्थिक दिलासा, मनरेगा व रोजगार हमी, मानव-वन्यप्राणी संघर्षावर ठोस धोरण, वीज, पाणी व मूलभूत सुविधा, शिक्षण व



आरोग्य सुधारणा रस्ते व वाहतूक यासह सुरक्षित वाहतुकीसाठी लहान बसेस, ट्रॅव्हलर व जीप सेवा सुरू करणे, आपत्कालीन परिस्थितीत एअरलिफ्टची व्यवस्था आदी समस्यांकडे लक्ष वेधणार आहे .अचलपूर तालुक्यातून नव्हे तर संपूर्ण जिल्ह्यातील प्रहार जनशक्ती पक्षाचे नेते मंडळी,कार्यकर्ते ,पदाधिकारी मेळघाट कडे आज रवाना झाले आहे.

## विश्वमांगल्य छात्र सभा द्वारा शक्ती संवाद २०२६

### विदर्भातील ३२० विद्यार्थिनींचा सहभाग

**अमरावती/का.प्र.**

विश्वमांगल्य छात्र सभा द्वारा शक्ती संवाद २०२६ - भारतीय अभिव्यक्ती की खोज या एक दिवसीय परिषदेचे आयोजन श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या विमलाबाई देशमुख सभागृहात संपन्न झाले. संपूर्ण विदर्भातील विविध महाविद्यालयांमधून एकूण ३२० विद्यार्थिनींचा सहभाग परिषदेकरिता होता.

या परिषदेच्या उद्घाटन सत्राला विश्वमांगल्य छात्रसभा अखिल भारतीय संरक्षक तथा शिवाजी शिक्षण संस्थेचे कार्यकारणी सदस्य हेमंत काळमेघ, २०१९ च्या मिसेस इंडिया युनिव्हर्स मा. रूपलजी मोहता, विश्वमांगल्य सभा विदर्भ प्रांत संरक्षक अंजली देव, विश्वमांगल्य छात्रसभा अखिल भारतीय संयोजिका श्रुती देशपांडे, विश्वमांगल्य छात्र सभा विदर्भ प्रांत अध्यक्ष स्मिता देशमुख या



मान्यवरांची विशेष उपस्थिती लाभली.यावेळी बोलताना हेमंत काळमेघ यांनी विविध स्पर्धांमध्ये सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांचे कौतूक केले तसेच विश्वमांगल्य छात्र सभेचे कार्य भारतभर अधिक वृद्धिंगत होवो अशा शुभेच्छा दिल्या व विद्यार्थ्यांना कार्य करण्यास प्रोत्साहन दिले.

उद्घाटनानंतर झालेल्या दुसऱ्या सत्रात 'युवतींच्या जीवनात भारतीयतेचे चिंतन' या विषयावर श्रुती देशपांडे यांनी अभ्यासपूर्ण मार्गदर्शन केले. युवतींच्या माध्यमातून येणाऱ्या पन्नास वर्षात कोणते भारतीय विमर्श स्थापित केले पाहिजे यावर या सत्रात चिंतन झाले. तसेच सांस्कृतिक नेतृत्व करणाऱ्या युवतींची गरज आज समाजाला आहे हे त्यांनी प्रतिपादित केले.तिसऱ्या सत्रात 'गर्ल्स पार्लमेंट' हा अभिनव उपक्रम राबविण्यात आला. या सत्रात विद्यार्थिनींनी भारतीय संस्कृती, कुटुंबव्यवस्था, निसर्गसंवर्धन, भारतातील प्रेरणादायी कथा तसेच सामाजिक जबाबदारी यावर आपले स्पष्ट व अभ्यासपूर्ण विचार मांडले. विद्यार्थिनींच्या प्रभावी सादरीकरणामुळे सत्रात सशक्त संवाद घडून आला.कार्यक्रमाच्या समारोपीय सत्रासाठी बियाणी महाविद्यालयाच्या प्राध्यापिका मा. प्राची जी अग्रवाल उपस्थित होत्या.

## पर्यावरणपूरक होळी साजरी करा

### प्रभात निसर्ग संस्कार मंडळाचे आवाहन

**अमरावती/का.प्र.**

होळी हा आनंद, एकोपा आणि सामाजिक सलोख्याचा सण आहे. मात्र या उत्सवात पर्यावरणाचे भान राखणे ही काळाची गरज असल्याचे स्पष्ट करत स्थानिक खोलापुरी गेट येथील प्रभात एज्युकेशन सोसायटी संचलित प्रभात निसर्ग संस्कार मंडळाच्या वतीने नागरिकांना पर्यावरणपूरक होळी साजरी करण्याचे ठाम व आग्रहपूर्वक आवाहन करण्यात आले आहे.

'सण साजरा करताना निसर्गाची हानी होणार नाही, याची प्रत्येकाने जबाबदारी घ्यावी,' असे मंडळाने स्पष्ट केले आहे. होळी पेटविताना हिरवी, ओली झाडे किंवा त्यांच्या फांद्या तोडू नयेत. प्लास्टिक, रबर अथवा इतर घातक कचरा जाळणे टाळावे, कारण त्यामुळे विषारी धूर निर्माण होऊन



पर्यावरण व आरोग्यावर दुष्परिणाम होतात. नागरिकांनी स्वच्छ, सुरक्षित आणि मर्यादित साधनांमध्ये होळी साजरी करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश द्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.रंगपंचमीच्या निमित्ताने सर्वांनी जात, धर्म, पंथ यांचे भेद विसरून रंगोत्सव साजरा करावा; मात्र रासायनिक व त्वचेला अपायकारक रंगांना दूर ठेवावे. नैसर्गिक फुले, पाने व हळद-चंदनापासून तयार केलेले रंग वापरण्यावर भर द्यावा. शक्यतो नैसर्गिक गुलालाचा कोरड्या स्वरूपात वापर केल्यास त्वचेचे संरक्षण होईल आणि पाण्याचीही बचत होईल. जलस्त्रोत, विहिरी, तलाव यामध्ये कोणतेही रासायनिक रंग टाकू नयेत, जेणेकरून मुक्या जीवांना तसेच नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण होणार नाही, अशी सूचनाही मंडळाने केली आहे.

'आनंद साजरा करताना निसर्ग वाचवा' हा संदेश प्रत्येक घरापर्यंत पोहोचविण्यासाठी नागरिकांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन प्रभात निसर्ग संस्कार मंडळाचे अध्यक्ष एल. के. व्ही. पवार, वि. दा. पवार, माधुरी नेरकर, अशोक पांडे, नरेंद्र पाटणे, सुरेंद्र धामणकर, गजानन माहुलकर, संजय वाघुळे तसेच विदर्भ पर्यावरण परिषदच्या कविता पवार, वैशाली कांडलकर, रोझीना शेख, झाकीर कुरेशी आदी पदाधिकाऱ्यांनी केला आहे.

## रमेश कुबडे यांचे निधन

**चांदूर रेल्वे/वार्ताहर**



तालुक्यातील आमला विश्वेश्वर येथील जनता दलाचे ज्येष्ठ कार्यकर्ते, फुले–शाहू चळवळीचे अभ्यासू विचारवंत तथा माजी आमदार स्व. डॉ. पांडुरंग ढोले यांचे खंदे समर्थक रमेश मुरलीधर कुबडे (वय ६० वर्षे) यांचे शनिवार, २८ फेब्रुवारी रोजी पहाटे सुमारे ५ वाजताच्या दरम्यान हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने दुःखद निधन झाले.रमेश कुबडे यांनी आयुष्यभर, आंदोलन सामाजिक चळवळीत सक्रिय सहभाग घेत फुले–शाहू– आंबेडकरी विचारांचा प्रसार केला. माजी आमदार स्व. डॉ. पांडूरंग ढोले यांच्यासोबत खांद्याला खांदा लावून त्यांनी जनता दलाच्या माध्यमातून अनेक सामाजिक उपक्रम, जनजागृती मोहिमा आणि संघटनात्मक कामात मोलाचे योगदान दिले. ओ.बी सी विद्यार्थ्यांना स्कॉलरशिप मिळावी यामध्ये त्यांचा सहभाग होता. ते रोख ठोक बोलणारे व्यक्ती होते. त्यांच्या निधनाने आमला विश्वेश्वर परिसरात शोककळा पसरली असून सामाजिक व राजकीय क्षेत्रातून हळहळ व्यक्त होत आहे. त्यांच्या पार्थिवावर शनिवार हिंदू स्मशानभूमी, आमला विश्वेश्वर येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, १ मुलगा, १ मुलगी असा परिवार आहे.

## उध्दवराव शिवणकर

**अमरावती-** यशोदा नगर मार्गावरील कमल कॉलनी येथील रहिवासी उध्दवराव शिवणकर यांचे वृध्दापकाळाने शनिवार २८ फेब्रुवारी रोजी निधन झाले. मृत्यू समयी ते ९६ वर्षाचे होते. त्यांच्यावर रविवारी हिंदू स्मशानभूमी येथे अंतिम संस्कार करण्यात आले. यावेळी जनसमुदाय मोठ्या संख्येने उपस्थित होता.



## आयएमए अमरावती शाखा व भारतीय स्त्री शक्तीतर्फे मराठी भाषा गौरव दिन

**अमरावती/का.प्र.**

इंडियन मेडिकल असोसिएशन व भारतीय स्त्री शक्ति अमरावती शाखा ह्यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी भाषा गौरव दिवस, आय एम ए हॉल,कॅम्प येथे उत्साहपूर्ण संपन्न झाला .

कोण होणार साहित्य - सखा - सखी? ह्या वंदनीय कुसुमाग्रजांच्या साहित्यावर आधारीत कार्यक्रमात, भारतीय स्त्री शक्ती व आय एम ए च्या सदस्यांनी सहभाग नोंदवला. स्पर्धेला स्त्री शक्तिच्या माजी अध्यक्ष डॉ. मोहना कुळकर्णी व प्राध्यापक अलकनंदा तुळजापूरकर परीक्षक म्हणून लाभल्या.भारतीय स्त्री शक्तिच्या अध्यक्ष मंजिरी महाजन,सहसचिव प्राची जोशी,आय एम ए च्या अध्यक्ष डॉ अलका कुथे व सचिव डॉ राधा सावदेकर ह्यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन् केले. उद्घाटनानंतर स्त्री शक्तिच्या उपाध्यक्ष, अपर्णा आठवलेंनी परीक्षकांचे स्वागत केले.पहिल्या प्रश्नमंजुषा फेरीत मराठीच्या प्राध्यापिका डॉ.भाग्यश्री देशपांडे ह्यांनी कुसुमाग्रजांच्या जीवन व



साहित्यावर चौफेर प्रश्न विचारले.स्पर्धकांनी विस्तारपूर्वक उत्तरे दिली.दुसरी शिरवाडकरांच्या कवितांवरील फेरी भारतीय स्त्री शक्तिच्या ज्येष्ठ सदस्या व कोषाध्यक्ष, विजया टेंबेनी घेतली ज्यात विशाखा काव्यसंग्रहातील निसर्ग, क्रांती, श्रावण, प्रेमगीत अश्या सर्व प्रकारच्या कवितांचा समावेश होता.तिसरी नाट्याभिनयाची फेरी भारतीय स्त्री शक्तिच्या उपाध्यक्ष अपर्णा आठवलेंनी घेतली ज्यात नटसम्राट व वीज म्हणाली धरतीला या नाटकांचे छोटे प्रवेश वेशभूषा व अभिनयासह अतिशय ताकदीने स्पर्धकांनी सादर केले. चौथी कुसुमाग्रजांच्या गीतांवरील फेरी स्त्री शक्तिच्या सदस्या व आयएमए च्या अध्यक्ष डॉ.अलका कुथेंनी घेतली,ज्यात नाट्य, चित्रपट व कुसुमाग्रमांच्या गाण्यांच्या आलबम् मधील गीतांचे ध्रुवपद, गायक,संगीतकार व नाटक/चित्रपट/अलबम् चे नाव सांगायचे होते. या फेरीला पण खूपच छान प्रतिसाद मिळाला.

भाग्यश्री देशपांडे च्या जलद प्रश्न फेरीमधे सर्व गटांच्या गुणांचे गणित बदलले.परीक्षणाचे जटिल काम डॉ.मोहना कुलकर्णी व प्रा.अलकनंदा तुळजापूरकर ह्यांनी लीलया पार पाडले. स्पर्धेचे प्रथम बक्षीस,डॉ शोभा पोटोडे, किर्ती पांडे व स्नेहल करूले ह्यांच्या वृत्त गटाला, द्वितीय बक्षीस,डॉ आशा ठाकरे,माया पवार व संपदा खेडकर हयांच्या मुक्तछंद गटाला, तिसरे बक्षिस, डॉ संध्या काळे, डॉ ज्योती जावरकर व श्रद्धा संत ह्यांच्या श्लोक गटाला मिळाले. डॉ शुभांगी मुंधडा,डॉ. सूयोगा पानट व अर्चना खेडकर ह्यांच्या ओवी गटाला व डॉ. विदुला गोडबोले,जयश्री पोतदार व तृप्ती टोपरे हयांच्या अभंग गटाला उत्तेजनार्थ बक्षिसं देण्यात आली स्पर्धेनंतर संगीता माथने व शीतल देशपांडे ह्यांनी कुसुमाग्रजांच्या कविता सुंदर रित्या सादर केल्या. समारोपीय भाषण अध्यक्ष स्त्री शक्ति,मंजिरी महाजन ह्यांनी केले. प्रा.अलकनंदा तुळजापूरकर यांच्या स्मरतील गोकूळ सारे... व डॉ मोहना कुळकर्णी ह्यांच्या सर्वात्मका सर्वेश्वरा... ह्या गाण्यांनी सर्वांना मोहीत केले. संचालन, छाया साठेने केले. परीक्षकांच्या हस्ते बक्षिस वितरण झाल्यावर डॉ राधा सावदेकर ह्यांच्या आभार प्रदर्शनाने झाली.डॉ प्रल्हाद पाटील, डॉ विजय कुथे, डॉ उषा देशमुख, डॉ प्रतिभा काळे, डॉ उषा गजभिये, डॉ मेश्राम, डॉ अंशू चांडक व सदस्य, तसेच स्त्री शक्तिच्या पूर्वाध्यक्ष, संध्या साऊरकर, मनिषा मराठे, वाचक मंचाच्या श्रध्दा साऊरकर, नेहा वावगे, सूचेता दंडवते, ॲड.रुपाली अनासाने, रश्मि तेलंग, संगीता माथने व इतर सदस्य वर्ग उपस्थित होते.

## कवित्व ही महिलांकरिता जन्मजात देणगी-ज्येष्ठ साहित्यिक प्रा.थोरात

**अमरावती/का.प्र.**

जात्यावरच्या गीतापासून सुरू झालेली कविता घरादारात अंगाई गीतापर्यंत पोहचली ती जीवनाच्या प्रत्येक अंग-प्रत्यांगावर शब्दबद्ध होऊ लागली आणि या शब्दांच्या गुंफणमध्ये महिलांचा अगदी पहिला वाटा राहिलेला आहे म्हणूनच काव्यलेखनाची प्रतिभा ही महिलांना जन्मजात आहे, असे प्रतिपादन अमरावती येथील ज्येष्ठ साहित्यिक प्रा. अशोकजी थोरात यांनी महिला महाविद्यालय, जोग चौक, अमरावती येथील मराठी विभागाद्वारे 'मराठी भाषा गौरव दिनानिमित्त' आयोजित 'उद्याचे कवी घडवितांना' या कार्यशाळेमध्ये केले.

स्वर्गीय दादासाहेब खापर्डे यांनी स्थापन केलेल्या नूतन विदर्भ शिक्षण मंडळ द्वारा संचालित महिला महाविद्यालयातील मराठी



विभागाद्वारे मराठी भाषा गौरव दिनानिमित्त' आयोजित 'उद्याचे कवी घडवितांना' या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयातील प्राचार्य डॉ. अरुणा वाडेकर होत्या.कार्यक्रमाला प्रमुख अतिथी तथा मार्गदर्शक म्हणून महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध ज्येष्ठ कवी प्रा. अशोक थोरात तसेच महाविद्यालयातील भाषा विभागाचे समन्वयक प्रा. जयवंत पराते व प्रा. चेतन यावलीकर हे उपस्थित होते. तसेच याप्रसंगी सिटी कोतवाली पोलिस स्टेशन अमरावती येथील पोलिस निरीक्षक मनोहर कोटनाके यांनी विशेष उपस्थिती दर्शविली.

कार्यशाळेच्या माध्यमातून विद्यार्थिनींना काव्यलेखनाच्या तंत्राविषयी तसेच काव्यरचना कशा पद्धतीने करावी, जीवनातील विविध अनुभवांचे बंध कसे गुंफायचे असतात याविषयीचे मार्गदर्शन आपल्या प्रदीर्घ अशा काव्यलेखनाच्या, अनुभवांच्या आधारे प्रा. अशोक थोरात यांनी करून दिले. अभंग, ओवी, छंदबद्ध कविता, मुक्तछंदातील कविता, गझल, इत्यादी काव्यलेखनाच्या प्रकारांवर सरांनी आपल्या मार्गदर्शनामध्ये प्रकाश टाकला. कवी हे घडविता येत नाहीत तर ते जन्मजात प्रतिभा घेऊनच आलेले असतात. येथे उपस्थित असलेल्या प्रत्येक व्यक्तीमध्ये सुद्धा ही 'प्रतिभा' शक्ती निश्चितच आहे मात्र त्याची आपल्याला जाणीव नसते. त्यामुळे ती जाणीव या कार्यशाळेच्या माध्यमातून निश्चितच होईल, असा विश्वास प्रा.अशोकजी थोरात यांनी दर्शविला. कार्यशाळेला विशेष उपस्थित असलेले पोलीस निरीक्षक मनोहर कोटनाके सरांनी आपल्या मनोगतामधून दैनंदिन जीवनात मराठी भाषेचा वापर वाढवून तिला समृद्ध करावे, याकरिता उपस्थित सर्वांना शपथ दिली.

कार्यशाळेत विविध कविताही सादर करण्यात आल्या. त्यामध्ये राज्यशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख प्रा. डॉ. प्रविण गुल्हाने सरांनी आपल्या विशेष अशा वऱ्हाडी बोलीमध्ये 'घेन नाही नाही देन नाही' या एका बायकोची व्यथा सांगणारी विनोदी कविता विद्यार्थिनींसमोर सादर केली. तसेच, प्रा. अशोकजी थोरात यांनी 'हजल' या विनोदी कवितेचे सादरीकरण करून कार्यशाळेतील उपस्थितांमध्ये हास्य फुलविले तर प्रा. डॉ. अरुणा वाडेकर यांनी काही चारोळ्या विद्यार्थिनींसमोर सादर केल्या. कार्यशाळेत डॉ. अरुणा वाडेकर यांनी अध्यक्षीय भाषणामध्ये सांगितले की आपल्या जीवनातील भावभावना व्यक्त करण्याचे एक प्रभावी साधन म्हणजे काव्यलेखन होय. काव्याच्या माध्यमातून आपण जीवनाचा गहण असा अर्थ कमीत कमी शब्दांमध्ये व्यक्त करू शकतो. 'अल्पाक्षरत्व' हे कवितेचे वैशिष्ट्य आहे आणि त्यामुळेच ती जीवनाच्या अनेक अंगावर सहजपणे अगदी कमीत कमी शब्दांमध्ये व्यक्त होऊ शकते.

कार्यशाळेला महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थिनींची उपस्थिती होती या कार्यशाळेचे प्रस्ताविक प्रा. रोशन दाभेकर , प्रमुख अतिथींचा परिचय प्रा.चेतन यावलीकर तसेच सूत्रसंचालन प्रा. अमृता भोरे यांनी केले व उपस्थितांचे आभार प्रा. कविता नेवारे यांनी मानले. ही कार्यशाळा म्हणजे उद्याचे कवी घडविण्याचा सूर्योदय आहे. या कार्यशाळेच्या माध्यमातून उद्या भावी कवयित्री जन्माला आल्याशिवाय राहणार नाही, असे मत या कार्यशाळेकरिता उपस्थित असलेल्या विद्यार्थिनींनी व्यक्त केले.

## संक्षिप्त

### लोकेश चंद्र यांचा 'नॅशनल लीडरशिप अवॉर्ड २०२६' ने गौरव



**अमरावती-** महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांच्या ऊर्जा क्षेत्रातील कामगिरीची दखल घेत त्यांचा आयोजित यंदाच्या नॅशनल लिडरशिप परिषदेमध्ये 'इंडियाज बिझीनेस लिडर ऑफ एक्सलेन्स अवॉर्ड-२०२६' या पुरस्काराने गौरव करण्यात आला.मुंबई येथील स्टॉक एक्सचेंजच्या इंटरनॅशनल कन्व्हेन्शन हॉलमध्ये टाइम्स एस्पायर या संस्थेच्या वतीने नॅशनल लिडरशिप शिखर परिषदेचे आयोजन करण्यात आले. या परिषदेत संस्थात्मक उत्कृष्ट नेतृत्व, पर्यावरण व शाश्वत ऊर्जा, नाविन्यपूर्ण उपक्रम, कौशल्य विकास, आधुनिक तंत्रज्ञान आदींवर सादरीकरण व चर्चा करण्यासाठी देशातील खासगी व सरकारी विभागांचे वरिष्ठ अधिकारी सहभागी झाले होते. यावेळी अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांना जाहीर झालेला पुरस्कार त्यांच्यावतीने संचालक (संचालन) सचिन तालेवार, विशेष कार्य अधिकारी मंगेश कोहाट यांनी स्वीकारला.

---

### डॉ.नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या वतीने स्वच्छता अभियान



**अमरावती-** शहरातील प्रादेशिक परिवहन कार्यालय कॅम्प आणि वरिष्ठ जिल्हा कोषागार कार्यालय येथे डॉक्टर नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान रेवदंडा, अलिबाग ,जिल्हा रायगड यांच्या सौजन्याने स्वच्छता अभियान राबविण्यात आले या स्वच्छता अभियानात परिसरातील संपूर्ण कचरा साफ करून सुका व ओला कचरा वेगवेगळा केला गेला ,अंदाजे ३००० किलो कचरा गोळा करण्यात आला, तसेच परिसरातील प्लास्टिक पिशव्या व इतर कचरा महानगरपालिकेच्या सहकार्याने मनपाच्या कचरा गाडीतून उचलण्यात आला.शहरातील या स्वच्छता अभियानात करिता प्रतिष्ठानचे श्री सदस्य स्वेच्छेने उपस्थित राहून स्वच्छतेसाठी लागणारे मास्क, ग्लोज व इतर साहित्याने आरोग्याची काळजी घेत या स्वच्छता अभियानात मोठ्या संख्येने उपस्थित राहिले आणि प्रतिष्ठानच्या शिस्तबद्ध कार्यक्रमांतर्गत जिल्हा कोषागार कार्यालय आणि प्रादेशिक परिवहन कार्यालयाची स्वच्छता करून संपूर्ण परिसरात प्रतिष्ठानच्या कार्याची छाप उमटवली. अभियानामध्ये प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या अधिकारी श्री श्रीमती उर्मिलाताई पवार , जिल्हा कोषागार कार्यालयाच्या अधिकारी शिल्पा पवार,महानगरपालिकेचे डॉ .अजय जाधव,तसेच धर्माधिकारी प्रतिष्ठानचे श्री उमेश दत्तात्रय धर्माधिकारी यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

---

### हिंदू समाजाला जागृत आणि समर्थपणे उभे करायचे-श्याम हरकरे



**धामणगाव रेल्वे-** सर्वसामान्य हिंदू समाजाला आपल्याला जागृत आणि समर्थपणे उभे करायच आहे सर्वसामान्य हिंदू सामर्थ्यवान बलवान होईल तेव्हाच भारत परम वैभवापर्यंत नक्कीच पोहोचेल राष्ट्रीय स्वयंसेवक संघ केवळ भाषणातूनच नव्हे तर १०० वर्षात संघाने कृती मधून हिंदू जागृती केलेली आहे त्यामुळे हेच कार्य आपण सर्वांनी केले तरच संघटित हिंदू समर्थ भारत तयार होईल असे प्रतिपादन धर्म जागरण अखिल भारतीय परियोजना प्रमुख श्याम हरकरे यांनी व्यक्त केले.ते तळेगाव दशासर येथे विराट हिंदू संमेलनात बोलत होते याप्रसंगी मंचावर सिताराम बाबा यांच्या परम शिष्या माहेश्वरी दीदी व ए.एम.पी.एस कॉन्व्हेंट चे अध्यक्ष जगत देवानंद अवधूत महाराज प्रामुख्याने उपस्थित होते.आपल्या १०० व्या वर्षात पदार्पण करताना राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने विविध उपक्रमांसोबतच विशाल हिंदू संमेलन घेण्याचा संकल्प केला आणि या अनुषंगाने संघाने समस्त सकल हिंदू समाजाच्या सहकार्याने एक लाखाच्या वर हिंदू संमेलन आजतागत घेतलेत पुढे सुद्धा मोठ्या प्रमाणात हिंदू संमेलन चालू आहेत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ५८ देशात हिंदू एकात्रीकरणाचे कार्य अविरत आहे तसेच संघाच्या ८५ हजाराच्या वर संघ शाखा कार्यरत आहेत.हरकरे यांनी माहिती दिली की,१९४७ ला भारतात ९०ड़ हिंदू होते आणि स्वातंत्र्यानंतर आजची परिस्थिती बिकट होत चाललेली आहे आपली भूमि श्रीराम आणि श्रीकृष्णाची आहे या भूमिला इथल्या संस्कृतीला टिकवून ठेवणे हे हिंदूंचे परम कर्तव्य आहे आज देशात ७७ टक्के हिंदू आहेत ही परिस्थिती बदलविणे आवश्यक आहे अन्यथा परिणाम भोगाव लागेल त्यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या पंच तत्व गोष्टींचा महत्व उपस्थित महिला पुरुषांना सांगितले यात त्यांनी कुटुंब प्रबोधन,पर्यावरण, स्व तंत्र, नागरी कर्तव्य, समरसता विषय सविस्तरपणे मांडलेत.हिंदू समाजाने जागृत होऊन या कार्यात राष्ट्रीय स्वयंसेवक संघ पूर्णपणे यशस्वी होतोय असे आशीर्वचन यावेळी माहेश्वरी दीदी यांनी याप्रसंगी दिले बजरंग दलाचे विशाल तिरमारे यांनी जगत देवानंद अवधूत महाराज यांचे स्वागत केले.कार्यक्रमाचे संचालन दीप्ती ढाकूलकर प्रास्ताविक श्याम घाटे परिचय प्रा. विशाल मोकाशे आभार भारती चुटे यांनी मानले.

---


### जि.प. शाळेच्या तीन विद्यार्थ्यांचे सुयश

**चांदूर रेल्वे -** तालुक्यातील जि.प. पूर्व माध्यमिक शाळा, दहीगाव (धावडे) येथील इयत्ता ८ वीची विद्यार्थिनी गुंजन कैलाश वानखडे ही नुकत्याच झालेल्या राष्ट्रीय शिष्यवृत्ती परीक्षा (एनएमएमएस) मध्ये उत्तीर्ण झाली आहे. तसेच अखिल भारतीय सैनिक विद्यालय प्रवेश परीक्षा (एआयएसएसईई) मध्ये इयत्ता ५ वी चे विद्यार्थी नियती नरसिंग खडसे व अर्णव संतोष शेंडे उत्तीर्ण झाले आहेत.विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या या यशाबद्दल तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी प्रसाद संकपाळ, विस्तार अधिकारी विजय सगणे, शाळेचे मुख्याध्यापक प्रल्हाद इंगोले, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष किशोर वैद्य, शिक्षक सारंग धामणकर, विशाल बेले, अजय दाभेराव व सर्व पालकांनी त्यांचे कौतुक केले.

## जागतिक किशोर मानसिक आरोग्य दिन

# किशोरवयीनांच्या वाढत्या मानसिक आरोग्य समस्येत पालकांची भूमिका

**आ**जच्या आधुनिक युगात, मानव जितके प्रगत समजतात तितकेच, ते स्वतःला समस्यांनी वेढलेले आढळत आहेत, विशेषतः मानसिक आरोग्य समस्यांनी. सर्व वयोगटातील लोकांना कधी ना कधी मानसिक आरोग्य समस्यांना तोंड द्यावे लागते किंवा तोंड द्यावे लागले असेल. आयुष्यात आनंद, सुख-समाधान आणि शांती फक्त नावापुरतीच असल्याचे दिसते. असे वाटते की प्रत्येकजण स्पर्धेत भाग घेण्यासाठी जगत आहे. अगदी किशोरवयीन मुलांमध्येही आजकाल, मानसिक आरोग्य समस्यांचा प्रश्न खूप गंभीर पातळीवर पोहोचला आहे. किशोरवयीन मुलांमध्ये सातत्याने वाढणारे गुन्हेगारीचे प्रमाण ही देखील एक गंभीर समस्या आहे. या वयातील मुलांमध्ये राग, चिडचिडेपणा, ताणतणाव, द्वेष, सहनशीलतेचा अभाव, सोशल मीडियाचे व्यसन आणि अंमली पदार्थांचे सेवन यासारख्या समस्या झपाट्याने वाढत आहेत. किशोरवयीन मुलांनी केलेल्या घटना आणि कृतींबद्दल जाणून घेतल्यावर आपल्याला अनेकदा धक्का बसतो. पालकांनी त्यांना फक्त फटकारले तर ते आत्महत्या किंवा स्वतःला हानी पोहोचवणे, घरातून पळून जाणे किंवा अनुचित पावले उचलणे आणि गंभीर गुन्हे करण्यासाठी मोठ्या गुन्हेगारांसारख्या टोळ्या तयार करणे असे गुन्हे करतात. किशोरवयीन मुले चोरी, दरोडा, तस्करी, बलात्कार, खून आणि खून करण्याचा प्रयत्न यासारख्या गंभीर गुन्ह्यांमध्ये सहभागी असल्याच्या घटना देखील सातत्याने घडत असतात. शाळकरी मुलांद्वारे त्यांच्या शिक्षकांवरही हल्ला करण्याच्या घटना सुद्धा अनेकदा नोंदवल्या जातात. लहान वयात गर्लफ्रेंड आणि बॉयफ्रेंड असण्याचा ट्रेंड, सोशल मीडिया, ऑनलाइन गेमिंग, ड्रग्जचे व्यसन, खोटा देखावा, खोटे बोलणे, संस्कारांचा अभाव, नैतिकतेचा अभाव, चारित्र्याचा अभाव आणि अश्लीलता यांनी समाजाला विषारी बनवले आहे. अनेक तरुणांनी लोकांना आकर्षित करण्यासाठी सर्व सीमा ओलांडून निर्लज्जपणाचे कळस गाठून आपले जीवन उद्ध्वस्त केले आहे.



दुसरीकडे, पालकांचा मुलांवर नियंत्रणाचा अभाव, मुलांवर आंधळा विश्वास, वाईट संगत, मुले आयुष्यातील वाईट गोष्टी किंवा घडत असलेल्या घटनांना विरोध करण्यास घाबरतात, काही भीतीच्या सावलीत जगतात, पालकांनी मुलांना वेळ न देणे, संगोपनाचे सकारात्मक वातावरण निर्माण न करून देणे, मुलांकडून पालकांनी जास्त अपेक्षा ठेवणे, स्पर्धात्मक वातावरण निर्माण करणे, मुलांवर दबाव आणणे किंवा आपल्या इच्छा त्यांच्यावर लादणे आणि पालकांना त्यांच्या मुलांच्या भावना समजून घेण्यास असमर्थता ही देखील आजकाल किशोरवयीन मुलांमध्ये मानसिक आरोग्याच्या समस्या निर्माण करणारी कारणे आहेत. किशोरवयीन मुलांमध्ये वाढत्या मानसिक आरोग्य समस्येबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी दरवर्षी २ मार्च रोजी 'जागतिक किशोर मानसिक आरोग्य दिन' साजरा केला जातो. हा दिवस जागरूकता वाढवणे, कलंक कमी करणे, चिंता, ताण आणि नैराश्यासारख्या किशोरवयीन आरोग्य आव्हानांबद्दल खुल्या संभाषणांना प्रोत्साहन देणे तसेच स्वतःची काळजी घेण्याच्या धोरणांवर लक्ष केंद्रित करणे यावर भर दिला जातो. २०२६ ची थीम 'किशोरवयीन विद्यार्थ्यांना त्यांच्या शाळांमध्ये निरोगी आणि कल्याणकारी उपक्रमांचे नेतृत्व करण्यास सक्षम करणे' आहे.

जागतिक आरोग्य संघटनेच्या मते, किशोरवयीन मुले शारीरिक, भावनिक आणि सामाजिक बदलांमुळे मानसिक आरोग्य समस्यांना बळी पडतात, ज्यात गरिबी, गैरवापर किंवा हिंसाचार यांचा समावेश आहे. त्यांना या समस्यांपासून वाचवणे आणि चांगल्या जीवनासाठी आवश्यक असलेले आल्हाददायक संगोपनाचे वातावरण निर्माण करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. असा अंदाज आहे की, जगभरात, १०-१९ वयोगटातील सातपैकी एका मुलाला मानसिक आरोग्य समस्या आहे. हे सर्व जागतिक आजारांपैकी १५ टक्के आहे, तरीही या समस्या मोठ्या प्रमाणात ओळखल्या जात नाहीत आणि त्यांच्यावर उपचार केले जात नाहीत. आयुष्यभर होणाऱ्या मानसिक आजारांपैकी अर्धे आजार वयाच्या १४ व्या वर्षी सुरू होतात. मानसिक आरोग्य समस्या असलेल्या मुलांना सामाजिक बहिष्कार, भेदभाव, कलंक, शैक्षणिक अडचणी, जोखीम पत्करण्याचे वर्तन, शारीरिक आजार आणि मानवी हक्कांचे उल्लंघन यांचा सामना करावा लागतो. वर्तणुकीशी संबंधित मानसिक विकार हे मोठ्या वयाच्या किशोरवयीन मुलांपेक्षा तरुण किशोरवयीन मुलांमध्ये अधिक सामान्य आहेत. नैराश्य, चिंता आणि वर्तणुकीशी संबंधित विकार हे किशोरवयीन मुलांमध्ये आजार आणि अपंगत्वाची प्रमुख कारणे आहेत. १५-२९ वयोगटातील मुलांमध्ये आत्महत्या हे मृत्यूचे तिसरे प्रमुख कारण आहे. आवश्यक आरोग्यसेवेची उपलब्धता नसल्याने, मुले मोठी होताना समाजात आणि कुटुंबात योग्य स्थान मिळवू शकत नाहीत, ज्यामुळे जीवनात अनेक संघर्षांना तोंड द्यावे लागते. अटेंशन डेफिसिट हाइपरएक्टिविटी डिसऑर्डर, अतिक्रियाशीलता विकार आणि वर्तणुकीशी संबंधित विकार किशोरवयीन मुलांच्या शिक्षणावर परिणाम करू शकतात आणि गुन्हेगारी वर्तनाचा धोका वाढवू शकतात, जो संपूर्ण मानवी समाजासाठी चिंतेचा विषय आहे.


आजच्या किशोरवयीन मुलांमध्ये मानसिक आरोग्याच्या समस्यांसाठी पालक हे सर्वात मोठे दोषी आहेत. मुले ही पालकांची जबाबदारी आहेत आणि पालक हे विसरतात. केवळ मुलांचे लाड करून किंवा त्यांच्या मागण्या पूर्ण करून जबाबदाऱ्या पूर्ण होत नाहीत. मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांच्या आवश्यक गरजा समजून घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे. मुलांना काय हवे आहे आणि ते कशाचा आग्रह धरतात यातील फरक समजून घेणे महत्वाचे. पालक अनेकदा म्हणतात की ते त्यांच्या मुलांसाठी पैसे कमवण्यात व्यस्त आहेत. पण पैशाने जगातील प्रत्येक गरज खरेदी करता येत नाही किंवा पूर्ण करता येत नाही. मुलांना योग्य वेळी आधार देणे महत्वाचे आहे, त्यांच्यासोबत मित्र म्हणून वेळ घालवणे देखील महत्वाचे आहे. फक्त आपली मुले आहेत म्हणून त्यांच्या चुका झाकणे किंवा ते हट्टी आहेत म्हणून त्यांच्या बेकायदेशीर मागण्या पूर्ण करणे हे पूर्णपणे चुकीचे आहे. आज आपण जगभरात आणि समाजात जे गुन्हेगार पाहतो, कदाचित जर त्यांच्या पालकांनी त्यांना योग्य वेळी चांगले संगोपन, मूल्ये आणि पोषक वातावरण दिले असते, तर ते आज समाजासाठी एक भयंकर त्रास बनले नसते. दररोज निरोगी झोप घेणे, नियमित व्यायाम करणे, शारीरिक आणि मानसिक चेतना वाढविणारे खेळ खेळणे, समस्या सोडविण्यासाठी परस्पर कौशल्ये विकसित करणे आणि भावनांचे व्यवस्थापन कसे करावे हे शिकणे आवश्यक आहे. घर, कुटुंब, शाळा आणि व्यापक समुदायामध्ये संरक्षणात्मक आणि आल्हाददायक सहाय्यक वातावरण अत्यंत महत्वाचे आहे.

अभ्यासात असे आढळून आले की,शाळकरी मुलांपैकी २३.३३ टक्के मुलांना मानसिक आरोग्य समस्या आहेत. अभ्यासाचा ताण, सोशल मीडियाचा अति वापर आणि कुटुंबातील बिघाड यामुळे ताणतणाव वाढतो, यातील ४३ टक्के विद्यार्थ्यांनी मूड स्विंगची तक्रार केली तर ११ टक्के विद्यार्थ्यांनी चिंता संदर्भात समस्या व्यक्त केली. १० टक्क्यांपेक्षा कमी तरुण भारतीयांना औपचारिक मानसिक आरोग्य सेवा उपलब्ध आहेत. बहुतेक किशोरवयीन मुले मानसिक आरोग्य विकारांसाठी मदत घेण्यास कचरतात. सायबरबुलिंग, सामाजिक तुलना आणि इंटरनेट व्यसन वाढत आहे आणि १५-१९ वयोगटातील मुलांमध्ये अल्कोहोलचा वापर जास्त आहे. १३-१७ वयोगटातील अंदाजे ७ टक्के किशोरवयीन मुलांमध्ये मानसिक आरोग्य विकार आहेत आणि तरुणांमध्ये आत्महत्या हे मृत्यूचे प्रमुख कारण आहे. पालकांनी त्यांच्या मुलांसोबत वेळ घालवणे महत्वाचे आहे जेणेकरून त्यांना भावनिकदृष्ट्या बळकटी मिळेल आणि मानसिक आरोग्याबद्दल जागरूकता निर्माण होईल. शारीरिक हालचाली आणि मानसिक आरोग्य यांच्यात सकारात्मक संबंध आहे. खेळांमुळे ताण कमी होतो. म्हणून, पालकांनी आपल्या मुलांना सायकलिंग, स्केटिंग, पोहणे, हायकिंग किंवा इतर कोणत्याही बाह्य खेळासाठी बाहेर घेऊन जावे. मुलांना स्वयंसेवक म्हणून सामाजिक कार्यात सहभागी होण्यास प्रोत्साहित करणे, जेवण आणि नाश्ता एकत्र करणे, दिवसाच्या क्रियाकलापांवर चर्चा करणे, व्यायाम आणि योगाचे महत्त्व समजावून सांगणे, चांगले छंद जोपासायला शिकवणे, चांगले मूल्ये रुजवणे, लोकांमधील भेदभाव दुर्लक्षित करून सगळीकडे मानवतेचा संदेश पसरवणे आणि निसर्ग व राष्ट्रसेवेला प्राधान्य देणे ह्या गोष्टी मुलांमध्ये रुजविण्याची प्राथमिक कर्तव्ये पालक आणि शिक्षकांची आहेत. मुलांच्या कलागुणांना किंवा कमतरतांकडे कधीही दुर्लक्ष करू नका; त्यांना योग्य वेळी योग्य मार्गदर्शन देणे महत्वाचे आहे. अशा प्रकारे, मुले शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या मजबूत होतील आणि वाईट सवयींपासून दूर राहतील, ज्यामुळे मानसिक आरोग्य समस्या निर्माण होण्याची शक्यता टाळता येईल.

**डॉ. प्रीतम भी. गेडाम**
मो-०८२३७४ १७०४१

## 'रंगपंचमी'

'होळी' सण हा अनादीकाला पासून आपण मनवतो ।



सर्वांमध्ये हा रंगत देतो, आनंद
द्विगुणीत करतो ॥

प्रह्लादा मारण्या होलिका जी
चिता रचिली उल्हासे ।
दुष्ट बुद्धी ही वैरीण झाली
जरिही वरद बह्माचे ॥

धगधग पेटली दुष्टबुद्धी
होलिका राख रांगोळी ।
प्रह्लादाची निरागस भक्ती जिंकिली सात्वीक भोळी ॥



कृष्णसखा द्वापारी होळी पेटविली आनंदे ।
दुसरे दिनी श्रीकृष्ण गोपी सखे भोवती खेळे ॥

होळी ची ती राख फासती सख्यां सोबती कान्हा ।
एकमेकांसी लाविती मौजे खेळे यशोदा कान्हा ॥

खेळ खेळता एक सखी बोलली, 'कृष्ण तू काळा ।
अमुची राधा गोरी तू दूर उडवू नको धुराळा' ॥

कृष्ण म्हणे तव राधाराणी गौरवर्णी सुंदरी ।
तिजसी बनवितो माझ्यासारखा 'कृष्णवर्ण' बघ जरी !' ॥

होळीची राखड धुळवड करिती कान्हा राधिका सखी ।
धुळवड होता सगळ्या सजल्या एक रंगी सखी ॥

कुणी कुणासी ना ओळखे बदलले मूख सगळ्यांचे ।
सगळे सजले ते कृष्णवर्ण राखड खेळती उल्हासे ॥

कुणी माती फूलं पान पाणी नदीचे, उडविती खेळे आनंदी ।
रक्तचंदन, डाळींब, हरिद्रा चुकंदरा रसनादी ॥

पहाडाची पांढरी - हिरवी - पिवळी मातीच वस्त्रगाळं ।
पळसफुला तांबडा , केशरा रंग उडविती बाळं ॥

लपत छपत चालती सख्या त्या,कोण दिशा
कान्हा येई।
रंग लाविती, लावुनी घेती भक्तीरस कान्हाई ॥

ऐसी रचिली 'रंगपंचमी' सख्या समवे आनंदी ।
ऐसी चालली पाच दिवस जी 'रंगपंचमी' सजली ॥

होळीचा भक्तीरस गुणरंग उधळीतो कान्हा मनरंग ।
संगीत रस गुण रागलयस्वर बरसो 'मनवा'अंग ॥

**'स्वरचैतन्य' डॉ. मिलिंद इंदूरकर** (मनवा) नागपूर



## 'कटुता विसरून एकमेकांना आलिंगन द्या'

जेव्हा फाल्गुनची तेजस्वी पौर्णिमा आकाशात हसते,
होलिकाच्या पवित्र ज्वाला वाईटाला जाळून टाकतात..
सत्याचा मार्ग दाखवून, ती नवीन श्रद्धा जागृत करते..
आपल्या हृदयाचे सर्वात गडद कोपरे देखील प्रकाशाने भरलेले असतात..

जेव्हा धुळंडीची सकाळ रंग घेऊन अंगणात येते,
प्रत्येक रस्ता अबीर आणि गुलालाच्या सुगंधाने भरलेला असतो..
प्रेमाचा रंग लावण्यासाठी सर्व तरुण आणि वृद्ध एकत्र येतात,
दुःखी अंतःकरणे देखील हसतात आणि पुन्हा मित्र बनतात...

फागची गाणी गायली जातात तेव्हा ढोल आणि झांज वाजतात,
प्रत्येकजण नाचतो आणि गातो, प्रत्येक चेहरा रंगाने भरतो..
मनातील सर्व घाण धुवून जावो, कटुता दूर जावो,
आपण सर्व तक्रारी विसरून एकमेकांना आलिंगन देऊया..

ब्रजमध्ये फाल्गुनचा आनंद कायम आहे, बरसाना हसते हो,
राधा आणि कृष्णाची प्रेमकथा प्रत्येकाला आकर्षित करते हृदय..
लाथमारच्या हास्य आणि विनोदातही, आपलेपणाची भावना असते..
शतकानुशतके जुना हा सण प्रेमाचा संदेश देतो..



होळी केवळ रंगांबद्दल नाही;
ती संस्कृतीचा अभिमान आहे.
सौहार्द, प्रेम आणि बंधुता ही
भारताची वैशिष्ट्ये आहेत..
द्वेषाचे सर्व दरवाजे बंद करण्याची आपण एकत्रितपणे प्रतिज्ञा करूया..
कटुता विसरून या होळीला प्रेम पुन्हा फुलू द्या..

**- डॉ. ब्रह्मानंद राजपूत**

## होलिका दहन: वाईटावर चांगल्याच्या विजयाचा उत्सव

होलिका दहन हे 'तमसो मा ज्योतिर्गमय' या उक्तीचे प्रतीक आहे.होळीमध्ये लाकडे जाळणे म्हणजे आपल्यातील क्रोध, द्वेष आणि अहंकार यांसारख्या दुर्गणांची होळी करणे होय.सार्वजनिक ठिकाणी किंवा घराबाहेर गोवऱ्या, सुकी लाकडे एकत्र करून होळी रचली जाते.लोक होळीची पूजा करतात, तिला गंध-अक्षता,नारळ अर्पण करतात आणि पुरणपोळीचा नैवेद्य दाखवतात.वाईट प्रवृत्तींचा निषेध म्हणून होळीसमोर बोंब मारण्याचीही एक जुनी परंपरा आहे.आजच्या काळात होळी केवळ धार्मिक राहिलेली नाही, तर ती सामाजिक एकोपा वाढवण्याचे माध्यम बनली आहे. हिंदुचा हा सण सामाजिकदृष्ट्या संघटित होऊन साजरा करतात.थंडीचा ऋतू संपून वसंत ऋतूचे आगमन होत असताना निसर्गातील बदलांचे स्वागत या अग्नीद्वारे केले जाते.

आजच्या काळात पर्यावरणाचे रक्षण करणे ही काळाची गरज आहे. म्हणूनच,जिवंत झाडे न तोडता केवळ सुकी लाकडे किंवा गोवऱ्या वापरावा.कचरा किंवा प्लॅस्टिक होळीत टाकू नका, जेणेकरून प्रदूषण होणार नाही.राखेचा वापर खत म्हणून करा.होलिका दहन हा सण आपल्याला स्वतःमध्ये डोकावून पाहण्याची आणि आपल्यातील 'होळीका' (वाईट विचार) जाळून 'प्रल्हाद' (सात्विकता) जपण्याची प्रेरणा देतो.

**वर्षा आवदे**
नागपूर





**सरत्या फाल्गूनातच वसंताची चाहूल लागते. कडूनिंबाला एकीकडे पांढऱ्या मोतीदार फुलांचे गुच्छ लागले असून दुसरीकडे तांबडी-कोवळी इवली इवली चमकदार पाने सुध्दा बहरली आहेत तर पिंपळाला हिरवी-तांबडी 'पिंपाळं' लगडू लागली आहेत. रानावनात शेंद्रया रंगाच्या पळस फुलांनी अख्ख्या पळसाला लदबदून टाकले आहेत. निसर्गाच्या या सर्व महोत्सवात तांबट पक्षांची घरट्यातील पिल्लांना अन्न भरविण्याची लगबग पाहण्यालायक आहे. दिवसभर पिल्लांच्या अन्नासाठी पिंपाळं आणतांना येरझारा मारता दमछाक होतांना दिसत आहे. निर्मिती, वाढ आणि शेवट आणि परत निर्मिती हे ऋतुचक्राचे एक अंग आहे. शिशिर वृक्षराजीला बोडखा जरी करत असला तरी वसंत ऋतू मात्र नवनिर्मितीची हळूवार फुंकर घालत असतो. काळ कुणासाठी थांबत नाही परंतु जीवन कसे जगावे हे झाडे, पशुपक्षी यांच्यापासून शिकण्यासारखे असते. आणि म्हणूनच ते माझे जीवन गाणे बनते.**

**- प्र.सु.हिरुरकर**

# पारंपारिक पध्दतीने होळी व धुळवड साजरा करणारा बंजारा समाज

**हो**ळी व धुळवड सणाला प्राचीन वारसा आहे. अगदी द्वापारयुगामध्ये भगवान श्रीकृष्ण व गोपीका यांनी या सणाला सुरुवात केली. त्याच पृष्ठभूमीवर भारतीय संस्कृतीमधील होळी व धुळवड सणाला अत्यंत पारंपारिक पद्धतीने साजरा करण्याचे श्रेय बंजारा समाजाला दिल्या जाते. विशेषतः भगवान श्रीकृष्णांच्या मथुरा (वृंदावन) राजस्थान (जयपूर,उदयपूर) पश्चिम बंगाल,उत्तराखंड, गोवा, पंजाब, गुजरात, मणीपूर आणि महाराष्ट्रासह,मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश,केरळ आदी राज्यात ह्या सणाला खूप मान्यता आहे.



महाराष्ट्राचा जर विचार केला तर या राज्यात अनेक जाती-धर्माचे लोक राहतात. यातील पारंपारिक पध्दतीने हे दोन्ही सण जर कुणी साजरे करीत असतील तर तो आहे बंजारा माता-भगिनी व बांधवांचा समाज.बंजारा समाजात हा सण सलग पाच दिवस साजरा केल्या जातो. लेंगी आणि ढोल या वाद्यांच्या गजरात नृत्याच्या तालावर नव्हे तर पारंपारीक वेशभूषा धारण करुन लोकगिताच्या रिदमवर हा सण बंजारा समाजातील महिला व पुरुष साजरा करतात.

होळीच्या आधी येणा-या दांडी पोर्णिमेपासूनच बंजारा समाजात होळी सणाचा अपार उत्साह असतो.होळी पाठवल्यावर धुंडाळून विधी म्हणजे नामकरण केल्या जातो हा विधी अतिशय पवित्र बंजारा समाजात मानल्या जातो. या सणामुळे बंजारा समाजाची संस्कृती, बंधुभाव व एकोपा वृध्दिंगत होते.गार्बोली बोलीभाषेत बंजारा समाज बांधव या सणाची गाणे म्हणतात.'आवो रे डाएंसाळो आपंळ खोळारे होळी' अशाप्रकारचे गाणे होळीच्या वर्तुळाकार नाचून बंजारा समाज जातो.गोरमाटी भाषेत होळीच्या गाण्यांना अगदी तालासुरात नाद दिल्या जातो.

बंजारा समाजात होळी सणाच्या पर्वावर कानाला अतिशय मधुर वाटणारी गिते म्हणजे सद्गुरु बिना भेद मळेनी भियारे, रामराव बापू चलेगोच वोरी मूर्ती, सेवा नामेरी लगावो गोडी, उठ परभाती माटी चलो जातोच बंजारा, एकी करताणी समाज सदारलोणी रं! बंजारा होळी गीत रा फुल उमरी सुपर होळी अशी अतिशय भाव व्यक्त करणारी रसाळ गिते होळीच्या पावन पर्वावर बंजारा समाज गातो.

सर्व मतभेद, समज-गैरसमज या गोष्टीला दूर सारुन बंधुभावनेने, एकजूट होऊन बंजारा बांधव होळी साजरी करुन विविध रंगांची उधळण करतात व हृदयाचे मनोमिलन घडवून आणतात हेच खरे बंजारा समाजाचे वैशिष्टय होळी व धुळवड सणाला दिसून येते. बंजारा समाजात होळी सणाला रंगोत्सवापेक्षा नृत्योत्सवाला मान्यता दिली जाते.द्वापारयुग म्हणजे कृष्णावताराचा काळ असतांना फाल्गुन महिन्यातील हुताशनी पोर्णिमा ते कृष्णपंचमी या पाच दिवसाच्या पर्वकाळात भगवान श्रीकृष्ण गोपीकांसह आपल्या सवंगड्यासोबत होळीचा सण व विविध रंगांची उधळण करणारा रंगपंचमीचा सण साजरा करीत होते म्हणून हा सण ख-या अर्थाने भगवान श्रीकृष्णांचा सण आहे असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही. बंजारा समाजातील होळीची गिते भगवान श्रीकृष्णांना स्मरण करणारी गिते आहेत ज्यातून कृष्णभक्ती घडून येते.

**गोपाल जाधव,अमरावती**
.९६०७००३८६९

# अमेरिका–भारत व्यापार करारामुळे शेतीवर संकट

## शेतक–यांच्या उपजीविकेवर गंभीर परिणाम – जिल्हा काँग्रेस कमिटीतर्फे शेतकरी अर्थ परिषद; हजारो शेतक–यांची उपस्थिती

■ प्रतिनिधी | अकोला ■

*अमेरिका–भारत व्यापार करारामुळे देशातील शेती, शेतकरी व शेतमजुरांच्या उपजीविकेवर गंभीर परिणाम होणार असल्याचा इशारा विविध मान्यवरांनी व्यक्त केला. जिल्हा काँग्रेस कमिटीतर्फे रविवारी (१ मार्च) महात्मा फुले आयुर्वेदिक महाविद्यालय, मूर्तिजापूर रोड, बाभुळगाव येथे आयोजित शेतकरी अर्थ परिषदेत याबाबत जोरदार चर्चा झाली.*



परिषदेच्या अध्यक्षस्थानी अकोला पश्चिम विधानसभेचे आमदार साजिद खान पठाण होते. प्रमुख वक्ते म्हणून कृषी व ग्रामीण अर्थव्यवस्थेचे अभ्यासक मिलिंद मुरुगकर, अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सचिव कुणाल चौधरी, किसान काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष पराग पास्ते, शेतकरी नेते प्रकाश पोहरे, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष व संयोजक अशोक अमानकर, शहराध्यक्ष डॉ. प्रशांत वानखडे पाटील आदी उपस्थित होते.

या परिषदेला जिल्हाभरातून हजारो शेतकरी, महिला व युवक उपस्थित होते. ग्रामीण भागातील कानाकोपऱ्यातून शेतकऱ्यांनी हजेरी लावत आगामी काळात उचलल्या जाणाऱ्या ठोस पावलांवर विचारमंथन केले.

'ही चळवळ पुढील पिढीच्या भवितव्यासाठी आहे. शेतकऱ्यांनी एकदिलाने उभे राहिल्यास प्रश्न मार्गी लागतील,' अशी भावना उपस्थित शेतकऱ्यांनी व्यक्त केली.

### शेतकऱ्यांनी एकजूट होणे गरजेचे : मिलिंद मुरुगकर

शेतकरी आस्मानी व सुलतानी संकटांनी आधीच त्रस्त असून बाजारपेठेतील अनिश्चितता, वाढते कर्ज, नैसर्गिक आपत्ती आणि हमीभावाचा अभाव यामुळे परिस्थिती बिकट झाली आहे. त्यातच अमेरिका–भारत व्यापार करारामुळे परदेशी कृषीमालाची आयात वाढून स्थानिक शेती व्यवसायावर घाला येईल, असे मत मिलिंद मुरुगकर यांनी व्यक्त केले. 'शेती, शेतकरी आणि लोकशाही टिकवायची असेल तर शेतकऱ्यांनी एकजूट होणे अत्यावश्यक आहे,' असे त्यांनी स्पष्ट केले.

### लोकचळवळ गावागावात पोहोचवावी : पराग पास्ते

किसान काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष पराग पास्ते यांनी शेतीला उद्योगाचा दर्जा देण्याची मागणी केली. 'शेतकरी आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हायचा असेल तर नियोजनबद्ध भूमिका घ्यावी लागेल. शेती उध्वस्त करणाऱ्या धोरणांना विरोध करण्यासाठी गावागावात जाऊन जनजागृती करावी लागेल,' असे ते म्हणाले.



### विदेशी मालाला जिल्ह्यात प्रवेश देणार नाही : आ. पठाण

अध्यक्षीय भाषणात आ. साजिद खान पठाण यांनी सत्ताधाऱ्यांवर टीका केली. 'काँग्रेस पक्ष सत्तेला मनमानी करू देणार नाही. शेतकऱ्यांच्या हितासाठी आंदोलन करण्यास मागे हटणार नाही. जिल्ह्यात विदेशी कृषीमाल विक्रीला परवानगी दिली जाणार नाही; त्यासाठी लोकलढा उभारू,' असा इशारा त्यांनी दिला.

### 'सीमेवर जवान, शेतात किसान' : कुणाल चौधरी

कुणाल चौधरी यांनी केंद्र सरकारच्या धोरणांवर टीका करताना 'सीमेवर जवान आणि शेतात किसान मारला जातोय,' अशी भावना व्यक्त केली. 'परदेशातील सरकारे शेतकऱ्यांच्या पाठीशी उभी आहेत; मात्र देशातील सरकार शेतकऱ्यांविरोधी धोरणे राबवत आहे,' असा आरोप त्यांनी केला.

### व्यापार करार शेतकऱ्यांसाठी 'डेथ वॉरंट' : अशोक अमानकर

जिल्हाध्यक्ष अशोक अमानकर यांनी अमेरिका–भारत व्यापार कराराला शेतकऱ्यांसाठी 'डेथ वॉरंट' ठरवले. 'अमेरिकन कृषीमालाची मोठ्या प्रमाणावर आयात झाल्यास भारतीय शेती कोलमडेल आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेवर उपासमारीचे संकट येईल,' असा इशारा त्यांनी दिला.

# तुलंगा बु. येथे घरफोडी; एक लाखांचे दागिने लंपास

## श्वान पथक, ठसे तज्ञ दाखल; चान्नी पोलीस स्टेशन कडून तपास सुरू

■ प्रतिनिधी | खेट्री ■

चान्नी पोलीस स्टेशन हद्दीतील तुलंगा बु. येथे घरमालक कुटुंबासह बाहेरगावी गेल्याची संधी साधत अज्ञात चोरट्यांनी घरफोडी करून सुमारे एक लाख रुपयांचे दागिने लंपास केल्याची घटना २७ फेब्रुवारी रोजी उघडकीस आली. या प्रकारामुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, गणेश हातोले यांचे कुटुंब २२ फेब्रुवारी रोजी उपचारासाठी नागपूर येथे गेले होते. घर बंद असल्याची माहिती चोरट्यांना मिळाल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. २७ फेब्रुवारी रोजी कुटुंब परत आले असता घराचे कुलूप तुटलेले दिसून आले. घरातील साहित्य अस्ताव्यस्त पडलेले होते. कपाटाची तोडफोड करून त्यातील दागिने चोरट्यांनी पळविल्याचे निदर्शनास आले.

घटनेची माहिती मिळताच पोलीस पाटील अशोक तायडे यांनी तत्काळ चान्नी पोलीस स्टेशनला कळविले. ठाणेदार रवींद्र लांडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. तसेच श्वान पथक व ठसे तज्ञ पथकाला पाचारण करण्यात आले. परिसरातील संशयित हालचालींची माहिती गोळा करण्याचे काम सुरू आहे.

या घरफोडीत सुमारे ९६ हजार रुपयांचे सोन्याचे मंगळसूत्र तसेच ८ हजार ५८४ रुपयांचे चांदीचे दागिने चोरीस गेल्याचे फिर्यादीने नमूद केले आहे. अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास चान्नी पोलीस करीत आहेत. दरम्यान, परिसरात अलीकडच्या काळात घरफोडीच्या घटना वाढत असल्याची चर्चा असून, रात्रीची गस्त वाढविण्याची मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

# आलेगावात रोजा इफ्तारद्वारे सर्वधर्मीय एकोप्याचा संदेश

■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातूर तालुक्यातील आलेगाव येथे पवित्र रमजान महिन्याच्या निमित्ताने सामाजिक कार्यकर्ते निलेश तोताराम कापकर यांच्या पुढाकारातून २८ फेब्रुवारी रोजी रोजा इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमास गावातील मुस्लिम बांधवांसह विविध धर्मीय नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. सामूहिकरित्या रोजा सोडत सर्वधर्मीय सौहार्दाचा संदेश देण्यात आला.

### सामाजिक कार्यकर्ते निलेश कापकर यांच्या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक



ग्रामीण भागात सामाजिक सलोखा आणि परस्पर विश्वास दृढ करण्यासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित होत असल्याचे उपस्थितांनी सांगितले. सध्याच्या काळात सामाजिक ऐक्य टिकवून ठेवणे गरजेचे असून, त्यासाठी संवाद आणि सहकार्याची भूमिका महत्त्वाची असल्याचे मत व्यक्त करण्यात आले. निलेश कापकर यांनी गावात बंधुभाव, शांतता आणि परस्पर सन्मानाची भावना अधिक बळकट व्हावी, या उद्देशाने इफ्तार पार्टीचे आयोजन केल्याचे स्पष्ट केले.

कार्यक्रमाचे वातावरण अत्यंत आनंददायी व उत्साहपूर्ण होते. विविध धर्मीय नागरिक एकत्र येऊन सहभागी झाल्याने गावात एकतेचे चित्र पाहायला मिळाले. कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी नाजीम भाई, राजा व साजिद भाई, मंगल तेलगोटे, वैभव काळदाते, चेतन काठोळे, संतोष काठोळे, वैभव मुर्तडकर आदींनी विशेष सहकार्य केले. या उपक्रमामुळे आलेगावात सर्वधर्मीय एकोप्याची भावना अधिक दृढ झाल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली. सामाजिक सलोखा वाढविणाऱ्या अशा कार्यक्रमांचे सातत्याने आयोजन व्हावे, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली.

# लाखपुरीत अर्चना विद्यालयात राष्ट्रीय विज्ञान दिन उत्साहात



■ प्रतिनिधी | मूर्तिजापूर ■

तालुक्यातील लाखपुरी येथील अर्चना विद्यालयात २८ फेब्रुवारी रोजी राष्ट्रीय विज्ञान दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. प्रख्यात शास्त्रज्ञ सी. व्हि. रमण यांच्या स्मरणार्थ आयोजित या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी विज्ञानाविषयीची आपली जिज्ञासा आणि विचार प्रभावीपणे मांडले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक एस. एस. राजपूत होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून एस. पी. नाचणे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विज्ञान शिक्षक योगेंद्र लहाने यांनी केले. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते डॉ. रमण यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी त्यांच्या कार्याचा परिचय वाय. डी. लहाने यांनी करून देत विज्ञान क्षेत्रातील योगदान अधोरेखित केले.

विद्यार्थ्यांनीही विज्ञान दिनानिमित्त आपले विचार मांडले. इयत्ता आठवीतील कु. तनुश्री डवरे हिने 'राष्ट्रीय विज्ञान दिन आणि आजची भारताची प्रगती' या विषयावर भाष्य केले, तर इयत्ता नववीतील कु. श्रद्धा कावनपुरे हिने विज्ञान दिनाचे महत्त्व स्पष्ट करत वैज्ञानिक दृष्टिकोनाची गरज अधोरेखित केली.

यानंतर प्रश्नमंजुषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. इयत्ता सातवी, आठवी आणि नववीतील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. गट पद्धतीने पाच फेऱ्यांमध्ये रंगलेल्या या स्पर्धेत नववीच्या 'गट ब'ने प्रथम क्रमांक पटकावला. त्यानंतर 'गट अ' आणि 'गट क' यांच्यात झालेल्या चुरशीच्या लढतीत 'गट अ' विजयी ठरला. विजयी विद्यार्थ्यांचे मान्यवरांच्या हस्ते अभिनंदन करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी मोलाचे सहकार्य केले. आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# जिल्ह्यात पहिल्यांदाच १३८ विज्ञान शिक्षकांचा भव्य सत्कार

### अवनी ग्लोबल फाउंडेशनचा राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त उपक्रम

■ प्रतिनिधी | अकोला ■

राष्ट्रीय विज्ञान दिनाच्या पूर्वसंध्येला अवनी ग्लोबल फाउंडेशन, अकोला यांच्या वतीने जिल्ह्यातील विज्ञान शिक्षक-शिक्षिकांचा भव्य सत्कार सोहळा उत्साहात पार पडला. जिल्ह्यात पहिल्यांदाच इतक्या मोठ्या प्रमाणावर विज्ञान शिक्षकांचा सन्मान करण्यात आल्याने उपस्थितांमध्ये समाधानाची भावना व्यक्त झाली.



कार्यक्रमाचे आयोजन संस्थेच्या अध्यक्षा अमृता कुशल सेनाड यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले. अध्यक्षस्थानी माजी आमदार डॉ. श्रीकांत देशपांडे उपस्थित होते. प्रमुख पाहुण्या म्हणून जयमाला खेडेकर यांनी मार्गदर्शन केले, तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून केंद्रप्रमुख गोपाल सुरे (पातूर-नंदापूर) यांची उपस्थिती लाभली.

विशेष निमंत्रित म्हणून उपशिक्षणाधिकारी प्रमोद टेकाडे (जि.प. अकोला) तसेच विज्ञान महाविद्यालय, अकोला चे माजी प्राचार्य डॉ. विजय नानोटी उपस्थित होते.अकोला जिल्ह्यातील तब्बल ८७ शाळांमधील १३८ विज्ञान शिक्षकांनी कार्यक्रमास उपस्थित राहून उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. शिक्षकांच्या कार्याचा गौरव करताना मान्यवरांनी विज्ञाननिष्ठा, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि विद्यार्थ्यांमध्ये संशोधनवृत्ती जोपासण्याचे महत्त्व अधोरेखित केले.कार्यक्रमाच्या प्रारंभी पल्लवी गायकवाड यांनी विनायक दामोदर सावरकर रचित 'ने मजसी ने' हे गीत सादर करून वातावरण राष्ट्रभक्तीने भारावून टाकले. त्यानंतर भारत माता, स्वातंत्र्यवीर सावरकर व सी. व्ही. रमण यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. मराठी भाषा गौरव दिनानिमित्त मराठी भाषेच्या संवर्धनाचा संकल्प करण्यात आला, तर विज्ञान दिनानिमित्त वैज्ञानिक दृष्टीकोन बळकट करण्याचे आवाहन करण्यात आले.

संपूर्ण कार्यक्रमात राष्ट्रभक्ती, भाषाभिमान आणि विज्ञाननिष्ठा यांचा सुंदर संगम अनुभवायला मिळाला. या उपक्रमामुळे जिल्ह्यातील शैक्षणिक क्षेत्रात सकारात्मक वातावरण निर्माण झाले असून विज्ञान शिक्षकांना नव्या उमेदीची प्रेरणा मिळाल्याची भावना व्यक्त होत आहे. या सत्कार सोहळ्याची संकल्पना संस्थेचे सचिव प्रा. कुशल सेनाड यांची असून त्यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाची यशस्वी अंमलबजावणी करण्यात आली. कार्यक्रमास सचिन जोशी (विद्याभारती), डॉ. सौ. मीनल सोमण (विज्ञान भारती), डॉ. स्नेहा गिरीश गोखले, सौ. वैजयंती पाठक, डॉ. आशा निकते, काजल राजवैद्य, प्रा. गुल्हाने, राम भिरड (संस्कृती संवर्धन समिती) व अश्विनी रेलकर आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पूजा बामरटकर यांनी केले.

# येळवण ग्रामपंचायत तर्फे व्यसनमुक्ती प्रचारक प्रबोधनकार रामकृष्ण डोंगरे सन्मान

**अकोला :** संत गाडगेबाबा आरोग्य सेवा अभियानाच्या वतीने व्यसनमुक्ती प्रचारक प्रबोधनकार रामकृष्ण डोंगरे हे गेल्या २५ ते ३० वर्षापासून ग्रामीण व शहरी भागात विविध रोग निदान शिबिराच्या लाभ देत आहेत संत महापुरुषांनी केलेल्या कार्याचा प्रचार व प्रसार ते प्रबोधनाच्या माध्यमातून अंधश्रद्धा निर्मूलन, पाणी आडवा पाणी जिरवा, शैक्षणिक जनजागृती, गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप, निराधारांना जीवनाव वस्तू वाटप यासोबतच ग्रामीण भागातील विद्यार्थी शिक्षणाचे मुख्य प्रवाहामध्ये येण्यासाठी सातत्याने प्रबोधनकार रामकृष्ण डोंगरे यांचे कार्य निरंतर चालू आहे.

**जाहीर सूचना**

माझे पक्षकार यांनी दिलेल्या महिती वरून सर्व नागरिकांना तसेच वित्तीय संस्था व बँक यांना या जाहीर नोटीसद्वारे सूचित करण्यात येते कि, माझे पक्षकार श्री. मोहोमद अरसलान खान, रा. मनेक टाकीजजवळ, ता. आणि जि. अकोला यांच्या मालकी व ताब्यातील मालमत्ता मौजा/कसबे शिलोडा, ता. आणि जि. अकोला येथील सर्वे नं. ४०/१, गट नं. ९३ (७/१२ प्रमाणे ९३/४०/१/११) मधील अकृषक लेआउट प्लॉट नं. ११, एकूण क्षेत्रफळ ३००.०० चौ. मी. हा प्लॉट श्री. शेख अहमद अब्दुल रऊफ अधिक १ याच्या कडून खरेदीने र.द.क्र. २४७१; दि. १९/०५/२०२५ ने खरेदी केली असून सदर मालमत्तेची जुने मूळ नोंदणीकृत खरेदीखत ज्याचे र.द.क्र. ३२१७; दि. २७/०४/२००१, हि गहाळ झाल्या आहेत, जर कोणलाही ती मिळाले असल्यास खाली संपर्क साधावा. तसेच सदर मालमत्तेवर AU Small Finance Bank Ltd, Akola मार्फत कर्ज घेत असून त्याकरिता माझे पक्षकार हे वरील नमूद मालमत्ता गहाण देत आहेत.

तरी जाहीर नोटीस द्वारे, आपणास कळविण्यात येते कि,सदर मालमत्तेवर कोणाचाही कुठल्याही प्रकारचा हिस्सा,अधिकार किवां गहाण, दान, बक्षीस, तोंडी करार केला असल्यास, तथा ताबा असल्यास, किंव्हा कुठलाही दिवाणी अथवा फौजदारी दावा प्रलंबित व निकाली असल्यास, संबंधित व्यक्तीने नोटीस वृत्तपत्रात जाहीर झाला तारखे पासून ७ दिवसांच्या आत संपर्क साधावा; तसे न केल्यास सदर मालमत्तेवर कोणाचाही कुठल्याही प्रकारे काहीहि ऐक हक्क, अधिकार,हित-संबंध आणि आक्षेप नसल्याचे समजले जाईल.तसेच भविष्यात सदर गहाळ दस्त विचारात घेऊन कुठलाही व्यवहार जसेकी खरेदी, गहाण, दान, बक्षीस, तोंडी करार केलेले आढळल्यास त्यास सर्वस्वी लिहून घेणार/देणार जबाबदार राहील.

अकोला
दिनक:- ०१/०३/२०२६

**अँड. गौरव शि. देशमुख**
आळशी प्लॉट, गजानन महाराज फोटो जवळ,
दक्षता नगर चौक, ता. जि. अकोला.
मो. नं. ९०२८२३२२४६

# १५ दिवसांत काम नाही तर आमरण उपोषणाचा इशारा

## मुंडगावकरांचा उपविभागीय अभियंता बर्डे यांच्यावर दिशाभूल केल्याचा आरोप

■ प्रतिनिधी | अकोट ■

अकोट तालुक्यातील संत नगरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मुंडगाव येथील राज्य महामार्ग क्र. २७१ (वरवट ते वनी वारुळा फाटा) या रस्त्याच्या रखडलेल्या कामावरून ग्रामस्थांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या तेल्हारा उपविभागीय कार्यालयावर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. मूळ अंदाजपत्रकानुसार रस्त्याचे काम १५ दिवसांत पूर्ण करण्यात यावे, अन्यथा १६व्या दिवशी आमरण उपोषणास बसण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.



याबाबत उपविभागीय अभियंता बर्डे यांच्याकडे लेखी तक्रार दाखल करण्यात आली आहे. ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, दि. १३ सप्टेंबर २०२४ रोजी प्रथम निवेदन देण्यात आले होते. त्यानंतर दि. २३ फेब्रुवारी २०२६ पर्यंत तब्बल १६ महिने उलटूनही प्रत्यक्षात कोणतीही ठोस कामे झालेली नाहीत. अनेक वेळा दूरध्वनीवरून संपर्क साधून तसेच कार्यालयात जाऊन चर्चा करूनही केवळ आश्वासने देण्यात आल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

ग्रामस्थांनी दिलेल्या निवेदनाच्या प्रती सार्वजनिक बांधकाम विभाग अकोट, उपविभागीय अधिकारी अकोट, जिल्हाधिकारी अकोला, खासदार अनुप धोत्रे, उपविभागीय पोलिस अधिकारी अकोट, कार्यकारी अभियंता प्रकल्प विभाग अकोला, तहसील कार्यालय अकोट, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, मुख्यमंत्री मुंबई, सार्वजनिक बांधकाम विभाग मुंबई, पालकमंत्री अकोला तसेच आमदार प्रकाश भारसाकडे यांनाही पाठविण्यात आल्याची माहिती देण्यात आली आहे.

दरम्यान, काम रखडण्यामागे कधी निवडणुकीचे कारण, कधी पोलिस बंदोबस्ताचा अभाव, तर कधी निधी उपलब्ध नसल्याचे कारण देत वेळकाढूपणा करण्यात आल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. 'मूळ इस्टिमेटनुसार दर्जेदार काम व्हायला हवे होते; मात्र प्रत्यक्षात कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही,' अशी खंत ग्रामस्थांनी व्यक्त केली.

'१५ दिवसांत काम सुरू करून पूर्ण न केल्यास आम्ही लोकशाही मार्गाने आमरण उपोषण करू. आवश्यक असल्यास मार्ग बंद आंदोलन छेडू,' असा इशारा देत यास सर्वस्वी सार्वजनिक बांधकाम विभाग तेल्हारा येथील उपविभागीय अभियंता बर्डे जबाबदार राहतील, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

या तक्रारीवर श्रीकृष्ण वाघ, प्र. म. भालेराव, दिलीप बोरोडे, नरेश क्षिरसागर, संजय तायडे, भरत चौधरी, राजू बावणे, अनिल कडू, संतोष सदार, अरविंद येवतकार, गोवर्धन गाडगे, गोपाल आसोले यांच्यासह असंख्य ग्रामस्थांच्या स्वाक्षऱ्या आहेत. आता सार्वजनिक बांधकाम विभागाकडून यावर काय भूमिका घेतली जाते, याकडे तालुक्यातील जनतेचे लक्ष लागले आहे.

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

संपादक - प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक ९२
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

मुख्य कार्यालय :– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# कुसुमाग्रजांनी मराठी भाषेला समृद्ध केले- डॉ.सुखदेव ढाणके

## विद्याभारती महाविद्यालयात मराठी भाषा गौरव दिन

**अमरावती/प्रतिनिधीः-** कुसुमाग्रज (वि. वा. शिरवाडकर) यांच्या जयंतीनिमित्त साजऱ्या करण्यात येणाऱ्या मराठी भाषा गौरव दिनाचे औचित्य साधून दि. २७ फेब्रुवारी २०२६ रोजी विद्याभारती महाविद्यालयातील मराठी विभाग तसेच ग्रंथालय व माहितीशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने निबंध स्पर्धा व विद्यार्थ्यांचे कवी संमेलन मोठ्या उत्साहात, साहित्यिक वातावरणात संपन्न झाले.

शब्दांच्या सुगंधाने दरवळलेले, विचारांच्या तेजाने उजळलेले हे आयोजन मराठी भाषेच्या अभिमानाचा जणू साक्षात उत्सव ठरले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. प्रज्ञा येनकर या विराजमान होत्या, तर प्रमुख अतिथी म्हणून सर्वधारा त्रैमासिकाचे संपादक व ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सुखदेव ढाणके यांनी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा द्विगुणित केली. प्रारंभी मराठी विभाग प्रमुख डॉ. गजानन बनसोड यांनी आपल्या ओजस्वी प्रास्ताविकातून मराठी भाषेची समृद्ध परंपरा, संतवाङ्मयापासून ते समकालीन साहित्यापर्यंतचा प्रवास आणि नव्या पिढीसमोरील भाषिक जबाबदाऱ्या यांचा परामर्श घेतला. अध्यक्षीय भाषणात डॉ. प्रज्ञा येनकर यांनी प्रभावी शब्दांत विद्यार्थ्यांना प्रेरित केले. त्या म्हणाल्या, 'मराठी ही आपल्या मनाची माती आहे. ज्या मातीतून आपण उगवतो, तिचे ऋण शब्दांनी फेडायचे असते. प्रत्येक विद्यार्थ्याने मराठी भाषेचा अभिमान बाळगून तिच्या जतन-संवर्धनासाठी कृतीशील राहिले पाहिजे. वाचन, चिंतन आणि लेखन यांमधूनच व्यक्तिमत्त्वाची खरी जडणघडण होते.' त्यांच्या या उद्गारांनी उपस्थितांमध्ये नवचैतन्य संचारले.



प्रमुख पाहुणे डॉ. सुखदेव ढाणके यांनी आपल्या 'बाप', 'माय' आणि 'बाई' या कवितांचे भावपूर्ण वाचन करून वातावरण भारावून टाकले.' माझ्या बापाच्या कष्टाचा ऐवढाच मतितार्थ, जेथे टपकला घाम तिथे उगवले तिर्थ' या कवितेने संपूर्ण सभागृह भारावून गेले.पुढे ते म्हणाले,ज्यांच्या नावे आज मराठी भाषा गौरव दिन साजरा केला जातो. त्या कुसुमाग्रजांनी भाषेला समुद्ध केले. 'भाषा जिवंत राहते ती तिच्या बोलीत, तिच्या लोकांमध्ये आणि त्यांच्या अश्रू-हास्यात. मराठीचे रक्षण करण्यासाठी मोठ्या घोषणांची नव्हे, तर दैनंदिन व्यवहारातील जिव्हाळ्याची गरज आहे.' त्यांच्या शब्दांतून जीवनदर्शन, नात्यांचे गूढ आणि स्त्रीच्या अस्तित्वाचा मार्मिक वेध प्रकर्षाने उमटला. निबंध स्पर्धेत विद्यार्थ्यांनी मराठी भाषा, संस्कृती, सामाजिक भान आणि वर्तमानकालीन आव्हाने या विषयांवर अभ्यासपूर्ण व चिंतनशील मांडणी केली. भूमिका चतुरकर हिने प्रथम क्रमांक पटकावला; प्रज्वल जामोदकर याने द्वितीय, तर ज्ञानेश्वरी गायकवाड हिने तृतीय क्रमांक मिळविला. त्यांच्या लेखनातून विचारांची परिपक्वता, भाषेची लयबद्धता आणि आशयाची घनता प्रकर्षाने जाणवली.यानंतर रंगलेल्या कवी संमेलनात शब्दांची सरिता मुक्तपणे वाहू लागली. विद्यार्थ्यांनी स्वतः रचलेल्या कवितांमधून नात्यांचे कोमल स्पर्श, समाजातील विसंगती, तरुणाईची स्वप्ने आणि मातृभाषेचे ममत्व यांचे प्रभावी दर्शन घडविले. भूमिका चक्रे हिने प्रथम, प्रयास खंडारे याने द्वितीय, तर प्राजक्ता इंगळे हिने तृतीय क्रमांक संपादन केला. प्रत्येक कवीच्या शब्दांतून संवेदनांचा झंकार उमटत होता; सभागृह टाळ्यांच्या गजरात दुमदुमून गेले. स्पर्धांचे परीक्षण डॉ. प्रशांत पाजणकर यांनी अत्यंत निष्पक्षतेने केले. कार्यक्रमाचे सुबोध सूत्रसंचालन प्रियल चिंचखेडे हिने केले. याप्रसंगी प्रमुख उपस्थितीमध्ये ग्रंथालय व माहितीशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. विशालसिंह शेखावत, इंग्रजी विभाग प्रमुख डॉ. व्ही. पी. शेकोकार, इतिहास विभाग प्रमुख डॉ. एम. एम. खेरडे तसेच प्रा. अजय वासेकर, प्रा. श्रीरंग देशमुख, प्रा. अभिषेक घुगे, प्रा. समीर लोणकर, प्रा. स्नेहा चेंडकापूरे, प्रा. स्नेहल राठोड, प्रा. खुशबू सरदार आदी प्राध्यापक व विविध विद्याशाखांतील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. एकूणच, मराठी भाषा गौरव दिनाचा हा सोहळा केवळ स्पर्धांचा कार्यक्रम न राहता भाषाप्रेम, साहित्यसंवेदना आणि संस्कृतीभान यांचा मंगल उत्सव ठरला. शब्दांची ही दीपमाळ पुढील पिढ्यांच्या मार्गाला उजळून टाकणारी ठरो, अशीच सर्वांच्या मनात भावना दाटून आली.

# आदिवासी संघटनांचे जिल्हाधिकारी कार्यालयावर बेमुदत आंदोलन

## पेसा संवर्गातील उमेदवारांना नियुक्ती देण्याची मागणी

**अमरावती/प्रतिनिधीः-** आदिवासी १७ संवर्ग पेसा कर्मचारी संघटनाच्या वतीने १७ संवर्गातील पात्र उमेदवारांना कायमस्वरूपी नियुक्ती मिळण्याच्या प्रमुख मागणीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयावर बेमुदत आंदोलन सुरू केले आहे. जोपर्यंत उमेदवारांना नियुक्ती मिळणार नाही तोपर्यंत आंदोलन सुरू राहणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे. ४ ऑक्टोबर २०२५ नुसार पेसा १७ संवर्ग कर्मचाऱ्यांची मानधन तत्वावर पदभरती केली होती. तसेच शासन निर्णयाप्रमाणे ११ फेब्रुवारी २०२६ अन्वये पेसा क्षेत्रातील १७ संवर्गाची पदभरती बाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित होऊन सात ते आठ दिवस झाले आहे.



तरीपण १७ संवर्गातील कोणत्याही कर्मचाऱ्यांना नियुक्ती देण्यात आली नाही. नियुक्तीसाठी पात्र उमेदवारांना नियुक्तीपत्र नाही मिळाले. यामुळे जिल्हाधिकारी कार्यालयावर हे आंदोलन सुरू करण्यात आले आहे.

नियुक्ती पत्र मिळत नाही तोपर्यंत संघटनेचे हे आंदोलन चालू राहणार आहे अशी भूमिका घेण्यात आली आहे. या मागणीवर सहानुभूतीपूर्वक विचार करून तात्काळ उपायोजना करण्याची मागणी आंदोलनकर्त्यांनी केली आहे. कैलास वळवी यांच्या नेतृत्वात हे आंदोलन केले जात आहे.

# भोलेश्वर महादेव मंदिरात शंकर-पार्वती विवाह

## -हळदी संगीत उत्सवाचा पारंपारिक सोहळा

**अमरावती/प्रतिनिधीः-** बुधवारा जुनी टाकसाळ येथील भोलेश्वर संस्थान परिसरात भोलेश्वर आरती मंडळाच्या वतीने हळदी संगीत उत्सवाचा पारंपारिक आणि आधुनिकतेची सांगड घालणारा अनोखा सोहळा मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात झाला. महिलांच्या सक्रिय सहभागातुन साजऱ्या झालेल्या या सोहळ्याने मंदिर परिसरात भक्ती संस्कृती चा प्रेरणादायी संगम अनुभवायला मिळाला.



सोहळ्याची सुरुवात पारंपारिक वेशभूषेत सजलेल्या महिलांच्या मिरजणुकीने झाली. पिवळ्या वस्त्रांसह आकर्षक साड्या परिधान करून महिलांनी मंदिर परिसरातुन शिवपिंड आणि नंदीमुर्तीची शोभायात्रा काढली. ढोल ताशांचा निनाद, जयघोष आणि पारंपारिक गीताच्या स्वरात ही मिरवणुक भक्तिमय वातावरणात पार पडली. त्यानंतर शिव-पार्वती विवाह सोहळा पारंपारिक पद्धतीने संपन्न करण्यात आला. या हळदी-संगीत उत्सवात महिलांनी पारंपारिक नृत्य, मंगलगीत आणि धार्मिक विधीमध्ये उत्स्फुर्त सहभाग नोंदवत स्त्रीशक्तीचे दर्शन घडविले. आधुनिक पद्धतीची मांडणी आणि पारंपारिक संस्कृतीचा संगम यामुळे हा सोहळा उपस्थितांसाठी विशेष आकर्षक ठरला. पतंगराय परिवाराने तीन पतंगराय परिवाराने तीन पिढ्यांची केलेली सेवा निश्चित प्रेरणादायी आहे. मागील अनेक वर्षापासुन राज पतंगरा व यश पतंगराय, सोनु गुजर, अभिषेक गुजरे, अमित शिंगणे, आशिष पुरोहित, विकास गायकवाड, रोहित वानखडे, ऋषिकेश गाढवे, जगदिशप पतंगराय, पंकज गडकरी, रवि पारवे, संतोष रावेकर, नरेच उचाडे, लोकेश पेठकर, संजय तंवर, संजय पारवे, अभिषेक दांडवे, भावेश घायर, अलोक काळे, ओम देशपांडे, राजु पवार, पंजाब पारवे, तुषार अवजेकर, जयेश कक्टकर, यश शिंगणे, वेदांत अवजेकर, मंथन प खंडारे, चैतन्य खंडारे आदिंनी परिश्रम घेतले.

# वाडेकर नॅशनल स्कुलमध्ये वैराग्यमूर्ती गाडगेबाबा यांची जयंती साजरी



**तिवसा/प्रतिनिधीः-** वाडेकर नॅशनल स्कूल गुरुकुंज मोझरी या शाळेत वैराग्यमूर्ती गाडगेबाबा जयंती साजरी करण्यात आली.अनेक विद्यार्थ्यांनी संत गाडगेबाबांचा वेश परिधान करून झाडू खराटा हाती घेऊन शाळा परिसरात स्वच्छता केली व गाडगेबाबांचा स्वच्छता संदेश दिला.

यावेळी शाळेचो मुख्याध्यापिका हिना बटाविया, शिक्षिका मुक्ति बाभूळकर(माळोदे), अश्विनी खैरकर, सुजित कालमेघ, रोशनी आवारे, नम्रता मोहोड, रूपाली इंगोले, श्रुती वाकोडे, आचल साबळे, सारिका टिंगणे, दिपाली पखाले, अंकुल वानखेडे, सारिका डहाके, सुरेखा खंडार, प्रतीक्षा यावले इत्यादी शिक्षक वर्ग व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# प्रा.राम मेघे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अॅण्ड मॅनेजमेंट

## एमबीए विभागात प्रेझेंटेशन स्पर्धा संपन्न

**अमरावती/प्रतिनिधीः-** विदर्भ युथ वेलफेअर सोसायटी संचलित प्रा. राम मेघे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अॅण्ड मॅनेजमेंट येथे विविध उपक्रमांचे आयोजन सातत्याने करण्यात येते. याच उपक्रमाचा एक भाग म्हणून एमबीए विभागातर्फे प्रेझेंटेशन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांनी सादरीकरण केले. मनुष्य बळ विकास या विषयांवर उत्कृष्ट सादरीकरण सादर केले.

संस्थेचे अध्यक्ष डॉ. नितीन धांडे, उपाध्यक्ष अॅड. उदय देशमुख, कोषाध्यक्ष प्रा. डॉ. हेमंत देशमुख, सचिव युवराजसिंग चौधरी, तसेच कार्यकारी सदस्य नितीन हिवसे, डॉ. पूनम चौधरी, पंकज देशमुख, प्रा. विनय गोहाड आणि प्रा. गजानन काळे यांच्या मार्गदर्शनाखाली व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अजय ठाकरे यांच्या प्रेरणेने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.



कार्यक्रमाला प्राचार्य डॉ. अजय ठाकरे,एमबीए विभाग प्रमुख डॉ. शशिकांत थोरात, डीन पब्लिक रिलेशन्स डॉ. लोभस घडेकर आणि कार्यक्रमाच्या परीक्षक डॉ प्रतीक्षा काळमेघ ,प्रा आतिफ सईद उपस्थित होते.

प्राचार्य डॉ अजय ठाकरे यांनी अशा प्रकारच्या सादरीकरणातून व्यक्तिमत्त्व विकास होतो असे मत व्यक्त केले व आयोजकांचे व विजेत्यांचे अभिनंदन केले. परीक्षकांनी विद्यार्थ्यांच्या संवादकौशल्य, प्रस्तुतीकरण शैली आणि विषयातील प्रभुत्वाचे कौतुक केले. विजेत्या टीमचे स्वागत प्राचार्य डॉ अजय ठाकरे तसेच मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन शिखा दुबे व आभार प्रदर्शन गार्गी चौधरी यांनी उत्तमरीत्या पार पाडले.

# राजर्षी शाहू महाराज वाचनालयात स्वातंत्र्यवीर सावरकर यांना अभिवादन



**तिवसा/प्रतिनिधीः-** येथील श्री स्वामी विवेकानंद बहू. सामाजिक संस्था अंतर्गत श्री राजर्षी शाहु महाराज सार्वजनिक वाचनालय तिवसा येथे स्वातंत्रवीर वि. दा. सावरकर यांचे पुण्यस्मरण करण्यात आले.दरवर्षी या दिवशी देशभरात त्यांना विनम्र अभिवादन केले जाते. सावरकर हे 'हिंदुत्व' या संकल्पनेचे प्रणेते होते आणि त्यांनी हिंदू संस्कृतीतील जातीभेद निर्मूलनासाठी आणि समाजसुधारणेसाठी मोठे कार्य केले. वाचनालयामध्ये त्यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांचे पुण्यस्मरण करण्यात आले. कार्यक्रमाला श्रीकांत गायकी, कृणाल गौरखेडे, विशाल गडलिंग, सचिन काळे, प्रिया डहाके,प्रणाली कामळापुरे, पूजा गडलिंग,रुपालीताई राऊत व इतर वाचक वर्ग उपस्थित होते.

# मनपा उद्यान विभागाच्या गलथान कामकाजाविरोधात राष्ट्रवादी युवक काँग्रेसचा आक्रोश

**अमरावती/प्रतिनिधी :-** मनपाच्या उद्यान विभागात सध्यस्थितीत गलथान,भोंगळ व बेजबाबदार कारभार चव्हाट्यावर आला असल्याने स्वच्छ , सुंदर व हरित अमरावतीच्या संकल्पनेला खीळ बसत आहे. याविरोधात राष्ट्रवादी युवक काँग्रेस ने आक्रोश व्यक्त करीत मनपा कार्यालयावर धडक दिली.

मनपाच्या उद्यान विभागाच्या वतीने शहरातील उद्यान विकसित करण्यास संदर्भात कुठलीही कार्यवाही होत नसून उद्यानाच्या देखभाल व दुरुस्तीकडे सुद्धा दुर्लक्ष केले जात आहे. शहारातील दुभाजकांमधील हिरवळ सुद्धा सुकलेली असून याकडे सुद्धा दुर्लक्ष होतांना दिसत आहे.

सध्या अमरावती महानगरपालिकेच्या उद्यान विभागात चार नवीन शक्तिमान वाहन दाखल झाले आहेत. मात्र शहरात वृक्ष छटाई करण्याची कार्यवाही नियमित होत नसून ज्या वृक्षांची छटाई करण्यात आली , त्या त्यांच्या गंजी सुद्धा महिनाभर उचलल्या जात नसल्याने वाहतुकीला देखील अडथळा निर्माण होत आहे. मनपाच्या उद्यानातील खेळणी सुद्धा नादुरुस्त असून त्याठिकाणी दुरावस्था निर्माण झाली आहे. उद्यानाच्या दुरावस्थेमुळे जेष्ठ नागरिक व महिलांना देखील त्याठिकाणी जाणे गैरसोयीचे ठरत आहे. याबाबात राष्ट्रवादी युवक कॉंग्रेसचो शहराध्यक्ष ऋतुराज राऊत यांनी मनपा आयुक्तांना अवगत केले.




तसेच यासंदर्भात संबंधित उद्यान विभागातील अधिकाऱ्यांना विचारणा केली असता ते मनुष्यबळ नसल्याचे कारण पुढे करून वेळ मारून नेतात.तसेच कामांवर तरतूद मिळाली नसल्याचे कारण सांगून उडवाउडवीची उत्तरे देतात. या सर्व बाबी लक्षात घेता,मनपा उद्यान विभागातील संबंधितांचे नियंत्रण नसल्याने गलथान,भोंगळ व बेजबाबदार कामकाज कारणीभूत असल्यामुळे मनपाच्या स्वच्छ - सुंदर व हरित अमरावतीच्या संकल्पनेला खीळ बसत आहे. म्हणून संबधित प्रकरणात उद्यान विभागाच्या कामकाजाची चौकशी करून या संदर्भातील सर्व माहिती जनतेसमोर आणण्यात यावी व मनपा उद्यान विभागातील संबंधित कर्मचाऱ्यांवर कारवाई व्हावी , या मागणीचे निवेदन राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या वतीने मनपा आयुक्तांना देण्यात आले. निवेदन देतेवेळी राष्ट्रवादी युवक कॉंग्रेसचे शहराध्यक्ष ऋतुराज राऊत यांच्यासह सुनील जावरे , संकेत बोके , मनीष पाटील,अतुल इंगळे,पियुष मोरे, प्रथमेश बोके, कर्नलसिंह राहाल, सागर इंगळे, अजय बेहरे, जयेश सोनोने, सार्थक खोरगडे, प्रमोद धनाडे, प्रथमेश गवई, उज्वल पांडे, बबलू वाडेकर,अभिजित लोयटे, सर्वेश खेडकर, शुभम पांडे, शास्वत मालपे , अमोल गुल्हाने , राहुल इंगोले, सोमेश्वर रोहणकर आदींसह राष्ट्रवादी युवक कॉंग्रेसचे पदाधिकारी व सर्व सहकारी उपस्थित होते. या प्रकरणात मनपा उद्यान विभागाच्या गलथान कामकाजाची चौकशी करून संबंधितांवर कार्यवाही न केल्यास आगामी काळात तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा सुद्धा राष्ट्रवादी युवक कॉंग्रेसच्या वतीने देण्यात आला आहे.

## रंग

रंग लेवुनी इंद्रधनुचे जिवनगाणे गात रहा.
बदलत जाते चित्र कसे अनिमिष तु पहात रहा.
तुझ्या कपोली रंग उषेचा,नेत्री संध्या विलसते.
तव तनुला श्यामल रजनी लडीवाळ ती बिलगतसे.
निळी निळाई त्या नभांची, निळा श्याम तो जणु भासतो. निळ्या जळाच्या लाटांवरती,राजहंस तो रोज नाचतो.
रंगाची ही उधळण करते,सृष्टी सखी तुझ्यासवे.
विचारेल जर कुणी मजला ,कोणते तुज रंग हवे?
हवा मला त्या रंगामागील,खराखुरा तोच चेहरा.
मोरपीसावर डोळा निर्जीव, अन आभासी तोच पिसारा...

**-मंगला माळवे**



नेरपिंगळाईत भागवत सप्ताह

# ग्रंथ दिंडी आणि महाप्रसादाने संत गुलाबपूरी महाराज पुण्यतिथी उत्सवाची भक्तिमय सांगता

**लेहेगाव/प्रतिनिधीः-** येथे संत गुलाबपूरी महाराजांच्या १०२ व्या पुण्यतिथी महोत्सवाला मोठ्या उत्साहात आणि भक्तिभावात प्रारंभ झाला होता. पहाटे काकड आरतीने सप्ताहाची सुरुवात होताच मंदिर परिसर वेदघोष, हरिनामाचा अखंड गजर आणि टाळ-मृदुंगाच्या निनादाने दुमदुमून गेला.

दि. २१ ते २७ फेब्रुवारी दरम्यान हरिभक्त परायण दादा महाराज कोळसकर यांच्या मधुर वाणीतून भागवत सप्ताह संपन्न झाला. त्यांच्या रसाळ वाणीने भाविकांना अध्यात्मिक चिंतनाची अनुभूती दिली.

श्री समर्थ गुलाबपुरी महाराज संस्थानतर्फे आयोजित या सप्ताहात विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रम पार पडले. दररोज अभिषेक, पूजन, हरिपाठ, भजन, कीर्तन आणि अन्नदान कार्यक्रमांमुळे संपूर्ण गाव भक्तीरसात न्हाऊन निघाले. यानिमित्ताने गावामध्ये पारंपरिक यात्रा देखील भरली होती, ज्यामुळे उत्सवाला धार्मिकतेबरोबरच सामाजिक स्वरूपही प्राप्त झाले.



सप्ताह आणि यात्रेच्या निमित्ताने पंचक्रोशीतील भाविक मोठ्या संख्येने नेरपिंगळाई येथे दर्शनासाठी आणि महाप्रसादाचा लाभ घेण्यासाठी उपस्थित झाले होते. महाप्रसाद तयार करण्यासाठी गावातील शेकडो तरुण-तरुणी तसेच महिलांचे हात राबत होते. सेवाभावाने करण्यात आलेल्या या कार्यामुळे उत्सवाला सामूहिकतेचा स्पर्श लाभला.

दि. २७ फेब्रुवारी रोजी ग्रंथ दिंडी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या ग्रंथ दिंडीत गावातील महिला भजन मंडळींचा उत्स्फूर्त सहभाग विशेष ठरला. भजनाच्या तालावर महिला मंडळींनी रस्त्यावरून सुरेख फेर धरत भक्तिमय वातावरण निर्माण केले. टाळ-मृदुंगाच्या नादात आणि हरिनामाच्या गजरात संपूर्ण गाव भक्तिरंगात रंगून गेले.

दि. २८ फेब्रुवारी रोजी काल्याचे कीर्तन प्रसाद महाराज काष्टी (परभणी) यांनी सादर केले. त्यानंतर सप्ताहाची सांगता करण्यात आली. समारोपाच्या दिवशी पुरणपोळीच्या महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. हजारो भाविकांनी शिस्तबद्ध आणि शांततेत महाप्रसादाचा लाभ घेतला. कार्यक्रम शांततेत व सुरळीत पार पडावा यासाठी श्री समर्थ गुलाबपुरी महाराज संस्थेचे पदाधिकारी, कार्यकर्ते, गावातील सामाजिक व राजकीय कार्यकर्ते तसेच पोलीस स्टेशनचे अधिकारी व कर्मचारी यांनी मोलाचे सहकार्य केले.

संपूर्ण सप्ताह श्रद्धा, सेवा, समर्पण आणि एकतेचा संदेश देणारा ठरला असून नेरपिंगळाई गावात आध्यात्मिक आणि सामाजिक एकात्मतेचे दर्शन घडले.


**पाहिजेत**

अमरावती व वरुड येथे पार्ट टाईम ऑफीस कामा करीता मोटरसायकल असलेले युवक पाहिजे.
पगार १० हजार + TA, DA + कमीशन
**संपर्क :**
**९४२२१९६३१९**



**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**विद्यमान श्री.एस.एस.भिंगारदेव, ८ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर)**
**अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज क्र.२४२/२०२६
**श्रीमती दिक्षा अधिक दोन -वि- निरंक**
पुढील ता.०१.०४.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :** १. श्रीमती दिक्षा उमेश येसनकार, वय ३२ वर्षे, कामधंदा - घरकाम
२. कु.प्रशब्दी उमेश येसनकार, वय ०६ वर्षे, कामधंदा - शिक्षण
३. शौर्य उमेश येसनकार, वय ०५ वर्षे, कामधंदा - शिक्षण
अर्जदार नं.२ व ३ करीता अ.पा.क.आई अर्जदार नं.१
सर्व रा.गांधी नगर, ता.कळंब, जि.यवतमाळ

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत उमेश नामदेव येसनकार** यांचे दिनांक **३०.१२.२०२५** रोजी **अमरावती** येथे निधन झाले. **अर्जदार दिक्षा अधिक दोन विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **अर्जदार दिक्षा अधिक दोन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**१८.०२.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती



**दि अमरावती जि.प.शिक्षक सहकारी बँक लि., अमरावती**
**कॉंग्रेस नगर रोड, रेल्वे पुलाजवळ, अमरावती**
**फोन नं.०७२१-२६७४६८४,२६७१०४३**

**निविदा सूचना**

दि अमरावती जिल्हा परिषद शिक्षक सहकारी बँक लि., अमरावतीच्या संपूर्ण ठेवीदारांना/खातेदारांना Transaction & Promotional SMS सुविधा पुरवायची असल्यामुळे SMS सुविधा पुरविणाऱ्या अधिकृत फर्मकडून सिलबंद निविदा मागविण्यात येत आहेत.

**निविदेच्या अटी व शर्ती -**

१. निविदा पत्रासोबत सविस्तर व विस्तृत कामाच्या अटी व शर्ती पुरविण्यात येतील.
२. निविदा प्रपत्र रु.५००/- + १८ टक्के जीएसटी सह चा नगदी भरणा मुख्यालय येथे करुन बँक मुख्यालयातून दि.०९.०३.२०२६ पर्यंत प्राप्त करता येतील.
३. परिपूर्ण सिलबंद निविदा बँक मुख्यालयात सादर करण्याची अंतिम तारीख १०.०३.२०२६ ही राहील. (वेळ दुपारी ४.०० वाजेपर्यंत)
४. निविदा धारकांकडून सशर्त तसेच पोस्टाद्वारे पाठविल्या जाणारी निविदा स्विकारल्या जाणार नाही.
५. याशिवाय विस्तृत अटी व शर्ती व ईतर माहिती निविदा प्रपत्र-१ मध्ये समाविष्ट केलेल्या असून, कार्यालयीन वेळेत त्या विनामूल्य पाहता येतील.
६. कोणतीही एक अथवा सर्व निविदा कोणतेही कारण न दर्शविता अस्किृत करण्याचा व निर्णय घेण्याचा अधिकार बँक प्रशासनाने राखून ठेवला आहे.

**अमरावती**
**दिनांक ०२.०३.२०२६**

**अध्यक्ष,** **प्र.सरव्यवस्थापक**
**दि.अमरावती जि.प.शिक्षक सह.बँक लि., अमरावती**



जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक १७४**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :-** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# वाघ दारात, वन विभाग झोपेत?

**वर्धा/ जनमाध्यम**

आकोली परिसरात वाघ व त्याच्या दोन बछड्यांच्या वावरामुळे भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

म्हसाळा साखर कारखाना, आमगाव व मदन उन्नई धरणालगतच्या जंगल पट्ट्यात वाघाने गुरांवर हल्ले केल्याच्या घटनांमुळे शेतकरी व कामगार वर्गात तीव्र चिंता व्यक्त होत आहे.

म्हसाळा येथील किसना कोसुळकार यांचा गोरा तर आमगाव येथील नंदू गावंडे यांच्या गोठ्यातील गायीचा वाघाने फडशा पाडल्याची घटना नुकतीच घडली.

गुरेढोरे गमावल्याने संबंधित

## आकोलीत भीतीचा कळस

शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.

घटनास्थळी रक्ताचे ठसे व पावलांचे ठसे आढळून आल्याने परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे सावट आणखी गडद झाले आहे.दरम्यान, वाघ व त्याचे दोन बछडे म्हसाळा साखर कारखान्याच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळ दिसल्याची

## जीव मुठीत धरून कामावर जाणारे कामगार

माहिती पुढे आली आहे. या कारखान्यातील पावर प्रकल्प तीन शिफ्टमध्ये सुरू असून अनेक कामगारांना रात्री अपरात्री कामावर ये-जा करावी लागते. त्यामुळे कामगारांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. सुरक्षा रक्षकांमध्येही घबराटीचे

## ‘फोटो पाठवा’ म्हणणारे अधिकारी

वातावरण आहे.या पार्श्वभूमीवर कारखान्याचे अधिकारी सचिन बुराडे व आमगाव मदनी ग्रामपंचायतीचे सदस्य प्रकाश अडसुळे यांनी वन विभागाकडे निवेदन सादर करून तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.

मानवी जीवितहानी



टाळण्यासाठी वाघाचा बंदोबस्त करावा, अशी ठाम भूमिका त्यांनी मांडली आहे.मात्र, वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी वाघाचा फोटो पाठवा अशी सूचना दिल्याचे सांगण्यात येत आहे.

अचानक समोर आलेल्या वाघाचा फोटो काढणे शक्य नसताना अशा प्रकारची भूमिका घेतल्याने नागरिकांमध्ये नाराजी पसरली आहे.

आता वन विभागाने तातडीने पथक तैनात करून परिस्थितीवर नियंत्रण मिळवावे, अशी मागणी जोर धरत आहे. अन्यथा एखादी दुर्दैवी घटना घडल्यानंतर प्रशासन हालचाल करणार का, असा प्रश्न ग्रामस्थांकडून उपस्थित केला जात आहे.

# रंगांच्या रणधुमाळीला वर्धा झाले सज्ज

## फॅन्सी पिचकाऱ्यांचा बाजारात स्फोट

**वर्धा/ जनमाध्यम**

होळी अवघ्या काही तासावर येऊन ठेपली आणि शहराची बाजारपेठ अक्षरशः रंगांच्या तुफानी उधळणीने पेटून उठली आहे. चौकाचौकांत उभे राहिलेले स्टॉल, दुकानांबाहेर लटकणारे झगमगते मास्क आणि फॅन्सी पिचकाऱ्यांची रांग साऱ्या वातावरणात रंगांचा जल्लोष उसळला आहे. ग्रामीण भागातून नागरिक मोठ्या संख्येने शहरात दाखल होत असल्याने बाजारपेठेत पाय ठेवायलाही जागा उरलेली नाही

यंदा पारंपरिक पिचकाऱ्यांना मागे टाकत फॅन्सी पिचकाऱ्यांनी धुमाकूळ घातला आहे. गदा, त्रिशूळ, बंदूक, चष्मा पिचकारी आणि बॅटरीवर चालणाऱ्या इलेक्ट्रिक गनने लहानग्यांचा



उत्साह द्विगुणित केला आहे. सुपरहिरोंच्या मुखवट्यांनी मुलांमध्ये वेड निर्माण केले असून स्पायडरमॅन, सुपरमॅन, आयर्नमॅन आणि बॅटमॅन यांच्या मास्कची सर्वाधिक मागणी आहे. भुतांचे मास्क, रंगीत केस आणि आकर्षक टोप्यांनीही बाजार रंगला आहे.गेल्या काही वर्षांपासून गुलालच्या सिलिंडरची क्रेझ वाढत असून यंदा ५०० ते ५ हजार रुपयांपर्यंत विविध रंगांचे सिलिंडर विक्रीसाठी उपलब्ध आहेत. तरुणाई या नव्या ट्रेंडला भरभरून प्रतिसाद देत आहे. होळीच्या बाजारात राजकीय पक्षांच्या चिन्हांसह पिचकाऱ्या दाखल झाल्या असून कार्यकर्त्यांकडून आगाऊ बुकिंग सुरू आहे. चित्रपटसृष्टी आणि क्रिकेटपटूंचे मास्कही आकर्षणाचे केंद्र ठरत आहेत.होळीच्या दिवशी होणारी झुंबड टाळण्यासाठी नागरिक आगाऊ खरेदी करत आहेत. यंदा विक्री समाधानकारक असून ग्राहकांचा उत्साह लक्षणीय आहे, असे व्यापारी हिरालाल विधवानी यांनी सांगितले. रंगांच्या या रणधुमाळीसाठी वर्धा सज्ज झाले आहे.

# देवळीत दिव्यांग कलाकारांच्या सुरांनी रंगला शिवमय सोहळा

**देवळी/ जनमाध्यम**

स्वराज्य ही केवळ सत्ता नव्हे, तर जनतेच्या कल्याणाची पवित्र जबाबदारी आहे, असा संदेश देत छत्रपती शिवाजी महाराज यांनी समाजातील सर्व जाती-धर्मांना सोबत घेत स्वराज्य उभारले. त्यांच्या युद्धकौशल्य, गुणग्राहकता, समन्वयशक्ती आणि रयतेप्रती असलेली आत्मीयता प्रत्येकासाठी प्रेरणादायी आहे, असे प्रतिपादन माजी खा.रामदास तडस यांनी केले.

देवळी येथे छत्रपती शिवाजी महाराज उत्सव समितीच्या वतीने आयोजित शिवजयंती सोहळ्यानिमित्त ते बोलत होते. या निमित्ताने दिव्यांगांसाठी कार्य करणाऱ्या ‘चेतन सेवांकुर’च्या अंध मुलांचा भावगीतांचा कार्यक्रम रंगला. अध्यक्षस्थानी रामदास तडस होते. कार्यक्रमाला पोलीस निरीक्षक अमोल मंडाळकर, नगरसेवक रविंद्र कारोटकर,



स्वप्नील कामडी, मिलिंद देशमुख, सुरेखाताई कारोटकर, ज्योती खाडे, शुभांगीताई कुर्जेकर, विश्वजीत पोटदुखे, समाजसेविका आशाताई सुरकार, अंकित टेकाडे यांची प्रमुख उपस्थिती होती. या प्रसंगी नवविर्वाचित नगरसेवकांचा सत्कार करण्यात आला. तसेच ‘चेतन सेवांकुर ऑर्केस्ट्रा’च्या अष्टपैलू कलाकारांनी सुरेल सादरीकरण करत उपस्थितांची मने जिंकली. इंडियन आयडॉल फेम कलाकारांचा सहभाग आणि दिव्यांग मुलांची जिद्द यामुळे कार्यक्रमाला वेगळेच तेज लाभले. अनेक वर्षांपासून अंध व अपंग मुलांसाठी झटणारे चेतन उचितकर यांच्या कार्याची दखल घेत त्यांचा समितीच्या वतीने सत्कार करून आर्थिक मदत देण्यात आली.शिवचरित्राच्या प्रेरणादायी आठवणी, सामाजिक संदेश आणि सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून संपूर्ण वातावरण शिवमय झाले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अमित वऱ्हाडे यांनी केले. सूत्रसंचालन मयूर पाटील यांनी तर आभार प्रदर्शन आकाश वऱ्हाडे यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी समितीच्या पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले. परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून शिवजयंती उत्सवाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

# पेन्शनच्या आमिषाने ६२.७० लाखांचा घोटाळा

## सेवानिवृत्त शिक्षकाची फसवणूक

**वर्धा/ जनमाध्यम**

विश्वासाच्या नावाखाली विणलेले जाळे किती भयानक असू शकते, याचा धक्कादायक नमुना शहरात समोर आला आहे. आईच्या पेन्शन प्रकरणाचे काम करून देण्याच्या बहाण्याने सेवानिवृत्त शिक्षक शुद्धोधन सुखदेव धनवीज (६१) यांची तब्बल ६२ लाख ७० हजार रुपयांची फसवणूक करण्यात आली. या प्रकरणी सेवाग्राम पोलीस ठाणे येथे चेतन विनायक लगड (दहेगाव-गोसावी) व अक्षय लेंडे (इंजापूर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

म्हसाळा येथील कला लॉन परिसरात राहणारे धनवीज यांनी आईच्या पेन्शनचे काम पूर्ण करून देण्याच्या आश्वासनावर आरोपींवर विश्वास ठेवला. जुलै २०२२ ते मार्च २०२४ या कालावधीत प्रकरण लवकरच निकाली लागेल या गोड शब्दांनी आरोपींनी त्यांच्याकडून वारंवार रक्कम उकळली. एवढेच नव्हे, तर पेन्शन प्रकरणातून तब्बल १७३ कोटी रुपये खात्यात जमा होणार असल्याचे सांगत बनावट पावत्या, रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे बनावट पत्रव्यवहार, तसेच रेल्वेतील केसचे खोटे कागदपत्रे पाठवून विश्वासार्हतेचा आभास निर्माण केला.रोख ७० हजार, विविध बँक खात्यांमधून लाखो रुपये, फोन-पे व्यवहार आणि तब्बल ३९ लाख ३० हजार रुपये रोख अशा प्रकारे एकूण ६२ लाख ७० हजार रुपये आरोपींनी लाटले. कागदपत्रे बनावट असल्याचे लक्षात येताच धनवीज यांच्या पायाखालची जमीन सरकली.२२ सप्टेंबर २०२५ पर्यंतही पैसे परत न मिळाल्याने त्यांनी अखेर पोलिसांकडे धाव घेतली. तक्रारीनंतर पोलिसांनी दोन्ही आरोपींविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पीएसआय वाल्मीक बांबर्डे वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली करीत आहेत.विश्वासाचा गैरफायदा घेत ‘पेन्शन’च्या नावाने रचलेले हे षडयंत्र समाजातील सज्जन नागरिकांसाठी धोक्याची घंटा ठरत आहे.

# गोव्याच्या मौजेसाठी पलायन खंडणीप्रकरणी चार आरोपी जेरबंद

## स्थानिक गुन्हे शाखेची धडाकेबाज कारवाई, १२ लाखांहून अधिक मुद्देमाल जप्त

**देवळी/ जनमाध्यम**

भिडी येथील खंडणी व मारहाणीच्या गंभीर गुन्ह्यातील आरोपी गोव्याच्या मौजेसाठी पसार होत असतानाच स्थानिक गुन्हे शाखा वर्धाने त्यांना चित्रपटाला शोभेल अशा थरारक पाठलागानंतर जेरबंद केले. या कारवाईत तब्बल १२ लाख ८९ हजार ९८० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

दि. १२ फेब्रुवारी रोजी पांडुरंग उत्तमराव डफरे (वय ५२, रा. भिडी, ता. देवळी) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून देवळी पोलीस ठाण्यात अप. क्र. ११४/२६ अन्वये भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमानुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता. गावातील राकेश वागन्ना व इतरांनी अतिक्रमण काढल्याच्या कारणावरून फिर्यादीस मारहाण करून खंडणीची मागणी केल्याचा आरोप आहे.दरम्यान, स्थानिक गुन्हे शाखेला खात्रीशीर माहिती मिळाली की कळंब (जि.




यवतमाळ) येथील हिरा कोहचाडे, अमोल आखाडे, वैभव निखाडे व शुभम सावरकर हे आरोपी पांढऱ्या रंगाच्या विनाक्रमांकाच्या क्रेटा कारने समृद्धी महामार्गाने गोव्याकडे पळून जात आहेत. शिवनी टोल नाक्यावरील माहितीच्या आधारे पथकाने कारंजा (लाड) मुर्तिजापूर मार्गावर सापळा रचला. पोलिसांची चाहूल लागताच आरोपींनी पळ काढण्याचा प्रयत्न केला; मात्र शिताफीने पाठलाग करून त्यांना ताब्यात घेण्यात आले. आरोपींकडून पांढरी विनाक्रमांक क्रेटा कार (किंमत अंदाजे १० लाख रुपये), ५३,९८० रुपये रोख रक्कम व ८ मोबाईल फोन असा एकूण १२,८९,९८० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. चौकशीत त्यांनी राकेश वागन्ना (रा. भिडी) व बादल थुल (रा. दूरगडा) यांच्यासह गुन्हा केल्याची कबुली दिली.ही कारवाई पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल, अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे व स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विनोद चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.आरोपी व जप्त मुद्देमाल पुढील तपासासाठी देवळी पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले असून, प्रकरणाचा तपास सुरू आहे.

# मराठी ही ज्ञानविज्ञानाची भाषा व्हावी - तिगावकर

**वर्धा/ जनमाध्यम**

महाराष्ट्रात मराठी ही व्यवहाराची भाषा म्हणून आपण स्वीकारली. मात्र, अद्यापही राज्यात उच्च शिक्षणासाठी मराठी भाषेतील अभ्यासक्रम कार्यान्वित झालेला दिसत नाही. मराठी ही ज्ञानदानाची, विज्ञानाची भाषा म्हणून स्वीकारली तरच सर्वसामा न्यांसाठी उच्च शिक्षणाचा मार्ग सहजसोपा होईल, असे प्रतिपादन विदर्भ साहित्य संघाचे शाखाध्यक्ष, कवी संजय इंगळे तिगावकर यांनी स्थानिक म्युनिसिपल कमला नेहरू विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात आयोजित मराठी भाषा गौरव दिन कार्यक्रमात काढले.वि.वा. शिरवाडकर उपाख्य कवी कुसुमाग्रज यांच्या जयंतीदिनी




आयोजित या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेच्या मुख्याध्यापिका मैथिली मुळे होत्या.चारशे वर्षांपूर्वी मूठभर लोकांची असलेली इंग्रजी भाषा आज जगातली अग्रणी भाषा झाली आहे. इंग्रजांनी जगावर राज्य करताना त्या त्या प्रांतात इंग्रजी भाषा रूजवण्याला प्राधान्य दिले. तसेच दैनंदिन व्यवहाराची भाषा म्हणून इंग्रजीचा वापर करतानाच जगभरातील ज्ञानशाखा या भाषेत आणण्याचे कामही अग्रक्रमाने केले. आज जगात दहाव्या स्थानी असलेली आणि भारतात हिंदी व बांगलानंतर सर्वाधिक बोलली जाणारी मराठी भाषा अधिक समृद्ध करायची असेल तर तिचा सर्वच क्षेत्रात व्यापक वापर होणे गरजेचे आहे, असे उद्गार संजय इंगळे यांनी काढले. मुख्याध्या पिका मैथिली मुळे यांनी आपल्या भाषणातून ‘रुजवू मराठी, फुलवू मराठी’ असा संदेश विद्यार्थ्यांना दिला.

# समृद्ध बोलींच्या वारशामुळे मराठीचे वैभव अबाधित - डॉ. राजेंद्र मुंढे

**वर्धा/ जनमाध्यम**

अमूर्ताला मूर्त रूप देणारी आणि अमृतालाही पैजा जिंकणारी मराठी भाषा हा अथांग सागर आहे. या सागराला समृद्ध करणाऱ्या तिच्या शेकडो बोली म्हणजेच तिचे खरे वैभव, असे मत ज्येष्ठ साहित्यिक समीक्षक डॉ. राजेंद्र मुंढे यांनी व्यक्त केले.

विष्णू वामन शिरवाडकर (कुसुमाग्रज) यांच्या जयंतीनिमित्त साजऱ्या करण्यात आलेल्या ‘मराठी राजभाषा गौरव दिना’निमित्त केसरीमल कन्या विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय येथे आयोजित कार्यक्रमात ते प्रमुख वक्ते म्हणून



बोलत होते. हा उपक्रम महाराष्ट्र राज्य कनिष्ठ महाविद्यालयीन मराठी विषय शिक्षक महासंघ, वर्धा जिल्हा यांच्यावतीने आयोजित करण्यात आला होता.

डॉ. मुंढे म्हणाले, मराठीची खरी ताकद तिच्या ग्रामीण मातीत रुजलेल्या बोलींमध्ये आहे. बोली जपल्या तर भाषा टिकेल; भाषा टिकली तरच ती ज्ञानभाषा म्हणून उभी राहील. बोलीभाषांचा वारसा जतन करण्याची जबाबदारी प्रत्येक मराठी माणसाने स्वीकारली पाहिजे, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी प्राचार्य पद्माकर बाविस्कर होते. प्रास्ताविकात प्रा. कुंडलिक राठोड यांनी मराठी भाषा संवर्धनासाठी शिक्षक महासंघाच्या उपक्रमांची माहिती देत मराठी अनिवार्य करण्यासाठी संघटित प्रयत्नांची गरज अधोरेखित केली. अध्यक्षीय भाषणात बाविस्कर यांनी मराठीला व्यवहारात आणि शिक्षणात अधिक दृढ स्थान मिळवून देण्यासाठी दिशा ठरविण्याचे आवाहन केले.




## लक्ष्मीनगरमध्ये चोरीचा प्रयत्न हाणून पाडला

**वर्धा -** शहरातील लक्ष्मीनगर परिसरात मध्यरात्री चोरीचा प्रयत्न उधळण्यात शहर पोलिसांना यश आले. राकेश तुळशीराम खंडाते (रा. दहेगाव (गो.) ता. आर्वी) याला संशयास्पद हालचाली करताना ताब्यात घेण्यात आले. संबंधित व्यक्ती एका घराजवळ फिरत असल्याची माहिती मिळाल्यानंतर गस्त घालणाऱ्या पथकाने तत्काळ धाव घेतली. घराच्या दाराशी कडी हलविण्याचा आवाज झाल्याने रहिवाशांनी आरडाओरड केली. त्यानंतर संशयित पळून जाण्याच्या तयारीत असताना पोलिसांनी त्याला पकडले. त्याच्याकडून दुचाकी व मोबाईल जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

## गुंजखेड्यात ज्येष्ठ शेतकऱ्याचा उपचारादरम्यान मृत्यू

**वर्धा -** पुलगाव परिसरातील गुंजखेडा येथे आर्थिक अडचणींमुळे विष प्राशन केलेल्या शेतकऱ्याचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. वसंत राघोबा तामखाने (७४) असे मृताचे नाव आहे. ते आपल्या कुटुंबासह शेती करत होते. यंदा पीक अपेक्षेप्रमाणे न आल्याने ते चिंतेत होते. त्यांनी राहत्या घरी विष घेतल्याची माहिती समोर आली आहे. प्रकृती गंभीर झाल्यानंतर त्यांना सावंगी (मेघे) येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले; मात्र उपचार सुरू असतानाच त्यांचा मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली असून पुढील तपास सुरू आहे.

## बांधकामाच्या वादातून घरमालक जखमी

**सेलू -** तुळजापूर (वघाळा) येथे बांधकामावरून झालेल्या वादातून घरमालकावर हल्ला करण्यात आल्याची घटना घडली. समीर जनार्धन झाडे (३०) हे जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. घरातील लग्नकार्याच्या पार्श्वभूमीवर बांधकाम लवकर पूर्ण करण्याची विनंती केल्याने वाद निर्माण झाल्याचे सांगण्यात येते. वाद वाढत गेल्यानंतर ठेकेदार शंकर निमजे यांनी धारदार शस्त्राने हल्ला केल्याचा आरोप आहे. जखमीच्या तक्रारीवरून सेलू पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पोलिसांनी पुढील तपास सुरू केला आहे.

## चाकुरमध्ये २३ वर्षीय युवकाची आत्महत्या

**समुद्रपुर -** तालुक्यातील चाकुर येथे २३ वर्षीय खाजगी पशुवैद्यकाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली आहे. ऋषिकेश शरद ठाकरे असे मृतकाचे नाव आहे. ते गावोगावी जाऊन जनावरांवर उपचार करत होते. शेतातील झाडाला दोर बांधून त्यांनी टोकाचे पाऊल उचलल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. मृतदेह शवविच्छेदनासाठी ग्रामीण रुग्णालयात पाठविण्यात आला. घटनास्थळी एक पत्र आढळले असून त्यात आत्महत्येचे ठोस कारण नमूद नसल्याचे पोलिसांनी सांगितले. पुढील तपास सुरू आहे.

## किरकोळ कारणातून तरुणीला मारहाण

**आर्वी -** वाढोणा येथे दोन महिलांमध्ये झालेल्या वादातून मारहाणीची घटना घडली. मनीषा देवराव चरडे यांना काठीने मारहाण करण्यात आल्याची तक्रार आर्वी पोलिसांत नोंदविण्यात आली आहे. किरकोळ कारणावरून दोघींमध्ये वाद झाला. शिवीगाळ थांबविण्याबाबत सांगितल्याने वाद अधिक चिघळला आणि संध्या विकास कुकडे यांनी काठीने मारहाण केल्याचा आरोप आहे. तसेच जीवे मारण्याची धमकी दिल्याची नोंद तक्रारीत आहे. पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

## रेल्वेस्थानक परिसरातून दुचाकी लंपास

**वर्धा -** रेल्वे स्थानक परिसरात उभी केलेली दुचाकी अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना समोर आली आहे. हर्षद लीलाधर बांगरे यांनी आपली दुचाकी सीएनडब्ल्यू कार्यालयासमोर लॉक करून ठेवली होती. कामानिमित्त बाहेर जाऊन परत आल्यानंतर वाहन जागेवर नसल्याचे लक्षात आले. सुमारे २५ हजार रुपये किमतीच्या वाहनाची चोरी झाल्याची तक्रार रामनगर पोलीस ठाण्यात नोंदविण्यात आली आहे. पोलिसांनी परिसरातील माहिती संकलित करण्यास सुरुवात केली असून तपास सुरू आहे.

## दीर्घ आजाराने त्रस्त व्यक्तीची आत्महत्या

**पुलगाव -** तांबा येथे कर्करोगाच्या आजाराने त्रस्त असलेल्या व्यक्तीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली. गौतम केशव हजारे (४५) असे मृताचे नाव आहे. मागील वर्षभरापासून ते आजारावर उपचार घेत होते. प्रकृती बिघडत असल्याने मानसिक ताण वाढल्याची माहिती कुटुंबीयांनी दिली. घरातील खोलीत नायलॉन दोराने गळफास घेतल्याचे समोर आले. घटनेची माहिती मिळताच पुलगाव पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला.

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्यो मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा, वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**

(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष** - १४ **अंक** - ९५

आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८

**ई-मेल**-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# संक्षिप्त

## क्रांती ज्योती ब्रिगेड तर्फे वि.दा. पवार सन्मानित



**अमरावती -** वंचित घटकातील विद्यार्थ्यांसाठी शिक्षण दानाचं महत्त्वाचं कार्य तथा पर्यावरण संवर्धनासाठी कार्य करणारे प्रभात एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष वि.दा.पवार यांना क्रांतीज्योती ब्रिगेड सामाजिक संघटनेच्या वतीने संस्थापक अध्यक्ष एड. नंदेश अंबाडकर यांच्या हस्ते त्यांच्या शैक्षणिक, सामाजिक, पर्यावरण कार्याचा गौरव करीत शाल, श्रीफळ, सन्मानपत्र, स्मृतीचिन्ह देऊन गौरविण्यात आले. विमलबाई देशमुख सभागृहात क्रांतीज्योती ब्रिगेड सामाजिक संघटनेच्या वतीने आयोजित जीवनवेल परिचय पुस्तकाच्या प्रकाशन सोहळ्याप्रसंगी स्वागताध्यक्ष डॉ. नीलकंठ यावलकर, डॉ रामचंद्र शेळके, सुभाष बनसोड, डॉ अशोक उमक, सत्कारमूर्ती नगरसेवक नाना आमले, सुनीता भेले, वंदना मडघे, राजश्री जठाळे, अर्चना पाटील यांच्या उपस्थितीत वि दा.पवार यांना सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी सुभाष मालपे, प्रफुल्ल उमक, जितेंद्र वाघ, अशोक पांडे, राजू अबाडकर, रवींद्र पाटील, गजानन माहुरकर, सुरेंद्र धामणकर, नितीन पंध्ये, संजय सरवटकर, झाकीर कुरेशी, मझर अली, संजय वाघुळे यांनी त्यांचे अभिनंदन केले.

## कौंडण्यपूर येथे श्री. संत गजानन महाराज पारायण



**कुऱ्हा-** विदर्भाची पंढरी आई रूक्मिणी मातेचे माहेर अशा प्राचीन पुरातन श्री अंबिका देवी संस्थान मधून रूख्मीणी हरण झालेल्या अंबिका मंदीरामध्ये बडनेरा येथील श्री संत गजानन महाराज पारायण समिती तर्फे दरवर्षी प्रमाणे याही वर्षी दि.१ मार्च २०२६ लाभ सकाळी ८ ते दुपारी ३ वा.पर्यंत पारायण प्रवक्ता शुभदा मेटकर (बडनेरा) हिच्या अमृत वाणीतून श्री संत गजानन महाराज पारायण अतिशय सुंदर अशा वाणीतून केले.पारायण हे आर्वीचे दानशूर रमेशबाबा राठी यांच्या भक्त निवास मध्ये एक दिवसीय श्री संत गजानन महाराज पारायण पार पडले.यावेळी निलेश मानकर, तेजू मल्होत्रा तसेच मंगल ग्रुप आर्वी सर्व भाविक भक्त, हरिचंद्र कहाळे, सौ. ज्योतीताई कहाळे व सर्व श्री संत गजानन महाराज पारायण समिती बडनेरा यांचे स व भक्तगण यांचा सहभाग होता.

## तिवसा येथे रंगले बॅडमिंटन सामने



**तिवसा -** शहरात दरवर्षी प्रमाणे या वर्षी सुद्धा बॅडमिंटन सामन्याचे आयोजन तालुका क्रीडा संकुल, तिवसा येथे करण्यात आले होते.यावर्षी सुद्धा जिल्ह्यातील व जिल्हा बाहेरील टीम ने सहभाग घेतला होता. या मध्ये प्रतीक अँड पार्टनर, परतवाडा यांनी तिसरे स्थान पटकवले आहे तर पहिल्या व दुसऱ्या स्थानासाठी अत्यन्त चूरशीचा सामना रंगला होता. हा सामना जवळपास ४० मिनटे चालला. या सामन्यामध्ये अमित गेडाम अँड पार्टनर अमरावती यांनी दुसऱ्या स्थानी तर तन्मय गावंडे अँड पार्टनर, दिग्रस यांनी पहिल्या स्थानी क्रमांक पटकावला आहे. विशेष बाब की तन्मय गावंडे हा नॅशनल लेवल चा खेळाळु आहे. तर इंटरनॅशनल कोच आहे.या भव्यदिव्य स्पर्धेची जबाबदारी तिवसा स्पोर्ट्स क्लब, तिवसा यांच्या कडून करण्यात आले होतीया स्पर्धेच्या यशस्वीतेकरीता डॉ. राजेश वाईन्देशकर, प्रमोद गौरखेडे, गजानन जाधव, आशिष तिवारी, दिनेश वानखडे, नरेंद्र पटेल, अमोल पाटील, विशाल ठाकरे, किशोर आमले, गिरीष टेकाडे, अतुल बारके, विनोद आगोले, किशोर टावरी, सावन राठी, भुषण अग्रवाल, सतिश वानखडे, सुजल शेंद्रे, राज रियार यांनी अथक परिश्रम घेतले.

## आनंद मठ मध्ये दिंडी सोहळा



**चांदूररेल्वे -** शहरातील अमरावती रोडवरील गुरूवर्य आण्याजी महाराज आनंद मठाच्या वतीने गुरू महाराज दत्तागिरी यांच्या शिष्या समिक्षा महल्ले यांनी शहरातील मठा मध्ये अखंड दत्तनाम सप्ताहा करण्यात आले असून या मध्ये दत्तगीरी महाराज यांच्या अमृततुल्य वाणीतून बाळक्रीडा ग्रंथाचे वाचन उपस्थित भक्तांनी प्रसाद रूपाने ग्रहण केले.ज्या मध्ये शहरातून टाळ, मृदंग च्या गजरात दिंडी काढण्यात आली. ज्या करीता गुरू महाराज दत्तागिरी, गुरू मोहनपुरी महाराज, देवगिरी महाराज, माऊली टाळकरी मंडळ असदपुर व छावा इव्हेंट चे योगेश लंगोटे अमरावती यांनी मोलाचे सहकार्य केले. चांदूररेल्वे शहरातील हजारो भक्तांनी या कार्यक्रमाचा लाभ घेतला.

तसेच सप्ताहाची सांगता १२८ वी आनंद दत्त महापुजा गुरू महाराज दत्तागिरी यांच्या हस्ते करत महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले.

अचलपूर तालुक्यातून

# संत्रा बाग होणार हद्दपार?



### शेतकऱ्यांना संत्रा बाग ठरला श्राप

### १५ वर्ष मुलासारखे संगोपन करून ही जेसीबी द्वारे कटाई

**अचलपूर/ वार्ताहर**

विदर्भातील संत्रा जगप्रसिद्ध आहे. विदर्भात मोठ्या प्रमाणावर संत्रा फळांचे उत्पादन घेतले जाते. परंतु, मागील ५ ते ६ वर्षापासून संत्रा उत्पादक शेतकरी संकटात सापडले आहे. संत्रा झाडावर असलेल्या विविध रोगांमुळे संत्रा गळती सुरू झाली आहे. यामुळे आता अचलपूर तालुक्यातून संत्रा बाग हद्दपार होणार का? हा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. शेतकऱ्यांचा आत्महत्या व कर्जबाजारी पणाला संत्रा बाग कारणीभूत असल्याची संतप्त प्रतिक्रिया शेतकऱ्यांनी दिली आहे.

यामुळे शेतकऱ्यांना संत्रा बाग श्राप ठरला का? १५ वर्ष मुलासारखं संगोपन करून संत्र्याचा झाडाची जेसीबी द्वारे कटाई केल्याचा प्रकार समोर आला आहे.एकीकडे निसर्गाचे लहरीपणा आणि संत्रा गळती मुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान होत आहे. लाखो रुपये खर्च करूनदेखील काहीच उत्पादन होत नसल्याने अचलपूर मतदार संघातील तळेगाव मोहना जवळ बाळापुरे नामक शेतकऱ्याने आपल्या १ एकर संत्रा बागेतील शेकडो हिरव्यागार संत्रा झाडांवर बुलडोजर जेसीबी चालून संत्रा बाग नष्ट करून टाकली आहे.गेल्या काही वर्षापासून संत्रा उत्पादक शेतकरी संकटात सापडला आहे. पावसाच्या दुष्काळामुळे शेतकऱ्यांनी संत्र्याची वाळलेली झाडी तोडली होती. परंतु आता लागवड खर्चही निघत नसल्याने या शेतकऱ्याने आपली हिरवीगार बाग नष्ट केली आहे. लहान मुलांप्रमाणे काळजी घेत लहानाची मोठी केली झाडे बाळापुरे या संत्रा उत्पादक शेतकऱ्यांनी तोडून टाकली आहे.१५ वर्षांपूर्वी संत्राच्या झाडाची त्यांनी लागवड केली होती. चांगले पैसे मिळतील अशी आशा होती. मात्र, चार ते पाच वर्षापासून लावलेलं खर्च देखील निघणे कठीण झाले होते.

याच चिंतेतून या शेतकऱ्यांनी आपले झाडे बुलडोझर जेसीबी टाकून नष्ट करून टाकले.

## राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षेत विद्यार्थ्यांची उत्तुंग भरारी



समृद्धी बेहरे



भाग्यश्री कुत्तरमारे



चंचल फेंगडे



आर्यन गणोरकर

**नांदगाव पेठ/ वार्ताहर**

राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद (एनसीईआरटी), नवी दिल्ली यांच्या वतीने आयोजित करण्यात येणारी राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षेत येथील जिल्हा परिषद माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी उत्तुंग भरारी घेत चार विद्यार्थ्यांनी गुणवत्ता यादीत आपले स्थान प्राप्त करून शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरले आहेत.

यावर्षी जिल्हा परिषद माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालय, नांदगाव पेठ येथून २२ विद्यार्थी परीक्षेला बसले होते. त्यापैकी चार विद्यार्थ्यांनी प्राविण्य श्रेणीत उत्तीर्ण होत शिष्यवृत्तीसाठी पात्रता मिळवली आहे. ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळेतील इयत्ता आठवीचे समृद्धी किरण बेहरे, भाग्यश्री रामचंद्र कुत्तरमारे, चंचल योगेश फेंगडे आणि आर्यन उमेश गणोरकर यांनी गुणवत्ता यादीत स्थान मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले. परीक्षेसाठी एस. बनसोडे यांनी गणित, संजय डांगे यांनी बुद्धिमत्ता, कल्पना चांदूर यांनी इतिहास व भूगोल, तर ज्योती नारखेडे यांनी विज्ञान विषयाचे मार्गदर्शन केले. तसेच रामकृष्ण उपरीकर, कल्पना देशमुख, प्रणाली ढोणे, डॉ. जयश्री इंगळे आणि इतर शिक्षकांनी दररोज दोन तास विशेष अध्यापन करून विद्यार्थ्यांची तयारी करून घेतली.विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य देवेंद्र ठाकरे, उपप्राचार्य सुनील राऊत तसेच शिक्षक अशोक चाफले, ए. एस. बनसोडे, के. जे. शेख, उपरीकर, डांगे, व्ही. एम. गुरव, प्रणाली ढोणे, जे. टी. आझडे, कल्पना वर्हेकर, यु. एस. घारड, डॉ. जयश्री इंगळे, ज्योती नारखेडे, आसीया शेख, चंदा इंगळे, स्वाती बोडाखे, प्रशांत वाडीकर, हेमंतकुमार यावले, जीवनमाला बोरकर, शितल अटाळकर, नितीन फाळके, तेजस्विनी शेंडे, गुलाम अन्सारी, धनंजय देशमुख, प्रतिभा भुले, उमेश केने यांच्यासह शाळा व्यवस्थापन समिती, पालक आणि ग्रामस्थांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## साऊर येथे कबड्डी स्पर्धेचे आयोजन

**टाकरखेडा संभू -** छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सवानिमित्त युवक क्रीडा व गणेशोत्सव मंडळ, साऊर यांच्या वतीने स्व. निलेश भुयार स्मृती प्रित्यर्थ कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा २८ फेब्रुवारी व १ मार्च २०२६ रोजी दादा भामोदकर कृषी विद्यालय, साऊर येथे पार पडणार आहे.स्पर्धा खुल्या गटासाठी असून प्रवेश फी ७०१ रुपये ठेवण्यात आली आहे. विजेत्या संघासाठी २१,००० रुपये तर उपविजेत्या संघासाठी ११,००० रुपयांचे बक्षीस जाहीर करण्यात आले आहे. तसेच स्पर्धेत उत्कृष्ट खेळाडूंना विविध वैयक्तिक पारितोषिकांनी गौरविण्यात येणार आहे.स्पर्धेचे आयोजन युवक क्रीडा व गणेशोत्सव मंडळाच्या वतीने करण्यात आले असून विविध समित्यांमार्फत नियोजन करण्यात आले आहे. परिसरातील कबड्डी संघांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवावा, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.आयोजक शशिकांत बोंडे अधिक माहितीसाठी रणजित अडिवकर, विक्रान्त बोंडे व मयूर बोंडे यांच्याशी संपर्क साधावा, असे कळविण्यात आले आहे.

## शेती साहित्य चोरांचा बंदोबस्त करा



### तालुका भाजपची मागणी

**चांदूरबाजार/ वार्ताहर**

शेतकऱ्यांची गोवंशाची जनावरे गोठ्यातून चोरीला जाणे.हा प्रकार अनेक वर्षांपासून घडत आहे.मात्र या गोवंश चोरांचा तपास मात्र कधीच लागत नाही. आज बैलांच्या झालेल्या किंमती पाहता, त्या एका बैलाला पन्नास हजाराचे वर आहे.या नर गोवंश चोरी मुळे, तालुक्यातील शेतकरी जाम वैतागला आहे.

अशातच तालुक्यातील शेतकऱ्यांना मागिल काही वर्षांपासून, शेतातील शेती साहित्याचे चोरीला सामोरे जावे लागत आहे.शेतातील हजारो रूपयांचे शेतीपूरक साहित्य, तालुक्यात दररोज कुठल्या न कुठल्या शेतकऱ्याच्या शेतातून चोरीला जात आहे.

यात स्प्रिंकलर पाईप, स्प्रिंकलर चे पितळी नोझल, विद्युत मोटर केबल, विद्युत मोटर, लोखंडी पाईप सह इतर शेती साहित्य चोरीला जात आहे. तालुक्यातील बहुतांश पोलिस स्टेशन मध्ये, या शेती साहित्य चोरीच्या तक्रारी दाखल झाल्या आहेत.मात्र पोलीस प्रशासन ला या चोरीचा तपास लागत नाही.

शेतक-याचे शेती साहित्याची चोरी काही थांबत नाही.शेती साहित्याचे चोरी मुळे तालुक्यातील शेतकरी अक्षरशः मेटाकुटीला आले आहे.कारण चोर सापडत नाही.चोरी थांबत नाही.अखेर या शेती साहित्य चोरी चोरी गेलेलेल्या शेतकऱ्यांची कैफियत ऐकून, तालुका भाजप कार्यकारिणीने स्थानिक पोलीस प्रशासनाला लेखी निवेदन दिले.

या निवेदनात शेतातील वारंवार होणाऱ्या, शेत साहित्य चोरीचा तातडीने बंदोबस्त करण्यात यावा.

तसेच या बाबत शेतकऱ्यांनी दिलेल्या तक्रारींची, गांभीर्याने दखल घेऊन प्राधान्यक्रमाने चोरीचा तपास करण्यात यावा.

अशी मागणी करण्यात आली आहे.सदर निवेदन तालुका भाजप अध्यक्ष रमेश तायवाडे यांचे नेतृत्वात देण्यात आले.

## टावरी इंग्लिश स्कूलमध्ये राष्ट्रीय विज्ञान प्रदर्शन

### विद्यार्थ्यांनी विविध वैज्ञानिक प्रयोग, प्रात्यक्षिके आणि प्रकल्प केले सादर

**चांदूर रेल्वे/ वार्ताहर**

श्रीमती कमलाबाई ब. टावरी इंग्लिश स्कूल, घुईखेड येथे राष्ट्रीय विज्ञान दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या दिवसाचे औचित्य साधून विज्ञानाचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावे आणि वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित व्हावा, हा कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व सरस्वती पूजन तथा सि. व्ही. रमण, स्व. डॉ. बद्रीदास टावरी यांच्या फोटो पूजनाने करण्यात आली. शाळेचे मुख्याध्यापक प्रकाश मिरासे यांनी विज्ञानाचे दैनंदिन जीवनातील महत्त्व स्पष्ट करत विद्यार्थ्यांना प्रयोगशील आणि जिज्ञासू राहण्याचे आवाहन केले. तर राष्ट्रीय विज्ञान दिनामुळे विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाविषयी आवड आणि संशोधनाची प्रेरणा निर्माण झाली असे प्रतिपादन श्रीमती कमलाबाई टावरी बहूउद्देशीय शिक्षण संस्था नागपूर चे संस्थापक कृष्णकुमार टावरी यांनी केले. राष्ट्रीय विज्ञान दिना निमित्त विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन शाळेत करण्यात आले होते. यामध्ये एकूण ८० विद्यार्थी यांनी विविध वैज्ञानिक दृष्टीकोण लक्षात घेऊन विविध वैज्ञानिक प्रयोग, प्रात्यक्षिके आणि प्रकल्प सादर केले. पर्यावरण संरक्षण, सौरऊर्जा, जलसंधारण, रोबा टिक्स आदी विषयांवर आकर्षक मॉडेल्स मांडण्यात आली. या कार्यक्रमास चांदूर रेल्वे येथील घोडे सर अकॅडमी चे संचालक अंकुश घोडे, श्री.शिवाजी विज्ञान महाविद्यालय अमरावतीचे सहाय्यक प्राध्यापक श्रीकांत शेळके, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शक कोमल मोटघरे, नवोदय व शिष्यवृत्ती परीक्षा मार्गदर्शक विवेक भगत यांनी प्रदर्शनीत मुलांनी सादर केलेल्या मॉडेल्स चे परीक्षण केले तथा गुण विभागणी केली.सदर उपक्रम साहाय्यक शिक्षिका ऋतुजा भारती, राणी जवंजाळ, राधा राऊत, लाडे यांच्या नियोजनात्मक रचनेतून साकार करण्यात आला. कार्यक्रमच्या यशस्वितेकरिता उपमुख्याध्यापक , सहाय्यक शिक्षिका , बनकर, गुजरकार, पाचखेडे, डकरे, शारीरिक शिक्षक मदन, शालेय कर्मचारा गावंडे, जुनघरे यांनी परिश्रम घेतले.

GHARKUL Masale
पाहिजेत
ब्रँडेड अगरबत्ती घरोघरी विक्रीकरिता महिला व पुरुष पाहिजे.
: संपर्क :
घरकुल मसाले फॅक्टरी, एमआयडीसी. अमरावती

## महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना शिबिराचे समारोप





**अमरावती/ का.प्र.**

स्थानिक अस्मिता शिक्षण मंडळ द्वारा संचालित महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना सात दिवसीय विशेष शिबिर दत्तक ग्राम परलाम येथे घेण्यात आले होते.या विशेष शिबिराचा समारोप नुकताच स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे पुण्यतिथीचे औचित्य साधून झाला. महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. मीनल भोंडे, अध्यक्ष, अस्मिता शिक्षण मंडळ अमरावती यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आलेल्या या समारोपिय कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्रा. डॉ. विशाल गजभिये, जिल्हा समन्वयक, राष्ट्रीय सेवा योजना विभाग, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ तर प्रमुख उपस्थिती माजी सरपंच गंगाधरराव मालठाणे व सरपंच रेखा मालठाणे ,ग्राम परलाम या उपस्थित होत्या.

याप्रसंगी मार्गदर्शन करताना प्रमुख अतिथी प्रा. डॉ. विशाल गजभिये यांनी देशाची सेवा आणि राष्ट्राच्या उत्थानासाठी राष्ट्रीय सेवा योजना हा उपक्रम सुरू करण्यात आलेला असून त्यानिमित्ताने युवकांना राष्ट्रसेवेची संधी उपलब्ध करून दिलेली आहे. परलाम गावचे माजी सरपंच श्री गंगाधरराव मालठाणे यांनी रासेयो कार्यक्रम अधिकारी आणि स्वयंसेवकांनी गेल्या सात दिवसापासून गावात केलेल्या कामाचा थोडक्यात आढावा घेतला.अध्यक्षिय मनोगतातून प्राचार्य डॉ मीनल भोंडे यांनी ग्रामस्थांनी विशेष शिबिरा दरम्यान स्वयंसेवकांना सहकार्य केल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. विशेष शिबिर दरम्यान घेण्यात आलेल्या पोस्टर प्रदर्शनी स्पर्धा (माझा कचरा माझी जबाबदारी) आणि रांगोळी स्पर्धेमध्ये सहभाग घेऊन पारितोषीक प्राप्त जिल्हा परिषद पूर्व माध्यमिक व माध्यमिक शाळेचे आणि ज्ञानेश्वर सगणे माध्यमिक विद्यालय परलाम येथील विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले.

या सात दिवसीय शिबिरा अंतर्गत बौद्धिक सत्रात उद्योजकता विकास व व्यवसाय मार्गदर्शन, पंडित दीनदयाल उपाध्याय यांची अंतोदय संकल्पना, एच आय व्ही आणि युवक, संविधान निर्मितीमध्ये महिलांचे योगदान, आर्थिक सुरक्षा आणि विमा, अडचणीचा सामना करताना युवकांचे मानसिक आरोग्य, सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालयाच्या संगीत विभागाने सादर केलेला स्वरगंध, काव्यसंध्या, कवी संमेलन, संत गाडगेबाबा यांच्या वेशभूषेतून विद्याराज कोरे यांनी साकार केलेले संत गाडगेबाबा यांचे कीर्तन, ह.भ.प.श्याम महाराज यांनी सादर केलेले अंधश्रद्धा निर्मूलनावरील प्रवचन, जिल्हा परिषद पूर्व माध्यमिक व माध्यमिक शाळेच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेले सांस्कृतिक कार्यक्रम इत्यादी कार्यक्रमांचा समावेश होता याशिवाय स्वप्निल गावंडे, दिशा फाउंडेशन अमरावती यांच्या सौजन्याने गावकऱ्यांसाठी नेत्र चिकित्सा डॉ. मनीष तोटे यांच्याद्वारे करण्यात आली.

यात एकूण १३६ गावकऱ्यांची नेत्र तपासणी करण्यात आली तसेच रक्तदान शिबिर जिल्हा सामान्य रुग्णालय अमरावती यांच्या सौजन्याने घेण्यात आले ज्यामध्ये एकूण १५ रक्त पिशव्यांचे संकलन करण्यात आले.या शिबिरा दरम्यान स्वयंसेवकांनी श्रमदानातून साकारलेल्या शोषखड्डे ची पाहुण्यांनी पाहणी केली.समारोपिय कार्यक्रमादरम्यान कुणाल इंगळे ,धनश्री श्रीवास्तव यांनी आपले मनोगत व्यक्त केले. सात दिवसीय शिबिरात उत्कृष्ट कार्य करून सर्वांना सहकार्य केल्याबद्दल किरण डोंगरे , दिपाली इंदुरकर यांना उत्कृष्ट स्वयंसेवकाचा पुरस्कार मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. या समारोपीय सत्राचे सूत्रसंचालन उर्वशी अंभोरे हीने तर उपस्थितांचे व गावकऱ्यांचे आभार राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. सुशांत ठोके यांनी मानले. या शिबिराच्या आयोजनासाठी प्रा. डॉ. सुशांत ठोके रासेयो कार्यक्रमाधिकारी व प्रा. विद्या अंभोरे महिला रासेयो कार्यक्रम अधिकारी व स्वयंसेवक, यांनी अथक परिश्रम घेतले. शिबिर यशस्वी करण्यासाठी सरपंच रेखा मालठाने व माजी सरपंच गंगाधरराव मालठाणे व ग्रामपंचायत कार्यकारिणी सदस्य गाडबैल सर मुख्याध्यापक, जिल्हा परिषद पूर्व माध्यमिक व माध्यमिक शाळा परलाम, महेंद्र भाऊ, रुपराव काका, चौधरी काका, वानखडे काका, राम चौधरी, एलआयसी प्रतिनिधी अमरावती, गोकुल महाराज, सर्व समस्त गावकरी, स्वयंसेवक आणि महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वर्ग यांचे सहकार्य लाभले.

# अंजनगाव सुर्जी पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी सुधीर खोडे यांना अटक

## सीताबाई संगई शाळेतील DC-२८ परीक्षा कस्टडी रूम वर आढळला गैरप्रकार

### शिक्षण विस्तार अधिकारी फरार, -तिघांसह दोन अनोळखी विद्यार्थ्यांविरुद्ध गुन्हा दाखल

**-दहावीच्या परीक्षेत धक्कादायक प्रकार**





**अंजनगाव सुर्जी/प्रतिनिधीः-** राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या दहावीच्या परीक्षेत अंजनगाव सुर्जी येथे एका केंद्रावर अत्यंत धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. इंग्रजी विषयाच्या दोन उत्तरपत्रिका कस्टडीत जमा न करता त्या एका खासगी व्यक्तीकडे लपवून ठेवल्याचे भरारी पथकाच्या धाडीत स्पष्ट झाले.

अंजनगाव सुर्जी येथील सिताबाई संगई विद्यालय कस्टडी रूम (DC-२८) मध्ये २७ फेब्रुवारी शिक्षण विभागाच्या पथकाने धाड टाकली असता इंग्रजी विषयाच्या पेपरदरम्यान गंभीर गैरप्रकार उघडकीस आल्याने खळबळ उडाली आहे.

अमरावती उपशिक्षणाधिकारी रजणी शिरभाते यांच्या तक्रारीवरून अंजनगाव सुर्जी पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी सुधीर खोडेसह खाजगी व्यक्ती अनिल हाडोळे यांना पोलिसांनी अटक केली आहे. उत्तरपत्रिकांमध्ये फेरफार केल्याप्रकरणी परिरक्षक, उपपरीक्षक, एक खाजगी कर्मचारी यासह दोन अनोळखी विद्यार्थ्यांविरुद्ध अंजनगाव सुर्जी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार दिनांक २७ फेब्रुवारी २०२६ रोजी इंग्रजी विषयाचा पेपर सकाळी ११ ते दुपारी २.१० या वेळेत पार पडला. मराठी माध्यमाच्या १९९२, इंग्रजी माध्यमाच्या ४४३ आणि उर्दू माध्यमाच्या ४३१ अशा एकूण संख्येने विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. याच दिवशी दिनांक २७ रोजी दुपारी ४ वाजून ४० मिनिटांनी भरारी पथकातील उपशिक्षणाधिकारी रजनी शिरभाते, रवींद्र सोळंके, सहाय्यक☞(पान २ वर)

# कर्जमुक्तीची आठवण व मेळघाट संघर्ष यात्रेला सुरुवात

## पोलिसांच्या नऊ अटींच्या नोटीसवर संताप



अमरावती/प्रतिनिधीः-

आजपासून मेळघाटाच्या दुर्गम डोंगररांगांतून कर्जमुक्तीची आठवण करून देणारी आणि शेतकरी-आदिवासी हक्कांसाठी लढणारी 'मेळघाट संघर्ष यात्रा' आज (दि.१) रविवारपासून दणक्यात सुरू झाली आहे. सेमाडोह येथे छोटेखानी सभेनंतर बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखाली २५० किमी पदयात्रेचा शुभारंभ झाला. रायपूर–बोराटाखेळा मार्गे हतरू येथे आजचा मुक्काम होत असून ९ मार्च रोजी चिखलदरा येथे महाअंतिम सभेने यात्रेची सांगता होणार आहे.

मात्र यात्रेच्या पहिल्याच दिवशी पोलीस प्रशासनाने दिलेल्या नऊ अटी व शर्तींच्या नोटीसने संतापाची लाट उसळली आहे. सभा, ध्वनिवर्धक, बॅनर-फलक, वाहनांची हालचाल, वनक्षेत्रातील निर्बंध, धार्मिक व शासकीय कार्यालयांजवळील कार्यक्रम, कायदा-सुव्यवस्थेची जबाबदारी अशा विविध मुद्द्यांवर कठोर अटी लादण्यात आल्या आहेत. या नोटीसमध्ये अप्रत्यक्षपणे कारवाईचा इशारा देत यात्रेवर दबाव टाकण्याचा प्रयत्न झाल्याचा आरोप संघर्ष यात्रा समितीने केला आहे.

यात्रेत सहभागी होऊ नये म्हणून काही ☞(पान २ वर)

# महानगरपालिका क्षेत्रातील ६६६ अतिक्रमण धारकांना दिलासा

**जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या अध्यक्षतेखाली समितीची बैठक**



**अमरावती/प्रतिनिधीः-**

'सर्वांसाठी घरे - २०२२' या राज्य व केंद्र शासनाच्या धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीच्या अनुषंगाने नझुल शासकीय जमिनीवर निवासी प्रयोजनासाठी केलेल्या अतिक्रमणांना नियमानुकूल करण्यासाठी जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समितीची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली.

महसूल विभागाच्या अखत्यारीतील अमरावती महानगरपालिका क्षेत्रातील एकूण १५ झोपडपट्ट्यांमधील ६६६ अतिक्रमण धारकांच्या प्रकरणांवर या बैठकीत सकारात्मक निर्णय घेण्यात आला. सदर अतिक्रमण शासनाच्या अटी व शर्तींच्या अधीन राहून नियमानुकूल करण्यात आले असून संबंधित लाभार्थ्यांना प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत घरकुल बांधण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

बैठकीस अमरावती महानगरपालिकेच्या आयुक्त सौम्या शर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली सचिव म्हणून उपायुक्त नरेंद्र वानखडे यांनी कामकाज पार पाडले. तसेच उपजिल्हाधिकारी विवेक जाधव, डॉ. विकास खंडारे, सहायक संचालक नगर रचना सागर वानखडे, उपअधीक्षक भूमी अभिलेख गजानन डोईफोडे, शहर अभियंता रवींद्र पवार, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता बोरसे, उपअभियंता हेमंत महाजन, शिवाजी देशमुख, आर्थिक तज्ज्ञ विपिन त्रिवेदी, समाज विकास तज्ज्ञ प्रज्वल शेंडे, अभियंता जिशान शहा, एमआयएस तज्ज्ञ निखिल राऊत, सर्व्हे कंपनीचे प्रतिनिधी पियूष हांडे व प्रतीक ठाकरे, तसेच भूमी अभिलेख विभागातील बनकर आदी अधिकारी ☞(पान २ वर)

# विहिरीत आढळला तरुणाचा कुजलेला मृतदेह

## घातपाताचा संशय, सखोल तपास सुरू



**अमरावती/प्रतिनिधीः-**

शहरातील फ्रेजरपुरा पोलिस स्टेशन हद्दीत छत्री तलाव–हनुमान गढी मार्गावरील जंगल परिसरातील एका जुन्या विहिरीत अज्ञात इसमाचा कुजलेल्या अवस्थेतील मृतदेह आढळल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. रविवारी दि. १ मार्च रोजी दुपारच्या सुमारास ही धक्कादायक बाब समोर आली. प्राथमिक पाहणीतून घातपाताचा संशय व्यक्त केला जात असून, पोलिसांनी सर्व अंगांनी तपास सुरू केला आहे. रात्री उशिरा मृताची ओळख पटविण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.

वडाळी वनपरिक्षेत्रातील जेवड बिटमध्ये कामासाठी गेलेल्या काही मजुरांना विहिरीत मृतदेह दिसून आला. दुर्गंधी आणि पाण्यावर तरंगणारी संशयास्पद वस्तू पाहून त्यांनी तत्काळ पोलिसांना माहिती दिली. माहिती मिळताच फ्रेजरपुरा पोलिसांचे पथक घटनास्थळी दाखल झाले. घटनेची गंभीरता लक्षात घेऊन पोलीस उपायुक्त गणेश शिंदे व एसीपी संजय खताळे तसेच फॉरेन्सिक पथकाने पाहणी केली. अग्निशमन दलाच्या मदतीने विहिरीतील मृतदेह बाहेर काढण्यात आला.

मृतदेह पूर्णपणे कुजलेल्या अवस्थेत असल्याने ओळख पटविणे कठीण ठरत आहे. शवविच्छेदनासाठी मृतदेह पाठविण्यात आला असून, पोस्टमार्टम अहवालानंतरच मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होईल, अशी माहिती☞(पान २ वर)

# चना खरेदीसाठी ऑनलाईन नोंदणी आजपासून सुरू



**नांदगाव खंडेश्वर/प्रतिनिधीः-** केंद्र शासनाच्या आधार भूत हमीभाव योजने अंतर्गत नाफेडच्या वतीने चना खरेदी नांदगाव खंडेश्वर केंद्रावर सुरू होणार आहे. त्याकरिता खरेदी विक्री संस्था नांदगाव खंडेश्वर येथील कार्यालयात आज दिनांक २ मार्च पासून ऑनलाईन नोंदणी प्रक्रिया सुरू करण्यात येत आहे. चण्याचे हमीभाव ५८७५ रुपये प्रति क्विंटल असून ऑनलाईन नोंदणी करीता चना पेरणी नोंद असलेला सातबारा (तलाठी यांचा) आधार कार्ड व लिंक असलेले बँकेच्या पासबुकची झेरॉक्स आठ अ तसेच सामूहिक पीक पेरा साठी शेतकऱ्यांचे संमती पत्र यासह नोंदणी अर्ज करून ऑनलाईन करिता शेतकऱ्यांचा आधार लिंक. pos मशीन साठी अंगठा अनिवार्य आहे. तरी शेतकऱ्यांनी हमीभाव योजनेत चना विक्री करण्याकरिता खरेदी विक्री संस्था नांदगाव खंडेश्वर येथे कार्यालयीन वेळात ऑनलाईन नोंदणी करून घ्यावी अशी माहिती संस्थेचे व्यवस्थापक अमोल खंडार यांनी दिली.

# भरधाव ट्रकची दुचाकीला धडक, एकाचा मृत्यू




**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती-परतवाडा मार्गावर मल्हारा नर्सरीजवळ शुक्रवारी सकाळी भीषण अपघात घडला. भरधाव धावणाऱ्या ट्रकने दुचाकीला दिलेल्या जोरदार धडकेत एका व्यक्तीचा मृत्यू झाला, तर दुसरा गंभीर जखमी झाला आहे. सकाळी सुमारे १०.३० वाजताच्या सुमारास ही घटना घडली. या अपघातात भयलू तोटे (रा. चिखलदरा) यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. तर सोबेलाल तोटे हे गंभीर जखमी असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

प्राथमिक माहितीनुसार, दोघेही दुचाकीवरून परतवाड्याकडे जात असताना ट्रक क्रमांक एमएच १२/एलटी ४५१८ च्या चालकाने वाहन भरधाव व निष्काळजीपणे चालवत त्यांच्या दुचाकीला धडक दिली. धडकेचा जोर इतका जबर होता की दोघेही रस्त्यावर फेकले गेले.

अपघातात सोबेलाल तोटे यांच्या दोन्ही पायांना, कंबर, डोके व ☞(पान २ वर)

# ८२ लाखांच्या गृहकर्ज घोटाळ्याचा पर्दाफाश

## ६ जणांना अटक, आणखी आरोपी वाढण्याची शक्यता




**अमरावती/प्रतिनिधीः-** बनावट नोकरीची कागदपत्रे, खोटी इसारचिठ्ठी-विक्रीपत्रे आणि तोतया व्यक्ती उभा करून बँक खात्यांचा वापर करत तब्बल ८२ लाख रुपयांचे गृहकर्ज उचलून बँकेची फसवणूक केल्याप्रकरणी आर्थिक गुन्हे शाखेने मोठी कारवाई केली आहे. या प्रकरणात आतापर्यंत ६ आरोपींना अटक करण्यात आली असून आणखी आरोपी वाढण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

२३ डिसेंबर २०२५ रोजी इंडियन बँकेच्या कॅम्प व पीडीएमएमसी शाखेच्या व्यवस्थापकांनी गाडगेनगर पोलिस स्टेशन येथे तक्रार दिल्यानंतर गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास आर्थिक गुन्हे शाखेकडे सोपविण्यात आला आहे. तपासात उघड झाले की, आरोपींनी संगनमताने खोटे नोकरीचे दाखले, सॅलरी सर्टिफिकेट, फॉर्म क्र. १६ आणि ☞(पान २ वर)

# सणांच्या पार्श्वभूमीवर वाहतूक पोलिसांची कारवाई

## नियमभंग करणाऱ्यांकडून १.३३ लाखांचा दंड

**अमरावती/प्रतिनिधीः-**

होळी, धुलीवंदन आणि रमजान ईदच्या पार्श्वभूमीवर अपघातांना आळा घालण्यासाठी अमरावती ग्रामीण पोलिसांनी वाहतूक नियमभंग करणाऱ्यांविरुद्ध कडक मोहीम हाती घेतली. शनिवारी राबविण्यात आलेल्या विशेष कारवाईत एकूण १ लाख ३३ हजार २५० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला.

पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांच्या निर्देशानुसार जिल्हा वाहतूक शाखा व स्थानिक



पोलिसांनी चांदूर बाजार टाऊन परिसरात तपासणी नाके उभारून नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांवर कारवाई केली. या मोहिमेत अवैध प्रवासी वाहतूक,☞(पान २ वर)

# एटीएम फसवणुकीचा प्रयत्न उघड

## २० हजारांची फसवणूक थोडक्यात टळली

**अमरावती/प्रतिनिधीः-**

शहरात एटीएम फसवणुकीचा नवा डाव उघडकीस आला आहे. चिलम छावणी परिसरातील स्टेट बँकेच्या एटीएममध्ये 'ब्लॅक टेप' लावून पैसे अडकवण्याचा प्रकार समोर आला असून पोलिसांच्या तत्परतेमुळे ग्राहकाचे २० हजार रुपये सुरक्षित राहिले.

घटना २८ फेब्रुवारी २०२६ रोजी रात्री सुमारे ११.३२ वाजताची आहे. संबंधित ग्राहकाने एटीएममधून २० हजार रुपये काढण्यासाठी व्यवहार केला. खात्यातून रक्कम वजा झाल्याचा संदेश आला; मात्र मशीनमधून पैसे बाहेर आले नाहीत. संशय आल्याने ग्राहकाने एटीएमच्या स्लॉटची नीट पाहणी केली असता, पैसे बाहेर येण्याच्या जागी काळी पट्टी लावलेली असल्याचे दिसून आले. प्रकरणाची माहिती मिळताच गाडगेनगर पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. स्लॉटवरील ब्लॅक टेप काढताच आत अडकलेली संपूर्ण रक्कम बाहेर आली ☞(पान २ वर)

# आराधना शॉपिंग मॉलमधून ४२ हजारांची रोकड लंपास



**अमरावती/प्रतिनिधीः-**

नांदगाव पेठ परिसरातील बिजीलँड येथील आराधना शॉपिंग मॉलमध्ये चोरी झाल्याची घटना २८ फेब्रुवारी रोजी उघडकीस आली असून अज्ञात चोरट्यांनी दोन काउंटरमधील एकूण ४२ हजार रुपयांची रोकड लंपास केली आहे. या प्रकरणी नांदगाव पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी टिकमचंद्र शिवाजी निमकरोड़ीवाल (वय ५८, रा. नवी वस्ती, बडनेरा, जि. अमरावती) हे आराधना शॉपिंग मॉलमध्ये मागील आठ वर्षांपासून सेल्समन म्हणून कार्यरत आहेत. नेहमीप्रमाणे २७ फेब्रुवारी २०२६ रोजी रात्री सुमारे १० वाजता दुकान बंद करून सर्व कर्मचारी घरी गेले. २८ फेब्रुवारी रोजी सकाळी सुमारे ११.४५ वाजता ☞(पान २ वर)

# तलवारींच्या धाकावर दहशत पसरविणारा फरार आरोपी जेरबंद

अमरावती/प्रतिनिधीः-

घरफोडी व तोडफोडीच्या गंभीर प्रकरणात फरार असलेल्या आरोपीला अखेर राजापेठ पोलिसांनी अटक करून बेड्या ठोकल्या. साहील नरेश मेश्राम (वय २७, रा. माताफैल, बडनेरा, ह.मु. सामरा नगर) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.

१ डिसेंबर २०२५ रोजी रात्री सुमारे साडेअकराच्या सुमारास जेवडनगर परिसरात धक्कादायक प्रकार घडला होता. शुभम गोकुलदास जनबंधू यांच्या घरासमोर २० ते २५ युवक तलवारींसह जमले होते. त्यांनी परिसरात दहशतीचे वातावरण निर्माण करत घराच्या दरवाजांवर वार केले, उभ्या वाहनांची तोडफोड केली आणि इलेक्ट्रिक पोलवरील मीटर बॉक्स फोडले. या हिंसक प्रकारात तब्बल १० ते १२ वाहनांसह सुमारे पाच लाख रुपयांचे नुकसान झाल्याचा अंदाज आहे. या घटनेनंतर राजापेठ पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहिता तसेच अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. घटनेनंतर साहील मेश्राम☞(पान २ वर)

# मार्डी येथे गावठी दारू अड्ड्यावर कुऱ्हा पोलीसांचा छापा



**कुऱ्हा/प्रतिनिधीः-**होळी धुलिवंदन सणा अंतर्गत दि. ०१ मार्च २०२६ रोजी सकाळी विशेष मोहीम राबवून मार्डी येथे गावठी हाथभट्टी दारूवर छापा टाकून कु-हा पोलिसांनी कारवाई केली. आरोपींच्या ताब्यातून मोह सडवा आणि गावठी हातभट्टी दारू असा एकूण १,४१,००० (एक लाख एक्केचाळीस☞(पान २ वर)

# महसूल वसुली पूर्ण करण्यासाठी नियोजन करा-विभागीय आयुक्त श्वेता सिंघल



## महाराजस्व अभियानांतर्गत विविध उपक्रमांचा आढावा

अमरावती/प्रतिनिधीः-

राज्य शासनातर्फे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत समाधान शिबिर अभियानाचा पहिला टप्पा राबविण्यात येत आहे. यातून गावात सुविधा देऊन नागरिकांचे जीवनमान सुधारण्यासाठी उपाययोजना करण्यात येणार आहे. त्यामुळे विकासात्मक कामाबरोबरच यंत्रणांनी महसूल वसुलीवर लक्ष केंद्रित करून यासाठी आवश्यक असलेले नियोजन करावे, असे निर्देश विभागीय आयुक्त श्वेता सिंघल यांनी दिले. महाराजस्व अभियानांतर्गत ☞(पान २ वर)

# गल्फ देशांतील युद्धजन्य परिस्थितीमुळे जिल्हा प्रशासनाकडून हेल्पलाईन जाहीर

अमरावती/प्रतिनिधीः-

मध्यपूर्व आणि गल्फ देशांमध्ये उद्भवलेल्या युद्धजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर, तेथे अडकलेल्या राज्यातील व विशेषतः जिल्ह्यातील नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी जिल्हा प्रशासनाने महत्त्वाची नियमावली आणि हेल्पलाईन क्रमांक जाहीर केले आहेत.

भारत सरकारचे परराष्ट्र मंत्रालय आणि विविध भारतीय दूतावास या परिस्थितीवर लक्ष ठेवून असून नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. परदेशात अडकलेल्या व्यक्तींच्या सुरक्षिततेबाबत माहिती देण्यासाठी किंवा मदतीसाठी राज्य आपत्कालीन कार्य केंद्र आणि स्थानिक नियंत्रण कक्षाशी खालील क्रमांकावर संपर्क साधता येईल. राज्य आपत्कालीन केंद्रः १०७७ (टोल फ्री), ९१-९३२१५८७१४३, ०२२-२२०२७९९०☞(पान २